जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
जळगाव, बुधवार, १८ मार्च २०२६। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३२ । अंक : २१९। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ + ४ = १२। जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

**धुळ्यात नवीन उद्योग भवनामुळे सर्व कार्यालये येणार एकाच छताखाली!**

वाचा पान ६ वर

## विचारपुष्प



आम्ही निसर्गाला, गाईला, तुळशीला, गंगेला माता म्हणतो. आम्ही पिंपळाच्या वृक्षाची पूजा करतो, सापाला दूध पाजतो आणि मुंग्यांना साखर देतो. निसर्गाच्या प्रत्येक वस्तूची आम्ही पूजा करतो. आणि हाच श्रद्धाभाव आम्हाला निसर्गाचे शोषण करण्यापासून परावृत्त करतो. ज्याच्याप्रति आमच्या मनात आदर आणि स्नेह आहे त्याचे आम्ही शोषण करत नाही.

**- कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## महत्त्वाचे

### नव्या एसटी बसेससाठी कंत्राटी कर्मचारी

**मुंबई :** पुढील वर्षात एसटी महामंडळाच्या ताफ्यात जवळपास आठ हजार बसेस येणार आहेत. यासाठी कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरती करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत दिली आहे. सध्या एसटी कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्या कारणाने राज्य शासनाकडे १७,७४२ कर्मचाऱ्यांची भरती एसटी महामंडळाच्या माध्यमातून करण्यात यावी असा प्रस्ताव मांडलेला आहे. परंतु ही भरती प्रक्रिया राबवण्यासाठी लागणारा कालावधी आणि आर्थिक भार लक्षात घेता सध्या तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरती केली जाणार आहे.

# जिल्हा परिषद-पंचायत समित्यांमध्येही आता स्वीकृत सदस्य



## विधानसभेत सुधारणा विधेयक मंजूर

◆ **मुंबई, १७ मार्च**

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या रचनेत महत्त्वपूर्ण सुधारणा करणारे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक २०२६ विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय पक्ष व नोंदणीकृत गटांना त्यांच्या संख्याबळानुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीत स्वीकृत सदस्य नेमण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महानगरपालिका प्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मध्ये स्वीकृत सदस्य नियुक्त करण्यासाठी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सदर विधेयक सभागृहात मांडले. चर्चेला उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले की, नगरपालिकांप्रमाणेच आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्येही संख्याबळाच्या आधारे सदस्यांची नियुक्ती केली जाईल. या प्रक्रियेत संबंधित जिल्हाधिकारी मान्यताप्राप्त व नोंदणीकृत पक्षांच्या संख्याबळाचा विचार करून गटनेत्यांशी सल्लामसलत करतील.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत बोलताना गोरे यांनी सांगितले की, ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून २१ जुलै २०२६ रोजी पुढील सुनावणी होणार आहे. न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर तातडीने निवडणुका घेण्याची सरकारची तयारी असल्याचे त्यांनी नमूद केले. आदिवासी व इतर प्रलंबित भागांतील निवडणुकाही त्यानंतर लवकरच घेण्यात येतील.

याशिवाय, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या जीर्ण इमारतींच्या दुरुस्ती व नव्या इमारती उभारण्याबाबतही सरकार सकारात्मक आहे. चर्चेत विविध पक्षांच्या आमदारांनी सहभागी होत स्वागतासह काही सूचना मांडल्या. त्यावर समाधानकारक स्पष्टीकरण दिल्यानंतर हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले.

### मतदानाचा अधिकार नसेल

**नामनिर्देशित सदस्यांना कार्यकाळ व अधिकारांच्या बाबतीत निवडून आलेल्या सदस्यांप्रमाणेच स्थान मिळणार असले तरी त्यांना मतदानाचा अधिकार नसणार आहे. मात्र निधी वाटपात त्यांना समान सहभाग दिला जाईल, असे गोरे यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करण्याची संधी मिळेल, असा सरकारचा विश्वास आहे.**

# दहशतवादी कारवायांचा कट रचणाऱ्या सात विदेशींना अटक

### एनआयएची कारवाई ● युक्रेनच्या सहा, एका अमेरिकी नागरिकाचा समावेश

◆ **नवी दिल्ली, १७ मार्च**

देशात दहशतवादी कारवाया घडवण्याचा कट रचणाऱ्या सात विदेशींना राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने अटक केली. यात सहा युक्रेनच्या, तर एका अमेरिकी नागरिकाचा समावेश आहे.

एनआयएच्या विविध पथकांनी मागील आठवड्यात समन्वित पद्धतीने कारवाई करीत बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यातील कलम १८ आणि इतर तरतुदींच्या अंतर्गत हे अटकसत्र राबवले. या प्रकरणात शुक्रवारी सायंकाळी एफआयआर दाखल करण्यात आला. कोलकाता विमानतळावर ब्युरो ऑफ इमिग्रेशनने एका अमेरिकी नागरिकाला ताब्यात घेतले, तर लखनौ आणि दिल्ली येथील विमानतळांवर प्रत्येकी तीन युक्रेनियन नागरिकांना ताब्यात घेण्यात आले.

आरोपींनी वैध व्हिसावर भारतात प्रवेश केला होता. मात्र, अनिवार्य असलेल्या प्रतिबंधित क्षेत्र परवान्याशिवाय ते मिझोरमकडे रवाना झाले होते, अशी माहिती सूत्रांनी दिली. तिथून त्यांनी म्यानमारमध्ये प्रवेश केला. त्यांनी भारताशी शत्रूत्व बाळगणाऱ्या वांशिक गटांची भेट घेतल्याचे सांगितले जाते. युरोपमधून आलेल्या ड्रोनच्या अनेक खेपा त्यांनी मिझोरममध्ये पोहोचवल्याचेही तपासात उघड झाले, असे सूत्रांनी सांगितले.

### बंडखोर गटांना दहशतवादी साहित्याचा पुरवठा

आरोपी वांशिक सशस्त्र गटांच्या वापरासाठीन युरोपमधून भारतामार्गे म्यानमारला ड्रोनचे प्रचंड साठे बेकायदेशीरपणे आयात करण्यात सहभागी होते. या गटांनी काही प्रतिबंधित भारतीय बंडखोर गटांना शस्त्रे आणि इतर दहशतवादी साहित्य पुरवून तसेच त्यांना प्रशिक्षण देऊन मदत केल्याचा आरोप एनआयएने केला.

# पुढील पाच वर्षांत वीजदर घटणार : मुख्यमंत्री





◆ **मुंबई, १७ मार्च**

राज्यात सौर ऊर्जेचा वाढता वापर, पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि वितरण व्यवस्थेतील सुधारणा यामुळे पुढील पाच वर्षांत वीजदर वाढण्याऐवजी टप्प्याटप्प्याने घटतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत व्यक्त केला. २०२९ पर्यंत वीजदरात स्थिरता येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

तारांकित प्रश्नोत्तराच्या तासात आमदार चेतन तुपे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) ने वार्षिक महसुलाचा १ लाख कोटी रुपयांचा टप्पा पार करत देशातील अग्रगण्य वीज वितरण कंपनी म्हणून स्थान मिळवले आहे. सौर ऊर्जेच्या वाढत्या उपलब्धतेमुळे आता सकाळी ९ ते सायंकाळी ५ या 'सोलर अवर्स'मध्ये वीज वापरणाऱ्या उद्योगांना २५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.पूर्वी रात्रीच्या वेळेत वीज शिल्लक असल्याने त्या काळात सवलती देण्यात येत होत्या. मात्र, सौर ऊर्जेमुळे दिवसा वीज उपलब्धता मोठ्या प्रमाणात वाढल्याने धोरणात बदल करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

औद्योगिक वीजदरात कपात करण्यात आल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, सध्या हा दर ८.३२ रुपये प्रति युनिट असून २०२९-३० पर्यंत तो सुमारे ७.३८ रुपयांपर्यंत खाली येईल. तमिळनाडू आणि गुजरातच्या तुलनेत महाराष्ट्रातील वीजदर अधिक स्पर्धात्मक असून येत्या काळात देशातील सर्वात कमी दरांपैकी एक असेल, असा दावा त्यांनी केला. याशिवाय, 'बॅटरी स्टोरेज सिस्टिम'चा वापर करणाऱ्या कॅप्टिव्ह सौर ऊर्जा उत्पादकांना २४ तास सवलतीच्या दरात वीज मिळू शकते. सध्या बॅटरी स्टोरेजचे दरही मोठ्या प्रमाणात कमी झाले असल्याने उद्योगांनी या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

# धर्म स्वातंत्र्य विधेयक विधानसभेत बहुमताने मंजूर


◆ **मुंबई , १७ मार्च**

बळजबरी, फसवणूक किंवा प्रलोभन देऊन होणारे धर्मांतर रोखण्यासाठी राज्य सरकारने आणलेले धर्म स्वातंत्र्य विधेयक महाराष्ट्र विधानसभेत सोमवारी रात्री बहुमताने मंजूर झाले. पुढील प्रक्रियेसाठी हे विधेयक आता विधानपरिषदेत सादर करण्यात येणार आहे.

विधानसभेत या विधेयकावर सोमवारी सविस्तर चर्चा झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक सभागृहात मांडले. विविध पक्षांच्या सदस्यांनी यावर आपापली मते व्यक्त केली. त्यानंतर उशिरापर्यंत चाललेल्या चर्चेनंतर मतदान घेण्यात आले आणि विधेयक बहुमताने मंजूर करण्यात आले.

या विधेयकाला सत्ताधारी पक्षांसह काही विरोधी पक्षांकडूनही पाठिंबा मिळाला. विशेष म्हणजे शिवसेना (उबाठा गट) यांनी या विधेयकाला समर्थन दिले. *(तभा वृत्तसेवा)*

# गॅस सिलेंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी नियंत्रण कक्ष



◆ **मुंबई, १७ मार्च**

राज्यात घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी राज्य शासनाने कडक पावले उचलली आहे. नागरिकांच्या तक्रारींसाठी राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला असून त्वरित मदत मिळावी यासाठी ९७६९९१९२२१ हा व्हॉट्सअॅप क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आला असल्याची माहिती अशी माहिती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत दिली.

गॅस तुटवडा टाळण्यासाठी रिफायनऱ्यांचे उत्पादन वाढवण्यात आले असून एलपीजी उत्पादन ९ हजार मेट्रिक टनांवरून ११ हजार मेट्रिक टनांपर्यंत नेण्यात आले आहे. रुग्णालये, शाळा व महाविद्यालयांना प्राधान्याने १०० टक्के पुरवठा करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. *(तभा वृत्तसेवा)*

# अफगाणमध्ये पाकिस्तानने घडवला नरसंहार; ४३४ ठार

◆ **काबुल, १७ मार्च**

पाकिस्तानी वायुदलाने सोमवारी रात्री अमानुषतेचा कळस गाठत काबुलमधील व्यसनमुक्ती रुग्णालयावर क्षेपणास्त्रांचा मारा केला. यामध्ये रुग्णालयाची इमारत उद्ध्वस्त होऊन ४३४ रुग्णांचा मृत्यू झाला. तसेच २५० पेक्षा जास्त जखमी झाले. या घटनेचा जगभरातून निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

पाकिस्तानी लढाऊ विमानांनी काबुलमधील दारुलअमान, अरजान किंमत, खैरखाना आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात हल्ले केले. तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी आरोप केला आहे की, पाकिस्तानी सैन्याने काबुलमधील खैरखाना भागातील ओमिद व्यसन मुक्ती रुग्णालयावर क्षेपणास्त्र डागले. हल्ल्यावेळी रुग्णालयात दोन हजारपेक्षा अधिक रुग्ण होते. या हल्ल्यात संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाली. बचाव पथकाने इमारतीच्या ढिगाऱ्यातून ४३४ मृतदेह बाहेर काढले, तर अडीचशे पेक्षा अधिक जखमी रुग्णांना घटनास्थळापासून काही किमी अंतरावर असलेल्या दुसऱ्या रुग्णालयात पोहोचविले. हा हल्ला मानवतेला काळीमा फासणारा आहे आणि नरसंहार करणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकविण्याची वेळ आली आहे. निष्पाप नागरिकांचा जीव घेणाऱ्यांना ताकदीने प्रत्युत्तर दिले जाईल. भारत, ब्रिटन, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, ब्राझील, ऑस्ट्रेलियासह अनेक देशांच्या परराष्ट्र मंत्रालयाने हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला.

# एलपीजी वाहक नौका 'नंदा देवी' गुजरातमध्ये दाखल



पश्चिम आशियातील संघर्षाच्या पृष्ठभूमीवर होर्मुझच्या सामुद्रीधुनीतून मार्गक्रमण करीत ४६,५०० मेट्रिक टन वायू घेऊन भारताचे दुसरे एलपीजी वाहक जहाज 'नंदा देवी' मंगळवारी गुजरातच्या वदिनार बंदरावर सुखरूप दाखल झाले

# टपाल विभागाची २४ आणि ४८ तासांत वितरणाची हमी

### प्रीमियम सेवा सुरू

◆ **नवी दिल्ली, १७ मार्च**

डाक विभागाने मंगळवारी तीन प्रीमियम सेवा सुरू केल्या असून, त्याद्वारे तातडीच्या आणि वेळेच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या टपालासाठी २४ आणि ४८ तासांत वितरणाची हमी देण्यात आली आहे.

'२४ स्पीड पोस्ट', '२४ स्पीड पोस्ट पार्सल' आणि '४८ स्पीड पोस्ट' या सेवांचे उद्घाटन दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी केले. सुरुवातीला या सेवा दिल्ली, मुंबई, चेन्नई, बंगळुरू आणि हैदराबाद या शहरांमध्ये सुरू केल्या जात आहेत. वितरणाच्या कालमर्यादांचे पालन करण्यासाठी विभाग विशेष प्रक्रिया आणि प्राधान्यक्रमाने हवाई वाहतुकीचा वापर करेल.

हे उद्घाटन 'पोस्ट इंडिया'साठी नूतनीकरणाचा एक क्षण आहे, असे शिंदे यांनी सांगितले. त्यांनी यामागील प्रचंड संधी अधोरेखित केली. ई-कॉमर्स बाजारपेठ २०३० पर्यंत ३० लाख कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. सध्याच्या ११ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत ही वाढ जवळपास तिप्पट असेल.

या नवीन सेवांमध्ये ओटीपी आधारित डिलिव्हरी, सर्वसमावेशक एन्ड-टू-एन्ड ट्रॅकिंग आणि त्यासोबतच रिअल टाईल एसएमएस सूचनांचा समावेश असेल. व्यवसायांसाठी 'आता बुक करा, नंतर पैसे द्या' (बीएनपीएल) यासारखे पर्याय उपलब्ध असतील. या व्यतिरिक्त, मोठ्या प्रमाणात केल्या जाणाऱ्या शिपमेंट्ससाठी मोफत पिकअप सुविधा आणि डिलिव्हरीला विलंब झाल्यास पैसे परत मिळण्याची हमीदेखील दिली जाईल.

# राज्यसभा निवडणुकीत विरोधकांना 'दे धक्का'

### ११ पैकी नऊ जागांवर रालोआचा विजय

◆ **नवी दिल्ली, १७ मार्च**


राज्यसभा निवडणुकीत विरोधी पक्षांना मोठा धक्का बसला आहे. सोमवारी बिहारमधील पाच, ओडिशामधील चार आणि हरियाणातील दोन, अशा ११ जागांसाठी मतदान झाले. या ११ जागांपैकी नऊ ठिकाणी रालोआला मोठा विजय मिळाला. गत महिन्यात, निवडणूक आयोगाने १० राज्यांमधील ३७ राज्यसभा जागांसाठी निवडणुका जाहीर केल्या होत्या. यापैकी, सात राज्यांमधील २६ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले.

बिहार आणि ओडिशामध्ये विरोधी पक्ष आपल्या आमदारांना एकत्र ठेवण्यात अपयशी ठरल्यामुळे रालोआला फायदा झाला. बिहारमध्ये पाच जागांसाठी सहा उमेदवार निवडणूक लढवत होते. त्यापैकी पाच रालोआचे तर एक विरोधी महाआघाडीचा होता. यात रालोआने सर्व पाच जागा जिंकल्या. विजयी उमेदवारांमध्ये बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, रामनाथ ठाकूर, उपेंद्र कुशवाह आणि शिवेश राम यांचा समावेश आहे.

बिहारमध्ये राज्यसभा निवडणूक जिंकण्यासाठी ४१ मतांची आवश्यकता होती. पाचव्या जागेसाठी त्यांना तीन मतांची गरज होती. महाआघाडीकडे ३५ आमदार होते. विजयासाठी त्यांना अतिरिक्त सहा मतांची गरज होती. एमआयएमचे पाच आमदार आणि बहुजन समाज पक्षाच्या एका आमदाराच्या पाठिंब्याने विरोधी उमेदवार ए. डी. सिंह यांचा विजय अपेक्षित होता. परंतु, शेवटच्या क्षणी काँग्रेसचे तीन आणि राजदच्या एका आमदारासह चार विरोधी आमदारांनी मतदानच केले नाही. पहिल्या पसंतीची मते अनिर्णित राहिल्यानंतर दुसऱ्या पसंतीची मते मोजण्यात आली.

# 'पोषण आहार' खाणाऱ्यांवर कठोर कारवाई : दादा भुसे

### तक्रारींची सचिवस्तरावर चौकशी करणार



◆ **मुंबई, १७ मार्च**

राज्यातील शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पुरवठ्यात अनियमितता झाल्याच्या तक्रारी गंभीरतेने घेत सचिवस्तरावरील अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी केली जाणार असून, अहवाल प्राप्त होताच दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेत आमदार कैलास पाटील घाडगे यांनी उपस्थित लक्षवेधी सूचना उपस्थित करून शालेय पोषण आहार योजनेत हिरवा वाटाणा देण्याऐवजी पांढरा वाटाणा पुरवला जात असल्याच्या तक्रारी पुढे आल्याने हा मुद्दा चर्चेत आला. यावर उत्तर देतांना मंत्री भुसे यांनी सांगितले की, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत विद्यार्थ्यांना सकस व गुणवत्तापूर्ण आहार मिळावा यासाठी शासनाने निश्चित दर ठरवले आहेत. प्राथमिक शाळांसाठी धान्य पुरवठ्यासाठी प्रति विद्यार्थी ४.१९ रुपये, तर इंधन व भाजीपाल्यासाठी २.५९ रुपये दिले जातात. उच्च प्राथमिक स्तरावर इंधन व भाजीपाला खर्चासाठी प्रति विद्यार्थी ६.२९ रुपये दिले जातात. याशिवाय स्थानिक स्तरावरून ३.८८ रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जात असल्याचे यावेळी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

### मानवअधिकार आयोगाच्या शिफारशींना गती



राज्य मानवअधिकार आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी वेळेत व्हावी. यासाठी राज्य शासनाने प्रशासकीय पातळीवर महत्त्वाचे पाऊल उचलले असून, यासाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली. यासोबतच प्रक्रियेत पारदर्शकता वाढवण्यासाठी स्वतंत्र विभाग आणि ऑनलाईन पोर्टल सुरू करण्याबाबत शासन सकारात्मक असल्याची माहिती यावेळी सभागृहात दिली. प्रश्नोत्तराच्या तासात आमदार अतुल भातखळकर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देतांना राज्यमंत्री योगेश देसाई म्हणाले की, या संदर्भात उपसचिव स्तरावर नोडल अधिकारी नेमण्यात आला असून आयोगाकडे प्रलंबित असलेल्या सुमारे ३० प्रकरणांवर तातडीने कार्यवाही केली जाणार आहे. तसेच, शिफारशींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र 'हेड' निर्माण करण्याबाबतही मुख्यमंत्री स्तरावर मार्गदर्शनाखाली निर्णय घेता येईल असे सांगितले.

# शिखर बँक घोटाळ्याची फाईल बंद

### सुनेत्रा आणि रोहित पवारांची निर्दोष मुक्तता





**मुंबई, १७ मार्च**

मुंबई सत्र न्यायालयातील एका विशेष न्यायालयाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील (शिखर बँक) कथित २५,००० कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे.

राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार, त्यांच्या पत्नी आणि विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह ७५ व्यक्तींना आणि इतर ७३ जणांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने २७ फेब्रुवारीला न्यायालयात सी-सारांश अहवाल सादर केला होता. विशेष सत्र न्यायाधीश महेश जाधव यांनी हा अहवाल स्वीकारला. या आदेशाची प्रत सोमवारी रात्री उशिरा उपलब्ध करून देण्यात आली. सी-सारांश अहवाल स्वीकारताना न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले की, या प्रकरणात आरोपीने कोणत्याही प्रकारे सरकारी निधीचा अपहार, फसवणूक किंवा गैरवापर केल्याचे सूचित करणारा कोणताही पुरावा तपास यंत्रणेला आढळला नाही.

सरकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या ताब्यात सोपवलेल्या मालमत्तेचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर केल्याचा कोणताही ठोस पुरावा नाही. शिवाय, बनावट कागदपत्रे तयार केल्याचे कोणतेही संकेत तपासात आढळले नाहीत. तसेच बँकेच्या संचालकांनी बेकायदेशीर कृत्ये करण्यासाठी कोणताही पूर्वनियोजित किंवा गुन्हेगारी कट रचल्याचे सूचित करणारा कोणताही पुरावा आढळलेला नाही. केवळ प्रक्रियेतील चुका किंवा नियमांचे पालन न करणे हे थेट गुन्हेगारी कृत्य मानले जाऊ शकत नाही, असेही न्यायालयाने आदेशात सांगितले.

# खामेनेईचे निकटवर्तीय अली लारीजानी ठार

## इस्रायलच्या आयडीएफचा दावा ● कमांडर सोलेमानीचाही खात्मा ● अनेक संरक्षण अधिकारी ढिगाऱ्यात गाडले





◆ **तेल अवीव, १७ मार्च**

इराणची राजधानी तेहरानवर सोमवारी रात्री केलेल्या हवाई हल्ल्यात राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव आणि माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचे निकटवर्तीय अली लारीजानी, बसिज कमांडर गुलामरेझा सोलेमानी यांच्यासह सुरक्षा विभागाचे अनेक अधिकारी मारल्याचा दावा इस्रायली संरक्षण दल अर्थात् 'आयडीएफ'ने केला आहे. संरक्षण विभागाच्या अनेक कार्यालयावर बॉम्बवर्षाव करण्यात आला. यात संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाली आणि ढिगाऱ्यात अनेक अधिकारी गाडले गेल्याचे आयडीएफने म्हटले आहे.

इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, दहापेक्षा अधिक लढाऊ विमानांनी संरक्षण विभागाच्या इमारतींना लक्ष्य करून तेहरानमध्ये हल्ला केला. राष्ट्रीय सुरक्षा परिषदेच्या कार्यालयावर झालेल्या हल्ल्यात संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाली. हल्ल्यावेळी कार्यालयात असलेल्या अधिकारी ढिगाऱ्यात गाडले गेले. यात राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली लारीजानी, बसिज कमांडर गुलामरेझा सोलेमानी यांचा समावेश आहे. लारीजानी यांचा खात्मा करण्याच्या उद्देशाने एका इमारतीवर क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. इराणच्या वतीने लारीजानी आणि इतर अधिकाऱ्यांच्या मृत्यूची पुष्टी केलेली नाही. लारीजानी यांच्या कार्यालयाने स्पष्ट केले की, ते लवकरच पत्रकार परिषद घेऊन घटनेसंदर्भातील तपशील सामाईक करेल. दरम्यान लारीजानी हे इराणचे माजी सर्वोच्च नेते अली खामेनेई यांच्या अत्यंत जवळचे मानले जात होते. त्यांच्या मृत्यूनंतर, ते इराणच्या राजवटीतील एक प्रमुख व्यक्ती बनले होते.

### लष्करी छावणीवर ड्रोन, क्षेपणास्त्रांचा मारा

तेहरानमधील एका लष्करी छावणीला लक्ष्य करीत ड्रोन, क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. बसिज फोर्सचे पूर्वीचे मुख्यालय उद्ध्वस्त केल्यानंतर सोलेमानी यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांनी लष्करी छावणीत आश्रय घेतल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. सोमवारी रात्री करण्यात आलेल्या हल्ल्यात सोलेमानी यांच्यासोबतच बसिज फोर्सचे उपकमांडर आणि इतर अनेक वरिष्ठ अधिकारीही ठार झाले. बसिज फोर्स इराणमधील आंदोलने क्रूरपणे दडपण्यासाठी ओळखली जाते आणि त्यांच्यावर अनेक इराणी नागरिकांच्या हत्येचा आरोप असल्याचे काट्झ यांनी निवेदनात म्हटले आहे. ■

### इस्लामिक जिहादच्या नेत्यावर कारवाई

इस्रायलने केवळ इराणी नेत्यांनाच नव्हे, तर पॅलेस्टिनी दहशतवादी गटांच्या नेत्यांनाही लक्ष्य केले आहे. त्यांनी पॅलेस्टिनी इस्लामिक जिहादचे प्रमुख नेते अक्रम अल अजौरी यांच्यावरही हल्ला केला. इस्रायलने दावा केला की, या हल्ल्यात अक्रम अल अजौरी ठार झाले, परंतु याची अद्याप पुष्टी झालेली नाही. इस्रायली लष्करप्रमुख लेफ्टनंट जनरल आयल झमीर यांनी या कारवाईचे वर्णन एक मोठे यश असे केले. ■

# शेजारी देशांवर इराणचा प्रहार

## सौदी, यूएई, कतार, लेबनॉनपर्यंत हल्ले



◆ **दुबई, १७ मार्च**

सौदी अरब, संयुक्त अरब अमिराती अर्थात् युएई, कतार आणि लेबनॉनमधील अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य करीत इराणने मंगळवारी जोरदार हल्ले केले. इराणने आखाती देशातील काही तेल प्रकल्पांना लक्ष्य केले, यात नुकसानीचा तपशील संबंधित देशांनी जाहीर केलेला नाही.

सौदी अरबच्या फुजैरा येथील एका तेल साठवण केंद्रावर झालेल्या ड्रोन हल्ल्यानंतर परिसरात आग लागली. अधिकाऱ्यांनी सांगितले की हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

अग्निशमन आणि सुरक्षा दलाने आगीवर नियंत्रण मिळविले. सौदी अरबच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, इराणने वायू साठे आणि निवासी भागांना लक्ष्य करीत ड्रोनचा मारा केला. हवाई संरक्षण प्रणालीने सर्व ड्रोन नष्ट करण्यात आले. दुसरीकडे अबु धाबीमध्ये झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात एका पाकिस्तानी नागरिकाचा मृत्यू झाला. कतारमध्येही क्षेपणास्त्र हल्ला झाला यात औद्योगिक प्रतिष्ठाणाला आग लागल्याची माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली. याशिवाय लेबनॉनमधील अमेरिकेच्या लष्करी तळावर ड्रोनचा मारा करण्यात आला, यात झालेल्या हानीची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

**यूएईची हवाई वाहतूक बंद**

इराणी हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर यूएईच्या नागरी विमान वाहतूक प्राधिकरणाने देशाची हवाई वाहतूक पूर्णपणे बंद करण्याची घोषणा केली. विमानांची आणि हवाई कर्मचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि सीमांचे संरक्षण करण्यासाठी एक विशेष सुरक्षा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे.

### इराकमधील अमेरिकी तळांवर हल्ला

इराकमधील इराण-समर्थित दहशतवादी गटाने एका अमेरिकी तळावर हल्ला केला आहे. याशिवाय राजधानी बगदादमधील रॉयल ट्यूलिप हॉटेलवर स्फोटकांनी भरलेल्या ड्रोनद्वारे हल्ला करण्यात आला. तथापि, यात कोणतेही मोठे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. हॉटेलमध्ये अनेक परदेशी राजनैतिक अधिकारी राहतात. हे हॉटेल अमेरिकी दूतावासाजवळ आहे. ■

# श्रीलंकेत इंधन टंचाईमुळे सरकारी कामकाज चार दिवसच



◆ **कोलंबो, १७ मार्च**

पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे इंधन टंचाईला सामोरे जाणाऱ्या श्रीलंकेत सरकारी कर्मचाऱ्यांना आठवड्यातून चार दिवसच कार्यालयात येण्याचा निर्देश देण्यात आला. श्रीलंकेत पेट्रोल, डिझेलची तीव्र टंचाई आहे. देशात चार आठवडे पुरेल इतकाच तेलसाठा असून, इंधनाची बचत करण्यासाठी कर्मचाऱ्यांना चार दिवस कार्यालयात हजर राहण्याची मुभा देण्यात आली.

अत्यावश्यक सेवा आयुक्त जनरल प्रभात चंद्रकीर्ति यांनी जाहीर केले की, बुधवारपासून सर्व सरकारी संस्था आठवड्यातून केवळ चार दिवस कार्यरत राहतील. हा नवीन नियम शाळा आणि विद्यापीठांनाही अनिश्चित काळासाठी लागू राहील. राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आपत्कालीन बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. तथापि, रुग्णालये, बंदरे आणि आपत्कालीन सेवा नेहमीप्रमाणे सुरू राहतील.

सरकारने सर्व सार्वजनिक कार्यक्रम आणि समारंभांवरही बंदी घातली आहे. इंधन वाचवण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना शक्य असेल तेव्हा घरून काम करण्यास सांगितले आहे. सर्वसामान्य वाहन मालकांना प्रतिआठवडा १५ लिटर पेट्रोल किंवा डिझेलची मर्यादा असेल. बस आणि इतर सार्वजनिक वाहनांसाठी २०० लिटरची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# ३२ हजार आंदोलकांना इराणी सत्ताधाऱ्यांनी मारले

## ट्रम्प यांचा दावा ● अण्वस्त्रे जगासाठी धोकादायक



◆ **वॉशिंग्टन, १७ मार्च**

इराणचे सत्ताधारी हिंसक आणि दुष्ट असून, त्यांनी तीन आठवड्यांत ३२,००० आंदोलकांना ठार मारले. शांतता आणि लोकशाहीसाठी बाधा असणाऱ्यांचे अस्तित्व संपविण्यासाठी हे युद्ध आहे. इराणने अण्वस्त्र मिळविणे जगासाठी धोकादायक असल्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले.

व्हाईट हाऊसमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना ट्रम्प यांनी सांगितले, इराण अण्वस्त्राचा दुरुपयोग करण्याची पूर्ण शक्यता होती. त्यामुळेच आम्हाला तातडीने हल्ले करावे लागले. अण्वस्त्राचा वापर इस्रायल आणि संपूर्ण पश्चिम आशियाविरोधात झाला असता. आम्ही ते दोन आठवड्यांत नष्ट केले. त्यांच्याकडे नौदल, वायुदल, विमानविरोधी शस्त्रे आणि नेतृत्वही नाही.

इराणविरोधातील युद्ध जागतिक सुरक्षेसाठी आहे. युद्धामुळे तेल, गॅस पुरवठ्याच्या साखळीवरही परिणाम झाला आहे. त्यामुळे युद्ध लवकर थांबविण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. आता जास्त दिवस इराण टिकाव धरू शकणार नाही. त्यांच्याकडील शस्त्रसाठा नष्ट करण्यात आला आणि आता खूप कमी क्षेपणास्त्रे राहिली आहेत, असा दावा ट्रम्प यांनी केला.

# हिमायनीच्या बदनामीचा मजकूर हटवा

### दिल्ली उच्च न्यायालयाचा आदेश

◆ **नवी दिल्ली, १७ मार्च**

केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी यांची मुलगी हिमयानी पुरी हिने दाखल केलेल्या मानहानीच्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाने नोटीस बजावली आहे. अल्पवयीन मुलींच्या आंतरराष्ट्रीय लैंगिक शोषणाचे रॅकेट चालवल्याचा आरोप असलेल्या कुख्यात गुन्हेगार जेफ्री एपस्टिनशी तिला जोडणारी सामग्री हटवण्याची मागणी तिने या याचिकेत केली आहे. न्यायमूर्ती मणी पुष्कर्ण यांच्या अध्यक्षतेखालील न्यायासनाने हिमयानीला एपस्टिनशी जोडणारी भारतात प्रकाशित झालेली सामग्री हटविण्याचे आदेश दिले.

सुनावणीदरम्यान ज्येष्ठ वकील महेश जेठमलानी यांनी हिमयानी पुरी यांच्या वतीने युक्तिवाद केला. त्यांनी सांगितले की, या सामग्रीमध्ये काहीही तथ्य नसतानाही ती याचिकाकर्त्याची प्रतिमा मलीन करते. त्यामुळे या सामग्रीवर जगभर बंदी घालावी, अशी मागणीही त्यांनी केली. मेटाचे प्रतिनिधित्व करणारे वकील अरविंद दातार यांनी या सामग्रीवर जगभर बंदी घालण्याचा आदेश देऊ नये, अशी न्यायालयाला विनंती केली. जगभर बंदी घालण्याची मागणी करणारी एक याचिका उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर प्रलंबित आहे. भारत ही सामग्री जगभर रोखू शकत नाही. इंग्लंडसुद्धा ती थांबवू शकत नाही, असेही त्यांनी सांगितले.

## इराणवरील आर्थिक निर्बंध अधिक कठोर

◆ **वॉशिंग्टन, १७ मार्च**

पश्चिम आशियातील १८ दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षादरम्यान, अमेरिकेने इराणवरील आर्थिक निर्बंध अधिक कठोर केले. अमेरिकेच्या प्रतिनिधी सभागृहात सादर करण्यात आलेले विधेयक मंजूर झाले.

सिनेट सदस्य माईक लॉलर म्हणाले की, इराणच्या अवैध तेल व्यापारास मदत करणाऱ्या विदेशी कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. इराणच्या प्रादेशिक हालचाली आणि आर्थिक नेटवर्क रोखण्याच्या मोठ्या प्रयत्नाचा भाग म्हणून विधेयक सादर केले. अमेरिका इराण सरकारला निर्बंधांना बगल देऊन आणि अवैध तेल विकून दहशतवादाला निधी पुरवण्याची परवानगी देणार नाही. तेलाच्या वाहतुकीसाठी इराण खूप काळापासून विदेशी बँका, विमा कंपन्या आणि लॉजिस्टिक्स पुरवठादारांच्या नेटवर्कवर अवलंबून आहे. विधेयक सरकारला इराणवर अधिक दबाव आणण्यास मदत करेल.

# आठ खासदारांचे निलंबन तत्काळ प्रभावाने मागे

◆ **नवी दिल्ली, १७ मार्च**


विरोधी पक्षांच्या आठ खासदारांचे निलंबन मंगळवारी तत्काळ प्रभावाने पण सशर्त मागे घेण्यात आले. निलंबन मागे घेताना विरोधी पक्षांच्या सदस्यांवर सभागृहातील वागणुकीबाबत काही निर्बंधही घालण्यात आले आहेत.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात या खासदारांना अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित करण्यात आले होते. विरोधी पक्षांच्या आठ खासदारांचे निलंबन मागे घेण्याचा सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी मंगळवारी लोकसभेत मांडलेला प्रस्ताव आवाजी मतदानाने पारित करण्यात आला. सर्वपक्षीय सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत केले.

निलंबित करण्यात आलेल्या आठ खासदारांपैकी सात खासदार काँग्रेसचे तर एक माकपचा होता. हिबी ईडन, अमरिंदरसिंग, राजा वडिंग, मणिक्कम टागोर, गुरुजीतसिंह औजला, किरणकुमार रेड्डी, प्रशांत पडोळे, डीन कुरियाकोस आणि एस. वेंकटेशन यांचा समावेश होता. सोमवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या दालनात झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत या आठ खासदारांचे निलंबन मागे घेण्यावर सहमती झाली होती. त्यानुसार मंगळवारी किरेन रिजिजू यांनी निलंबन मागे घेण्याचा प्रस्ताव सभागृहात मांडला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेच्या दरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणावरुन उदभवलेल्या गदारोळात विरोधी पक्षांच्या खासदारांनी अध्यक्षांच्या आसनासमोर धाव घेत घोषणाबाजी केली, तसेच कागद फाडत त्याचे तुकडे अध्यक्षांच्या आसनाच्या दिशेने भिरकावले होते. या असांसदीय कृत्याच्या निषेधार्थ या आठ खासदारांना ३ फेब्रुवारीला अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित करण्यात आले होते. निलंबन मागे घेण्यात आल्यानंतर आठ सदस्यांनी संसदभवन परिसरातील महात्मा गांधींच्या प्रतिमेला माल्यार्पण करत अभिवादन केले.

## चित्रपट वार्ता

### रणवीरसिंहचा बॉक्स ऑफिसवर धमाका




**मुंबई** : बॉलिवूडचा सुपरस्टार रणवीरसिंह पुन्हा एकदा चर्चेत आहे. त्याचा आगामी चित्रपट 'धुरंधरः द रिव्हेंज' रिलीज होण्यापूर्वीच बॉक्स ऑफिसवर विक्रम प्रस्थापित करत आहे. अ‍ॅडव्हान्स बुकिंगमध्ये हा चित्रपट जागतिक स्तरावर १०० कोटींवर पोहोचला आहे, जे बॉलिवूडसाठी नवीन इतिहास म्हणता येईल. भारताबरोबरच अमेरिका, ब्रिटन आणि आखाती देशांमध्येही प्रेक्षकांनी तिकीट खरेदीस प्रचंड उत्सुकता दाखवली. चित्रपटाचा ट्रेलर आणि गाण्यांना मिळालेला जबरदस्त प्रतिसाद, तसेच रणवीरच्या अभिनयाची क्रेझ यामुळे हा बॉक्स ऑफिसचा आकडा थक्क करणारा ठरला आहे. 'धुरंधर २' हा हाय-ऑक्टेन ॲक्शन ड्रामा असून रणवीर पुन्हा हमजा अलीच्या आक्रमक रूपात दिसणार आहे. एकंदरीत, रणवीरसिंहने पुन्हा बॉक्स ऑफिसचा बादशाह ठरल्याचे सिद्ध केले आहे,. ■

### शिल्पा शेट्टीला हायकोर्टाचा दिलासा



**मुंबई** : अभिनेत्री शिल्पा शेट्टी हिच्याशी संबंधित डीपफेक व्हिडिओ आणि फोटो प्रकरणात मुंबई हायकोर्टाने महत्त्वाचा निर्णय देत तिला मोठा दिलासा दिला आहे. काही महिन्यांपूर्वी तिचे बनावट (डीपफेक) व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. हे कंटेंट तिच्या परवानगीशिवाय तयार करण्यात आले होते, त्यामुळे तिची प्रतिमा मलिन होत असल्याचा दावा करत तिने न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणावर सुनावणी करताना न्यायालयाने संबंधित वेबसाईट्स आणि व्यक्तींना हे सर्व आक्षेपार्ह व्हिडिओ, फोटो आणि लिंक ८ दिवसांच्या आत हटवण्याचे आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही व्यक्तीची, विशेषतः महिलेची प्रतिमा अशा प्रकारे सादर केली जाऊ नये ज्यामुळे तिच्या सन्मानाला धक्का पोहचेल. या घटनांनंतर अनेक सेलिब्रिटींनी या प्रकाराचा निषेध केला आहे. अमिताभ बच्चन यांनीही दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. या प्रकरणामुळे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या चुकीच्या वापराबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे. ■

### 'सरके चुनर तेरी सरके' गाणे हटवले



**मुंबई** : बॉलिवूड अभिनेत्री आणि नृत्यांगना नोरा फतेहीच्या 'सरके चुनर तेरी सरके' या नवीन गाण्यामुळे सोशल मीडियावर वाद निर्माण झाला आहे. केडी: द डेव्हिल या चित्रपटासाठी प्रमोशनल ट्रॅक म्हणून प्रदर्शित झालेल्या या गाण्याचा व्हिडिओ १६ मार्चपर्यंत यूट्यूबवर उपलब्ध होता, परंतु १७ मार्चच्या सकाळी तो काढून टाकण्यात आला. आता मूळ लिंकवर क्लिक केल्यावर, 'व्हिडिओ अनुपलब्ध आहे. हा व्हिडिओ खाजगी आहे.' असा संदेश दिसतो. सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर टीका झाल्यानंतर चित्रपटाच्या निर्मात्यांनी हे गाणे खाजगी केले. हे गाणे एका डान्स बारच्या पार्श्वभूमीवर चित्रित करण्यात आले होते, ज्यात नोरा घागरा-चोली घालून नर्तकांच्या साथीने नृत्य करत आहे. नोराची पदर खाली टाकण्याची आणि उचलण्याची एक वैशिष्ट्यपूर्ण हुक स्टेप व्हायरल झाली होती, परंतु अनेक दर्शकांनी ती अश्लील असल्याचे सांगत त्यावर टीका केली. ■



मायानगरी मुंबईत मंगळवारी झालेल्या एका कार्यक्रमाला उपस्थित असलेला अभिनेता अंगद बेदी, अभिनेत्री नेहा धुपीया आणि रिया चक्रवर्ती

# सासू-साळ्याची हत्या करणारा जावई चकमकीत ठार

### गोळीबारात दोन कॉन्स्टेबलही जखमी

◆ **बरेली, १७ मार्च**

सासू व साळ्यावर चाकूने सपासप वार करुन त्यांची हत्या करणारा जावई पोलिस चकमकीत ठार झाला. ही घटना बरेलीमध्ये सोमवारी भरपंचायतीत घडली होती. या दुहेरी हत्याकांडानंतर तीन पोलिस पथके आरोपीचा शोध घेत होती. मंगळवारी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी इज्जतनगर परिसरात आरोपीला घेरले. आरोपी अफसर खानने पोलिस पथकावर गोळीबार केला. प्रत्युत्तरात केलेल्या गोळीबारात आरोपी जखमी झाला. त्याला जिल्हा रूग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. घटनास्थळावरुन एक पिस्तूल आणि चाकूसह दहा रिकामी काडतुसे जप्त करण्यात आली. या चकमकीत दोन कॉन्स्टेबलही जखमी झाले.

इज्जतनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहपुरा चौधरी गावात कौटुंबिक वाद मिटवण्यासाठी भरलेल्या पंचायतीदरम्यान अफसर खानने त्याची सासू अस्मा, मेहुणा आदिल आणि पत्नी सायमावर चाकूने हल्ला केला. यात अस्मा आणि आदिलचा मृत्यू झाला, तर सायमाची प्रकृती गंभीर आहे. घटनेनंतर, आरोपी पळून गेला. आरोपीचा शोध घेण्यासाठी तीन पथके तैनात करण्यात आली होती. मंगळवारी पहाटे झालेल्या चकमकीत पोलिसांनी त्याला ठार केले. अफसर खानचे २०१७ मध्ये त्याची चुलत बहीण सायमाशी प्रेमविवाह झाला होता. त्यांना फैज आणि आयशा ही दोन मुले आहेत.

# मूल दत्तक घेणाऱ्या मातांनाही प्रसूती रजेचा हक्क

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय



◆ **नवी दिल्ली, १७ मार्च**

सर्वोच्च न्यायालयाने दत्तक मातांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. दत्तक मूल हे सुद्धा मातृत्व हक्कांचा एक भाग आहे. त्यामुळे मुलाच्या वयाची पर्वा न करता कोणत्याही महिलेला १२ आठवड्यांची प्रसूती रजा नाकारली जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

विशेष म्हणजे, २०२० च्या सामाजिक सुरक्षा संहितेच्या कलम ६०(४) नुसार पूर्वी असे म्हटले होते की, केवळ तीन महिन्यांपेक्षा कमी वयाच्या मुलांना दत्तक घेणाऱ्या मातांनाच १२ आठवड्यांची रजा मिळेल. त्यामुळे मोठ्या मुलांना दत्तक घेणाऱ्या मातांना मातृत्व लाभांपासून वंचित ठेवले जात होते. सर्वोच्च न्यायालयाने याला अन्यायकारक आणि संविधानाच्या कलम १४ (समानतेचा हक्क आणि कलम २१ (जीवन आणि स्वातंत्र्याचा हक्क)चे उल्लंघन म्हटले आहे. न्यायालयाने पुढे सांगितले, दत्तक माता आणि जैविक माता यांच्यात फरक असला तरी सर्व मातांना समान हक्क असले पाहिजेत. कुटुंब निर्मितीचे गैर-जैविक प्रकार (जसे की दत्तक घेणे) हे जैविक प्रकारांइतकेच कायदेशीर आहेत. दत्तक मूल हे जैविक मुलापेक्षा वेगळे नसते. प्रसूती रजा हा एक मूलभूत मानवाधिकार आहे. कर्नाटकच्या वकील हंसनंदिनी नंदुरी यांनी या तरतुदीला आव्हान दिले. २०१७ मध्ये, त्यांनी एक साडेचार वर्षांची मुलगी आणि तिचा दोन वर्षांचा भाऊ या दोघांना दत्तक घेतले. जेव्हा त्यांनी त्यांच्या नियोक्त्याकडे प्रसूती रजेची मागणी केली तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, प्रत्येक मुलासाठी त्यांना फक्त सहा आठवड्यांची रजा मिळेल. कारण मुले तीन महिन्यांची वयोमर्यादा पूर्ण करत नाहीत. नंदुरी यांनी याचिकेत म्हटले की, हा कायदा दत्तक माता आणि मुलांविरुद्ध भेदभाव करतो. हे अन्यायकारक, मनमानी आणि घटनाबाह्य आहे, असा त्यांनी युक्तिवाद केला.

### पितृत्व रजेचा सामाजिक सुरक्षेत समावेश करा

पितृत्व रजेवर टिप्पणी करत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला पितृत्व रजेला सामाजिक सुरक्षेचा भाग म्हणून मान्यता देऊन कायद्यात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. याचा अर्थ असा की, आता वडील बालसंगोपन रजेसाठी पात्र असतील. हा निर्णय वकील हंसनंदिनी नंदुरी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर आला आहे. ■

### न्यायालयाने आदेशात काय सांगितले?

**न्यायालयाने आदेशात सांगितले की, आता, दत्तक मातांना मुलाच्या वयाचा विचार न करता १२ आठवड्यांची प्रसूती रजा मिळेल. मूल जैविक असो वा दत्तक, सर्व मातांना समान हक्क आहेत. न्यायालयाने केंद्र सरकारला पितृत्व रजेचा कायद्यात समावेश करण्याचेही निर्देश दिले. या निर्णयामुळे दत्तक मातांना आता त्यांच्या मुलाच्या वयाचा विचार न करता पूर्ण प्रसूती लाभ मिळतील. महिलांचे हक्क, मुलांचे कल्याण आणि समानता यांना चालना देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जातो.** ■

## अग्रलेख...

# धर्मो रक्षति रक्षितः...

**'धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ।
तस्माद्धर्मो न हन्तव्यो मा नो धर्मो हतोऽवधीत् ॥'**

धर्म हा शब्द ऐकला की अनेकांच्या डोळ्यांसमोर केवळ पूजा, प्रार्थना, उपासना किंवा आचार-विचार येतात. परंतु, भारतीय परंपरेत धर्म हा केवळ श्रद्धेचा किंवा कर्मकांडाचा विषय नाही; तो आपल्या समाजरचनेचा कणा आहे, तो कर्तव्याचा मार्ग आहे आणि नैतिकतेचा आधारही. या श्लोकात मांडलेला विचार अत्यंत साधा आहे. तो असा की, जो धर्माचा नाश करतो, धर्म त्याचाच नाश करतो; आणि जो धर्माचे रक्षण करतो, त्याचे रक्षण धर्म करतो. त्यामुळे धर्माचे पालन करणे म्हणजे केवळ स्वतःच्या श्रद्धेचे रक्षण नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या संतुलनाचे रक्षण करणे होय. धर्माचा अर्थ विकृत स्वरूपात मांडण्याचे, त्याचा वापर स्वार्थासाठी करण्याचे आणि समाजात फूट पाडण्यासाठी त्याचा गैरवापर करण्याचे प्रकार वाढताना दिसतात. अशा वेळी सरकारने हस्तक्षेप करणे हा अधिकारांचा नव्हे, तर कर्तव्याचा विषय ठरतो. या पृष्ठभूमीवर विधिमंडळात मांडण्यात आलेल्या महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक-२०२६ कडे सरकार बजावत असलेल्या सामाजिक कर्तव्याचा भाग म्हणून पाहिले पाहिजे. एखादी व्यक्ती धार्मिक आहे किंवा ती एखादा धर्म मानते, याचा लौकिक अर्थ ती व्यक्ती चांगली वागते किंवा पूजापाठ करणारी आहे, असा घेतला जाऊ शकते. खऱ्या अर्थाने धर्म पालनाचा अर्थ होतो चांगले वर्तन आणि चांगल्या गोष्टींचे संवर्धन. धर्म म्हणजे सत्य, कर्तव्य, संयम, न्याय आणि समन्वय यांचे मिश्रण. धर्माच्या नावाखाली फसवणूक, दबाव, भीती किंवा प्रलोभन यांचा वापर केला जातो, तेव्हा तो धर्म नव्हे तर अधर्म बनतो. भारतीय परंपरेत करुणा आणि सहिष्णुता यांना महत्त्व दिले गेले आहे, पण त्याचबरोबर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शिकवणही दिली आहे. म्हणूनच, समाजात जेव्हा धर्माच्या नावाखाली चुकीचे कृत्य घडते, तेव्हा त्याला आळा घालणे ही देखील धर्माचीच सेवा ठरते. नवे विधेयक ही त्या प्रकारची धर्म सेवा आणि समाज सेवा होय.

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात विविध धर्म, संस्कृती आणि परंपरा एकत्र नांदतात. ती आपली ताकद आहे. मात्र, या विविधतेचा गैरफायदा घेऊन कुणी लोकांची दिशाभूल करीत असेल, दबाव टाकत असेल किंवा आमिषे दाखवून त्यांच्या श्रद्धावंत मानसिकतेचा फायदा घेत असेल तर त्यातून त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आघात होतो आणि समाजाच्या संतुलनालाही धक्का बसतो, हे लक्षात घेतले पाहिजे. धर्मांतर हा वैयक्तिक निर्णय नसून परिस्थितीचा परिणाम असतो, हे सांगणाऱ्या अनेक घटना आपल्या भोवताली घडत असतात. भीती, फसवणूक किंवा प्रलोभन यांचा परिणाम म्हणून धर्मांतर केल्याची उदाहरणेही आहेतच. तसे घडू नये यासाठी यासंदर्भात स्पष्ट कायदेशीर चौकट असणे अत्यावश्यक होते. ती उणीव नव्या कायद्याने भरून निघणार आहे. भारतीय संविधानात प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले आहे. पण त्याच वेळी, हे स्वातंत्र्य कुणाच्या फसवणुकीचे साधन बनू नये, याचीही काळजी घेणेही आवश्यक आहे. नवीन विधेयक याच संतुलनावर आधारित आहे. ते कोणाच्याही श्रद्धेवर बंधने घालत नाही; उलट खऱ्या अर्थाने ती स्वतंत्र राहावी यासाठी संरक्षण देणारे हे विधेयक आहे. एखाद्या व्यक्तीने पूर्ण विचारपूर्वक, कोणत्याही दबावाशिवाय आपला धार्मिक मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला असेल तर त्याला कुणीही अडवणार नाही. मात्र, तो निर्णय दबावाखाली घेतला जात असेल, तर त्याला थांबविणे ही सरकारची जबाबदारी ठरते. त्याची तजवीज करणारा हा कायदा आहे.

वरकरणी धर्म बदलल्याने फार मोठे नुकसान किंवा फायदा होतो, असे लोकांना वाटत नाही. प्रत्यक्षात अनेकांना धर्म परिवर्तनाच्या नंतर प्रचंड मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. त्यांचे पालन-पोषण ज्या वातावरणात झालेले असते, त्याहून अगदी वेगळ्या वातावरणात, वेगळ्या समुदायात जुळवून घेणे सोपे नाही. शिवाय, काही वेळा आमिष किंवा जुलूम या घटनांच्या मागे असतो, हेही दिसते. त्यामुळेच अशा निर्णयांसाठी प्रक्रिया निर्धारित करण्यात आली आहे. ती स्वातंत्र्याच्या नियंत्रणासाठी नाही. ती आहे-संबंधित व्यक्तीने धर्म परिवर्तनाचा निर्णय पूर्णपणे स्वेच्छेने घेतलेला आहे किंवा नाही, याची खातरजमा करण्यासाठी. त्यामुळे कुणी कितीही बोंबा ठोकत असले, तरी हा कायदा कुणाची अडवणूक करण्यासाठी नव्हे, तर भाबड्या माणसांची फसवणूक होऊ नये, यासाठी आणला जात आहे, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

या विधेयकातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कुटुंबाशी संबंधित तरतुदी. धर्मांतराच्या घटनांमुळे अनेकदा कुटुंबांमध्ये तणाव निर्माण होतो. विशेषतः अशा घटनांमध्ये फसवणूक किंवा दबाव असतो, तेव्हा त्याचे परिणाम गंभीर होतात. अशा स्थितीत मुलांच्या हक्कांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. समाजाचा पाया असलेल्या कुटुंबव्यवस्थेची स्थिरता टिकविण्यासाठी अशा तरतुदींची गरज होती. या कायद्यामुळे मुलांचे हित, त्यांचे अधिकार आणि त्यांचे भविष्य अधिक सुरक्षित होणार आहे. एखाद्या व्यक्तीच्या धार्मिक विचारात बदल घडवून आणण्याचा संबंध देशाची वीण विस्कटून टाकण्याच्या उद्देशाशी असेल तर त्याला आळा घातलाच पाहिजे. कायद्याचा उद्देश केवळ मार्गदर्शन करणे नसतो. आवश्यक तेथे प्रतिबंध घालणे हेही कायद्याचे काम आहे. त्यासाठीची व्यवस्था या कायद्यात आहे. जे लोक प्रामाणिकपणे वागतात, त्यांना या कायद्याची भीती वाटण्याचे कारण नाही. पण जे लोक धर्माच्या नावाखाली चुकीचे कृत्य करतात, त्यांच्यासाठी 'ही भूमी सहिष्णु असली तरी दुर्बल नाही' असा या विधेयकाचा सांगावा आहे. आजच्या काळात अनेक गोष्टी वैयक्तिक पातळीवर न होता संघटित पद्धतीने घडतात. त्यामुळे अशा गैरप्रकारांमध्ये संस्थांचा सहभाग असेल, तर त्यावरही कारवाई होणे आवश्यक आहे. या कायद्यातील तरतुदी अशा प्रकारच्या रॅकेट्सना रोखण्यासाठी उपयुक्त आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे- हे विधेयक महाराष्ट्र सरकारने अचानक आणलेले नाही. त्यामागे सखोल अभ्यास, विविध राज्यांतील अनुभव आणि कायदेशीर विश्लेषणाचे पाठबळ आहे. हे विधेयक केवळ भावनिक प्रतिक्रियेचा भाग म्हणून आलेले नाही. ते विचारपूर्वक उचललेले पाऊल आहे. समाजात दीर्घकालीन स्थिरता निर्माण करण्यासाठी अशा कायद्यांची गरज असते. त्यामुळे समस्यांवर प्राथमिक उपाय करणे शक्य होते आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारीही होत असते. शासकाने एका धर्माच्या मागे उभे राहू नये, हे आपल्या राज्य व्यवस्थेचे तत्त्व असले, तरी समाजाचे व्यापक हित सांभाळण्यासाठी काही निर्णय घ्यावे लागतात. हा निर्णय त्यातलाच आहे. तो कोणत्याही एका धर्माच्या बाजूने किंवा विरोधात नाही. जे कुणी वाममार्गाने धर्म परिवर्तन घडवून आणत असतील त्यांना या कायद्याने चाप बसेल, हे मात्र नक्की. कोणताही मोठा निर्णय घेतला की त्यावर टीका होतेच. काही जणांना हा कायदा व्यक्तींच्या स्वातंत्र्यावर बंधन घालणारा वाटू शकतो. पण वस्तुस्थिती अशी आहे की, हा कायदा कुणाचेही स्वातंत्र्य मर्यादित करणारा नसून, स्वातंत्र्याचे संरक्षण करणारा आहे. स्वातंत्र्य आणि जबाबदारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. आपल्या स्वातंत्र्याचा वापर इतरांच्या हक्कांवर आघात करण्यासाठी केला जात असेल, तर त्यावर नियंत्रण आवश्यक असते. या कायद्याच्या अधिष्ठानी असलेले तत्त्व हेच होय. धर्म हा कोणाच्याही स्वार्थासाठी वापरण्याचा विषय नाही. तो प्रत्येकाच्या अंतःकरणाशी जोडलेला आहे आणि त्याचा आदर राखला पाहिजे. हा नवा कायदा त्या आदराचे संरक्षण करणारा, लोकांना आपल्या श्रद्धेप्रति अधिक सजग बनविणारा आणि समाजात विश्वासाची भावना निर्माण करणारा आहे. धर्म हा समाजाच्या अस्तित्वाचा पाया आहे. तो पाया पोखरण्याचा प्रयत्न कुणी करीत असेल तर त्याला रोखले पाहिजेच. 'धर्मो रक्षति रक्षितः' या सूत्रातील आवाहन हेच आहे आणि त्यामुळे हे विधेयक पूर्णपणे योग्य व समर्थनीय आहे.

## विशेष

# भारताची ऊर्जा भविष्योन्मुख वाटचाल

**प्रा. सुखदेव बखळे**

भारताने अणुऊर्जा क्षेत्रात धोरणात्मक बदल करीत 'सस्टेनेबल हार्नेसिंग अँड अॅडव्हान्समेंट न्यूक्लिअर टेक्नॉलॉजी फॉर इंडिया' (शांती अॅक्ट २०२५) हा महत्त्वाचा कायदा लागू केला आहे. हा कायदा लागू करताना केंद्र सरकारने 'अॅटॉमेटिक एनर्जी अॅक्ट, १९६२' आणि 'सिव्हिल लायबेलिटी फॉर न्यूक्लिअर डॅमेज अॅक्ट २०१०' हे दोन जुने कायदे रद्द करून त्याऐवजी एकसंध आणि आधुनिक कायदेशीर चौकट तयार केली आहे. त्यामुळे अणुऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक, नियमन आणि विकास यांना नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. भारतातील ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत आहे. पुढील दोन-तीन दशकांमध्ये देशातील वीजवापर दुप्पट होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. सौर आणि पवन ऊर्जा यासारख्या नवीकरणीय स्रोतांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असला, तरी त्यांची एक मर्यादा आहे. त्यांची उपलब्धता सतत स्थिर नसते. याउलट अणुऊर्जा हा स्थिर आणि सातत्यपूर्ण वीजपुरवठा करणारा स्रोत आहे. त्यामुळे ऊर्जा मिश्रणात अणुऊर्जेच्या वाटा वाढविणे हे भारताच्या दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाचे मानले जाते. सध्या भारताची अणुऊर्जा क्षमता सुमारे ८.७८ गीगावॉट आहे आणि देशातील एकूण वीज उत्पादनात तिचा वाटा सुमारे तीन टक्के आहे. हा वाटा वाढविण्यासाठी सरकारने महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित केले आहे. २०४७ पर्यंत १०० गीगावॉट अणुऊर्जा क्षमता निर्माण करण्यात येणार आहे. या पृष्ठभूमीवर तयार करण्यात आलेला 'शांती कायदा' हा केवळ कायद्यांचे एकत्रीकरण नसून अणुऊर्जा क्षेत्राच्या संपूर्ण रचनेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे.

शांती कायद्याची व्याप्ती तीन प्रमुख स्तरांवर दिसते. त्यात अणुऊर्जा क्षेत्राचे नियंत्रित उदारीकरण, नियामक व्यवस्था मजबूत करणे आणि गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण तयार करणे, यांचा समावेश आहे. नवीन कायद्यामुळे भारतीय खाजगी कंपन्या, संयुक्त उपक्रम आणि इतर मान्य संस्थांना अणुऊर्जा प्रकल्प उभारणे, संचालन करणे आणि बंद करणे यासाठी परवाना घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तथापि, काही अत्यंत संवेदनशील क्षेत्रे अजूनही केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालीच ठेवण्यात आली आहेत. त्यात युरेनियम समृद्धीकरण, अणुइंधन पुनर्प्रक्रिया, उच्चस्तरीय अणुकचरा व्यवस्थापन, जड पाण्याचे उत्पादन यांचा समावेश आहे. यामुळे राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित बाबींवर सरकारी नियंत्रण कायम राहणार आहे. या कायद्यामुळे अणुऊर्जा क्षेत्रातील नियमन अधिक स्पष्ट आणि मजबूत करण्यात आले आहे. या अंतर्गत 'अॅटॉमिक एनर्जी रेग्युलेटरी बोर्ड' या संस्थेला प्रथमच वैधानिक दर्जा देण्यात आला आहे. परिणामी, या संस्थेची स्वायत्तता आणि विश्वासार्हता वाढण्याची अपेक्षा आहे. नवीन कायद्यात परवाने देणे, तपासणी करणे, उल्लंघनांवर कारवाई करणे आणि दंडात्मक कारवाई करणे यासाठी स्पष्ट प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे.

अणुऊर्जा प्रकल्पांबाबत गुंतवणूकदारांना सर्वाधिक चिंता असते, ती अपघाताच्या परिस्थितीमध्ये होणाऱ्या आर्थिक जबाबदारीची. पूर्वीच्या कायद्यानुसार ऑपरेटरची नुकसानभरपाई जबाबदारी १५ अब्ज रुपये इतकी मर्यादित होती; परंतु पुरवठादारांविरुद्ध कारवाईच्या तरतुदींमुळे आंतरराष्ट्रीय कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास कचरू लागल्या. नवीन कायद्याने स्तरानुसार नुकसानभरपाई प्रणाली लागू केली आहे. मोठ्या रिॲक्टरसाठी ही मर्यादा ३० अब्ज रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे, तर लहान प्रकल्पांसाठी कमी मर्यादा ठेवण्यात आली आहे. याशिवाय स्वतंत्र अणुऊर्जा नुकसानभरपाई निधी तयार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. भारताने अणुऊर्जा विस्तारासाठी दीर्घकालीन योजना आखली आहे. सरकारच्या मते २०३१-३२ पर्यंत अणुऊर्जा क्षमता २२ गीगावॉटपेक्षा अधिक होऊ शकते. यासाठी देशांतर्गत विकसित ७०० मेगावॉट रिॲक्टर, आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रकल्प आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

याचबरोबर लघु मॉड्युलर रिॲक्टर (एसएमआर) विकसित करण्यावरही सरकार भर देत आहे. या क्षेत्रात संशोधनाचे नेतृत्व 'भाभा अॅटॉमिक रिसर्च सेंटर'सारख्या संस्थेकडे आहे. आज जगभर ऊर्जा संक्रमणाची प्रक्रिया सुरू आहे. सौर आणि पवन ऊर्जेचा विस्तार वेगाने होत असला, तरी त्या स्रोतांची उपलब्धता हवामानावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत अणुऊर्जा स्थिर, कमी कार्बन उत्सर्जन करणारा आणि मोठ्या प्रमाणावर उपलब्ध ऊर्जा स्रोत म्हणून महत्त्वाची ठरते. भारताच्या ऊर्जा धोरणात अणुऊर्जेला आता नवी भूमिका दिली जात आहे, ती नवीकरणीय ऊर्जेची स्पर्धक नसून पूरक स्रोत म्हणून पाहिली जात आहे. 'शांती कायदा' लागू झाल्यानंतर अणुऊर्जा क्षेत्रात गुंतवणुकीच्या नवीन संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. खाजगी कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठी भारताचे अणुऊर्जा क्षेत्र अधिक आकर्षक बनू शकते. यामुळे नवीन प्रकल्पांची गती वाढू शकते. तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना मिळू शकते. देशांतर्गत उत्पादन आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळू शकते.काही महत्त्वाची आव्हाने अजूनही कायम आहेत. त्यात प्रामुख्याने अणुऊर्जा प्रकल्पांचा प्रचंड खर्च, स्थानिक लोकांचा विरोध, पर्यावरणीय चिंता, नियामक प्रक्रियेत होणारा विलंब यावर प्रभावी उपाययोजना केल्याशिवाय अणुऊर्जा विस्तार अपेक्षित गतीने होणे कठीण ठरू शकते. 'शांती कायदा २०२५' हा भारताच्या अणुऊर्जा धोरणातील महत्त्वाचा टप्पा आहे. ऊर्जा सुरक्षा, हवामान बदल आणि आर्थिक विकास या तीन मोठ्या आव्हानांच्या पृष्ठभूमीवर हा कायदा भविष्यातील ऊर्जा धोरणाची दिशा ठरवू शकतो. खाजगी क्षेत्राचा सहभाग, नियामक संरचनेची बळकटी, गुंतवणूक सुलभता आणि तांत्रिक प्रगती या माध्यमातून अणुऊर्जा क्षेत्राला नवे आयाम मिळण्याची शक्यता आहे; मात्र या धोरणाचे खरे यश अंमलबजावणीवर अवलंबून राहणार आहे. योग्य नियोजन, पारदर्शक प्रशासन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा संगम साधला गेला तर भारताच्या ऊर्जा भवितव्यात अणुऊर्जा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरू शकते.

कायद्यांचे एकत्रीकरणच नव्हे, तर अणुऊर्जा क्षेत्राच्या वाढीस अडथळा ठरणाऱ्या काही संरचनात्मक समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्नही या कायद्यात करण्यात आला आहे. त्यात सरकारी नियंत्रणाखाली असलेले संचालन मॉडेल, गुंतवणूक रोखणारी नुकसानभरपाईची जबाबदारी व्यवस्था, एका बंद, एकमेव ऑपरेटरवर आधारित नियामक रचना हे पूर्वी अडथळे ठरत होते. नवीन कायदा या सर्व बाबींमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. पूर्वी ऑपरेटरला दोषपूर्ण उपकरणांबाबत पुरवठादारांविरुद्ध थेट कारवाई करण्याचा अधिकार होता. यामुळे पुरवठादारांना मोठ्या जोखमीला सामोरे जावे लागत होते आणि अनेक परदेशी कंपन्या भारतात येण्यास कचरू लागल्या.

नवीन कायद्यानुसार फक्त करारात नमूद असल्यास किंवा जाणीवपूर्वक चुकीचे कृत्य सिद्ध झाल्यास पुरवठादारांविरुद्ध कारवाई करता येईल. यामुळे भारताची कायदेशीर चौकट आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत करण्यात आली आहे. कायद्यात नवीन तक्रार निवारण यंत्रणाही तयार करण्यात आली आहे. यामध्ये अणुऊर्जा तक्रार सल्लागार परिषद, नियामक निर्णयांवर अपील करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण, नुकसानभरपाईसाठी विशेष दावा आयुक्त आणि दावा आयोग यांचा समावेश आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात २०० अब्ज रुपये लघु मॉड्युलर रिॲक्टर (एसएमआर) विकसित करण्यासाठी देण्यात आले आहेत. २०३३ पर्यंत किमान पाच स्वदेशी 'एसएमआर' कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. 'शांती कायदा २०२५' हा भारताच्या अणुऊर्जा धोरणातील महत्त्वाचा वळणबिंदू ठरू शकतो. कायद्यांचे एकत्रीकरण, खाजगी क्षेत्राचा सहभाग, नुकसानभरपाई व्यवस्थेतील सुधारणा आणि नियामक संस्थेची बळकटी या माध्यमातून अणुऊर्जा क्षेत्राला अधिक सक्षम आणि विस्तारक्षम बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ऊर्जा सुरक्षेसोबतच हवामान बदलाच्या पृष्ठभूमीवर स्वच्छ आणि स्थिर ऊर्जेची गरज वाढत असताना हा कायदा भारताच्या ऊर्जा भवितव्यासाठी महत्त्वाची पायाभरणी ठरू शकतो.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# दोष हा कुणाचा?

विकृती हा मानवी स्वभावाचा एक भाग मानला गेला तरी त्या विकृत वृत्तीला जोपासले गेले तर ती अनेकांच्या दृष्टीने कशी घातक ठरू शकते. ही जाणीव सर्वांना असूनही जर अशा वृत्ती जोपासल्या जात असतील तर मात्र समाजभान गमावले गेले आहे, असेच म्हणावे लागेल. जी गोष्ट समाजातील प्रत्येकाला शरमेने मान खाली घालावी लागेल, इतकी किळसवाणी असेल आणि ती शासन-प्रशासनाच्या लेखी अंशतः चूक असेल तर मग मात्र विकृत प्रवृत्तींचे पीक येऊन विध्वंस करणार, हे नक्की.

विकृती हा मानवी स्वभावाचा भाग म्हणून आपण त्याला सोडून दिले तर ती समाजाला पोखरत जाते, हे तेवढेच खरे.



एखाद्या व्यक्तीच्या स्वभावात हा 'विकृत' योग असेल तर त्याच्यावर उपाययोजना करण्याची व्यवस्थाही आपल्या समाजात आहे. पण आम्ही तो त्याचा वैयक्तिक विषय म्हणून डोळेझाक करतो आणि बरेचदा तीच विकृती समाजात संवेदनशील विषय बनतात. मान्यच आहे, आम्ही कुणाच्या वैयक्तिक आयुष्यात ढवळाढवळ करून वळण लावू शकत नाही; किमान जेव्हा संधी मिळेल, तेव्हा असलेल्या अधिकारांचा वापर करून अशा घातक वृत्तींना ठेचून नक्कीच काढू शकतो. हा विषय एवढ्यासाठीच आहे. १० दिवसांपूर्वी जो काही प्रकार भंडारा जिल्ह्यात उघड झाला, तो प्रत्येकाला शरमेने मान खाली घालण्यास लावणारा होता. जो आमच्या आयुष्याला दिशा देतो, ज्याच्याकडून आम्हाला संस्कारांची अपेक्षा आहे. आई-वडिलानंतर जो आमचा एकमेव गुरू असतो, अशा शिक्षकाचा प्रताप विकृतीलाही लाजवेल असाच होता. ज्यांनी जग पाहिलं नाही, अशा चिमुकल्यांच्या शरीराशी खेळून आपली किळसवाणी भूक भागविणाऱ्या शिक्षकाचे बाहेर आलेले प्रताप शिक्षकी पेशालाही कलंकित करून गेले. हद्द म्हणजे, हे प्रकार पुढे आल्यानंतर ग्रामस्थांनी शिक्षकाला चोप दिला, तर तोच शिक्षक 'झालं का तुमचं मारून' म्हणून निर्विकारपणे बोलून जात असेल तर या धाडसामागे कोण? याचा विचार व्हायलाच हवा! एक नव्हे, पाचदा या महाशयांनी प्रताप केले. मार खाल्ला. तुरुंगवास झाला. पण ते नोकरीत कायम आहेत. हे कसं? याचं कोड काही उलगडलेलं नाही. इतके गंभीर आरोप. दोषी असल्याचा अहवाल सर्वकाही विरोधात असताना प्रत्येक वेळी निलंबनानंतर नोकरीत पुन्हा समाविष्ट केला जाणारा हा शिक्षक इतका प्रभावी कसा असू शकतो? कदाचित पहिल्याच घटनेनंतर या वृत्तीला ठेचले असते तर आज निष्पाप पाच चिमुरड्यांच्या आयुष्याशी खेळण्याची हिंमत त्याची झाली नसती. सर्व काही विरोधात होते. पण तो न्यायालयातून निर्दोष सुटतो. त्यांचे वरिष्ठ अधिकारीही एवढ्या मोठ्या घटनांकडे अंशतः दोषी म्हणून पुन्हा त्याला नोकरीवर घेण्याचे आदेश काढतात आणि इथेच अशा वृत्तींना खतपाणी घातले जाते. १० वर्षांपूर्वी चुकांची जाणीव ठोसपणे करून दिली गेली असती, तर आम्हाला आज विकृत मानसिकतेवर चर्चा करावी लागली नसती. हा यंत्रणेचा दोष की अजून काही? हा अभ्यासाचा विषय असू शकतो, पण ज्यांच्या हातात अधिकार आहेत, त्यांना त्याची जाणीव होऊ नये, याचे नवल वाटते. मुलींच्या आयुष्याशी खेळणे हा जर अंशतः दोष असेल तर पूर्णतः दोष कोणता, हे अशा अधिकाऱ्यांनी स्पष्ट करायला नको का? हा अंशतः दोष हेच अशा वृत्तींची हिंमत वाढण्याचे मूळ कारण आहे. आमची यंत्रणा निद्रावस्थेत आहे. जोपर्यंत ही झापड डोळ्यावरून निघणार नाही, तोपर्यंत अशा विकृतांचे दोष हे अंशतःच असतील, हे नक्की! एका शिक्षकाने केलेले हे कृत्य शिक्षकी पेशाला लाजविणारे आहे. त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून टाकणारे आहे. पण शिक्षकांच्या एकाही संघटनेला अशा शिक्षकाचा निषेध करावा किंवा त्यावर कठोर कारवाई व्हावी, यासाठी मागणी करावी वाटले नाही. आम्ही आमच्या पेशाचे म्हणून आणखी किती संवेदना मेल्यागत वागणारा आहोत. एरवी लहानसहान गोष्टींसाठी रस्त्यावर उतरणाऱ्या या संघटना आज मात्र मूग गिळून बसल्या असतील तर विकृतीला त्यांनी दिलेला हा पाठिंबा तर नाही, असा प्रश्न पडतो. शिक्षकांच्या संघटना असोत किंवा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या वागण्याची पद्धत याच गोष्टी अनिल राऊतसारख्या शिक्षकांचे मनोबल वाढवितात आणि त्यांच्यातील विकृतीची जोपासना करतात. जोपासलेले हे विकृत मग कधीतरी समाजभान विसरून बेभान वागतात. या विकृत मानसिकतेला वेळीच ठेचले गेले नाही तर भविष्यात अनेक अनिल राऊत समाजापुढे आव्हान बनून उभे राहतील आणि मग यंत्रणाही हतबल होऊन सर्व तमाशा पाहत असतील. आज अनिल राऊतच्या निमित्ताने विकृत मानसिकतेला संपविण्यासाठी उदाहरण घालून देण्याची चांगली संधी आहे. दोष अंशतः की पूर्णतः याचे मूल्यमापन करीत बसण्यापेक्षा दोष समाजाला घातक हे हेरून कृती करण्याची ही वेळ आहे, असे वाटते!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# ब्रह्मवैवर्त पुराण

**प्रा. दिलीप जोशी**

'ब्रह्मवैवर्त' या नावातील 'वैवर्त' शब्द महत्त्वाचा आहे. वैवर्त शब्द विवर्तन शब्दसंबंधित आहे. विवर्तन म्हणजे चक्र किंवा चाकाचे फिरणे अर्थात परिवर्तन. सरळ आणि सोप्या भाषेत रूपांतरण, नित्यबदल, कायाकल्प किंवा अस्तित्व बदल होय. ब्रह्मवैवर्त म्हणजे ब्रह्माचे विवर्तन.

'ब्रह्मवैवर्त म्हणजे ब्रह्मणो विवर्तः ।'


या पुराणात ब्रह्म राधाकृष्ण रूपात विवर्तित झाले. ब्रह्म कृष्णरूपाने प्रकट झाले, नव्हे श्रीकृष्ण म्हणजेच ब्रह्म. '

विवर्तं ब्रह्मकात्स्नर्यं च कृष्णेन यत्र शौनक ।
ब्रह्मवैवर्तकं तेन प्रवदंति पुराविदः ॥'

कृष्णाचे आद्यविवर्त प्रकृती आहे. कृष्णाची आद्या प्रकृती श्रीराधा आहेत. हे ब्रह्मवैवर्त पुराण होय. हे पुराण चार खंडात विभागले आहे. ब्रह्मखंड, प्रकृती खंड, गणपती खंड आणि श्रीकृष्णजन्म खंड असे ते चार खंड आहेत. यातील पहिल्या ब्रह्मखंडात बीजरूप असलेल्या परब्रह्म परमात्म्याचे म्हणजे श्रीकृष्ण तत्त्व निरुपण आहे. दुसऱ्या प्रकृती खंडात प्रकृती स्वरूप परब्रह्म परमात्म्याची आद्याशक्ती श्रीराधा तत्त्वाचे आणि उपतत्त्व लक्ष्मी, दुर्गा, सरस्वती, सावित्री यांचे निरुपण आहे. तिसऱ्या गणपती खंडात परमात्म स्वरूप भगवान गणपती तत्त्वाचे निरुपण आहे. चौथ्या श्रीकृष्णजन्म खंडात भगवान श्रीकृष्ण लीला तत्त्वाचे निरुपण आहे. थोडक्यात ब्रह्मवैवर्त पुराणात भगवान श्रीकृष्ण आणि त्यांची अभिन्नस्वरूपा श्रीराधारासेश्वरी यांचे ब्रह्मस्वरूप आणि लीला वर्णन आहे.

नैमिषारण्यात शौनकादी ऋषी बसले असताना तिथे पुराणप्रवक्ते सूत लोमहर्षन महोदय आणि त्यांचे पुत्र उग्रश्रवा यांचे आगमन झाले. त्यांचे पाद्यपूजन करून शौनकादी ऋषींनी सूतनंदन उग्रश्रवा ज्यांना सौती असेही म्हणतात; त्यांना अद्‌भुत, अपूर्व आणि अभिष्ट पुराण सांगण्याची विनंती केली. सर्वांच्या विनंतीला मान देऊन सौती यांनी परब्रह्म परमात्म्याचे परात्पर स्वरूप म्हणजे भगवान श्रीकृष्ण. त्यांचे विवर्तन ज्या पुराणात सांगितले सांगितले ते ब्रह्मवैवर्त पुराण होय.

ब्रह्मवैवर्त पुराण श्रीकृष्णाने ब्रह्मदेवांना, ब्रह्मदेवांनी धर्माला, धर्माने आपला पुत्र नारायणाला, नारायणाने नारदांना, महर्षी नारदांनी व्यासांना, महर्षी व्यासांनी सूतनंदन सौती यांना सांगितले होते. या पुराणात सर्वप्रथम ब्रह्मखंड असून यात गोलोकातील भगवान श्रीकृष्ण यांचे महिमान आहे. श्रीकृष्ण हेच एकमात्र सत्य असून सर्वोच्च ब्रह्म आहे. त्यांच्यापासूनच सृष्टीचा प्रारंभ झाला. गोलोकात भगवान श्रीकृष्णाच्या वामभागातून श्रीराधा यांचे प्राकट्य, श्रीराधा यांच्या रोमातून गोपिकांचे निर्माण झाले. भगवान श्रीकृष्णानेच आदिशक्ती महालक्ष्मी, महासरस्वती प्रकट केल्या. शिवशक्ती विवाहही त्यांचीच इच्छा होय. ब्रह्मदेवाकडून सृष्टी निर्माण ही श्रीकृष्ण परमात्म्याच्याच इच्छेने झाली. वैकुंठ, शिवलोक, गोलोक यांचे शाश्वत स्थान या पुराणात दिले आहे. याच पुराणातील प्रकृती खंडात दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, सावित्री आणि श्रीराधा या पंचदेवी म्हणजे प्रकृती असून सृष्टी या पंचदेवीवर अवलंबून असल्याचे प्रारंभीच स्पष्ट केले. परिपूर्णतम श्रीकृष्ण आणि चिन्मयी श्रीराधा यांच्या दिव्य तेजातून विराटस्वरूप बालक म्हणजे श्रीमहाविष्णू निर्माण झाल्याची कथा या पुराणात आहे. याज्ञवल्क्य यांनी केलेली भगवती सरस्वती स्तुती, गंगा उत्पत्ती कथा, तुळशी कथा, तुळशी वृक्ष जन्म, शाळिग्राम पाषाण निर्मिती कथा विस्ताराने आली आहे. वेदजननी सावित्री स्तुती, सावित्री उपासनेने राजा अश्वपतींना कन्यारत्न, त्या कन्यारत्नाचे नाव सावित्री, सत्यवान सावित्री कथा या पुराणात आहे. भगवती लक्ष्मीचे समुद्रमंथनातून प्राकट्य, भगवती स्वाहा, स्वधा, दक्षिणा, षष्ठी, मंगलचंडी, मनसादेवी, आद्य गौमाता सुरभी यांचे उपाख्यान या पुराणात आहे. गणपती खंडात गणेश उत्पत्ती कथा, श्रीगणेशावर शनीचा दृष्टिपात, श्रीगणेशाला गजमुख लावण्याची कथा, गणपतींना अग्रपूजेचा मान, कार्तिकेय नंदी संवाद, गणेश यांची एकदंत होण्याची कथा, परशुराम कथा, गणेश स्तुती या पुराणात आहे. श्रीकृष्ण जन्म खंडात श्रीकृष्ण जन्म वृत्तांत, गोकुळात आगमन, बाललीला, रासलीला, मथुरागमन, कंसवध, द्वारकापुरी निर्माण, रुक्मिणी हरण इत्यादी श्रीकृष्ण चरित्र या पुराणात आहे. ब्रह्मवैवर्त पुराणातील तत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. इथे श्रीकृष्ण परमात्मा सर्वोपरी आहे. ते गोलोकधामात राहतात. त्यांच्या सोबत श्रीराधा आणि गोप-गोपिका राहतात. गोलोकधाम शिवलोक, वैकुंठ, भूलोकाच्याही वर आहे. जिथे जन्ममृत्यू जरा व्याधींना स्थान नाही. श्रीकृष्णाच्याच शरीरातून भगवान नारायण विष्णू आणि भगवान शिव प्रकट झाले. श्रीराधा ही श्रीकृष्णाच्या वामांगातून निर्माण झालेले व त्यांच्या हृदयात कायम निवासी असलेले कृष्णतत्त्वच आहे. श्रीराधा आद्याप्रकृती असून तिचे दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, सावित्री ही रूपे आहेत. तिच्यातूनच गंगा, तुलसी, मनसा, स्वाहा, स्वधा इत्यादी रूपे उत्पन्न झालीत. श्रीराधा श्रीकृष्णाची तर श्रीकृष्ण श्रीराधेची आराधना करतात. म्हणजे ते परस्पर आराधक आणि आराध्य आहेत.



'राधा भजति श्रीकृष्णम् स च तां च परस्परं ।
उभयोः सर्वसाम्यं च सदा संतो वदंति च ॥'

श्रीकृष्ण गोलोकात रासमंडलात असताना त्यांच्या वामभागातून उत्पन्न झाल्यामुळे श्रीराधा आयोनी आहेत. श्रीदामा यांच्या शापवाणीमुळे श्रीराधा यांना वाराहकल्पात गोकुळात श्रीवृषभानू आणि माता कलावती यांच्या पोटी जन्म घ्यावा लागला. असे असले तरी प्रत्यक्षात योगमायेने माता कलावतीच्या गर्भात वायू होता. जन्माच्या वेळी श्रीराधा तेथे स्वेच्छेने अयोनी प्रकट झाल्या. त्यांचे लग्न प्रसंगात त्यांचे पती श्रीरायान यांच्याशी श्रीराधा यांचा विवाह नसून श्रीराधा यांच्या छायारूपाशी विवाह झाला आणि त्या स्वयं अंतर्धान पावल्या. श्रीदामा यांच्या शापाने श्रीराधा यांना भूतलावर प्रकट व्हावे लागले; तद्वतच श्रीराधा यांच्या प्रतिशापाने श्रीदामा भूतलावर शंखचूड नावाच्या राक्षसरूपात जन्माला आले. त्यांचा विवाह तुळशी यांच्याशी झाला. तुळशीचे श्रीहरीकडून पातिव्रत्य भंग, शंखचूड वध, तुळशीचा श्रीहरीला श्राप, विष्णूचे शालिग्राम रूप तुळशीला हरिप्रिया म्हणून वरदान ही कथा या पुराणात दिली आहे. पुराण हा भारताचा इतिहास, भूगोल, परंपरा, संस्कृती सांगणारे वाङ्मय असून आपला वारसा आहे. त्यातही ब्रह्मवैवर्त पुराण अतीव रोचक, मधुर, ज्ञानवर्धक आणि कल्याणकारी आहे. त्याचा अभ्यास नव्या पिढीने केल्यास नवनीत निश्चित मिळेल.

९८२२२६२७३५

### माणूस माणसापासून दुरावतोय?

माणूस हा निसर्गतःच समाजप्रिय प्राणी आहे, माणूस कोणाकडे जात-येत नसला, तरी तो माणसांच्या वस्तीतच घर बांधतो. आज कामाच्या व्यापात आणि स्पर्धेच्या युगात प्रत्येक माणूस धावत आहे. उसंत घ्यायलाही तो विसरत आहे. त्यामुळे आपण आणि आपलं, ही वृत्ती बळावत चालली आहे. मग विचार येतो की, खरंच माणूस माणसापासून दूर चाललाय काय? या धावपळीच्या युगात कुटुंबातला प्रत्येक जण यंत्रासारखा पळतोय. घरातून बाहेर पडताना आपण कुटुंबीयांना घाईतच 'लव्ह यू', 'मिस यू' बस्स! एवढेच शिल्लक राहिले आहे. विचार करा, आपण आपल्या मुलांना दिवसातून एकदा तरी जवळ घेतो का? त्यांच्या केसातून मायेने हात फिरवतो का? नात्यांमधला औपचारिकपणा वाढला आहे.

तरुणाई नातेवाईकांनाही ओळखत नाही. कोणाशी, कोणते नाते हे त्यांना सांगता येत नाही. जेवढ्यास तेवढे ही वृत्ती वाढत आहे. यामुळे नात्यातील गोडवा, प्रेम लुप्त होतेय. वाढत चाललेला हा औपचारिकपणा कमी व्हायला हवा तरच माणसातले आपलेपण टिकून राहील. माणसांच्या गावात वा शहरातच तो वस्ती करतो. म्हणजे प्रत्यक्ष ओळखीत अथवा येता-जाता कोणाशी गप्पा मारण्यात तो रमत नसला, तरी आजूबाजूच्या माणसांचा कानोसा घेतच तो आपल्या कोषात आपले आयुष्य व्यतीत करीत असतो. नाण्याला जशा दोन बाजू असतात तशाच माणसांबाबत विचार करतानाही सर्व बाबींचा विचार करावा लागेल तरच आपण योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचू की खरंच माणूस माणसापासून दूर जातोय का?

**रूपाली जयदीप हिरवे**

### इच्छामरण : दया की हस्तक्षेप?

एखाद्या जिवाला होणाऱ्या वेदना सोसणे किंवा पाहणे अशक्य होते त्यावेळी इच्छ मरण मिळावे असे वाटते आणि असे वाटणे बरोबर आहे. प्रत्येकाचे जीवन हे दोन सिद्धांतावर आधारित असते. एक आहे कर्म-फल सिद्धांत आणि दुसरा पुनर्जन्म सिद्धांत! या सिद्धांतांचा सोपा अर्थ असा आहे की, प्रत्येक कर्माला फळ आहे आणि ते करणाऱ्या व्यक्तीला ते भोगावेच लागते. एका जन्मात ते भोगून झाले नाही तर त्यासाठी पुढचा जन्म मिळत असतो. आपला प्रत्येकाचा सध्याचा जन्म हा मागील अनेक जन्मातील योग्य-अयोग्य कृतींचे फळ उपभोगण्यासाठीच झालेला असतो. असाध्य आजार होणे किंवा अन्य कोणत्याही कारणांनी परिस्थिती असहनीय होणे आणि परिस्थितीत काही सुधारणा होणार नाही, असे चित्र असल्याने जीवन संपवावेसे वाटणे ही एक भावना आहे; विचार आहे. एका अर्थाने ती भगवंताच्या नियोजनात अज्ञानामुळे केलेली ढवळाढवळ आहे.

रस्त्यावर वाहन वाहतुकीच्या नियमांनुसार चालवले नाही तर आपल्याला शिक्षा होते तसेच भगवंताच्या नियमांचे उल्लंघन झाले तर शिक्षा होणारच आहे. स्वतःचे किंवा दुसऱ्याचे जीवन संपवणे हे भगवंताच्या नियमांचे उल्लंघनच आहे. मग यावर उपाय काय तेही हिंदू धर्माने सांगून ठेवले आहे. आपल्या जीवनाचा उद्देश फक्त आपल्या मागील जन्मांतील योग्य अयोग्य कृतींचे फळ म्हणजेच प्रारब्ध भोगणे एवढाच नाही तर चिरकाल टिकणाऱ्या आनंदाची प्राप्ती हा सुद्धा उद्देश आहे. आपले प्रारब्ध कितीही भयंकर असले तरी सच्चिदानंदस्वरूप असलेल्या भगवंतासमवेत मनाने राहून जीवन जगत असताना म्हणजेच आपले प्रारब्ध भोगून संपवताना आनंदी राहता येते. भगवंतासोबत मनाने कसे राहावे तर ते नामस्मरणाने सहज शक्य आहे. हाक मारली तर ती व्यक्ती मागे वळून पाहते तसेच आपण नामस्मरण सुरू केले तर भगवंत आपल्याकडे पाहतो. जीवन संपवावेसे वाटणे इतके ते भयानक असेल तर त्याला आपणच कारणीभूत आहोत, हे स्वीकारावे लागेल. पण ते आपल्या मनाने संपवले तर त्यासाठी भगवंताच्या कायद्यानुसार असलेल्या शिक्षा भोगायची तयारी आपल्याला ठेवावी लागेल. त्यापेक्षा नामस्मरणाची कास धरूया आणि जीवन आनंदात जगूया.

**छाया मिराशी**

## वाचक पत्रे

### पाण्याचे दुर्भिक्ष्य

१५ मार्च २०२६ च्या तरुण भारतात पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि १४ मार्चच्या अंकात विदर्भातील ८२ सिंचन प्रकल्पांपैकी केवळ १४ पूर्ण. उर्वरित ६८ प्रकल्प प्रगतिपथावर व ८ प्रकल्पांचे काम रखडले. उन्हाळा जेमतेम सुरू होत आहे तर काही गावांना टँकरने पाणी पुरवण्याची वेळ आलेली आहे. सद्यस्थितीत सुरू असलेल्या ६८ प्रकल्पांची एकूण अद्ययावत किंमत सुमारे १ लाख ४२ हजार कोटी रुपये इतकी असून मार्च २०२५ अखेर ५७ हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात आलेला आहे. सिंचन प्रकल्पांमुळे पिण्यासाठी पाण्याची सोय, पिकांसाठी सिंचनाची सोय व कारखान्यांसाठी पाण्याची सोय होत असते. सिंचन प्रकल्पांमुळे पूर नियंत्रण होत असते. काही सिंचन प्रकल्पामुळे वीज निर्मिती होत असते. अशी सिंचन प्रकल्पांची उपयुक्तता लक्षात घेता विदर्भातील ८२ सिंचन प्रकल्पांपैकी केवळ १४ पूर्ण झाले ही बाब चिंतनीय आहे. उपरोक्त आकडेवारी बघता विदर्भातील सिंचन प्रकल्पांचे पुनर्नियोजन करणे आवश्यक आहे असे वाटते. सिंचन प्रकल्प व पाणी अत्यंत महत्त्वाच्या बाबी असल्यामुळे याचे यथोचित नियोजन होणे जरुरी आहे.

**शशिकांत दलाल**

## महत्त्वाचे

### टॉमी फ्लीटवूडचा विजेतेपद कायम राखण्यावर भर

**नवी दिल्ली :** जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेला टॉमी फ्लीटवूड १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान



दिल्ली गोल्फ क्लबमध्ये होणाऱ्या डीपी वर्ल्ड इंडिया चॅम्पियनशिपमध्ये आपले विजेतेपदाचे कायम राखण्यासाठी पुनरागमन करणार आहे. गेल्या वर्षी या स्पर्धेच्या पहिल्याच हंगामात फ्लीटवूडने जागतिक दर्जाच्या खेळाडूंना पराभूत करून डीपी वर्ल्ड टूरवरील आपले आठवे विजेतेपद पटकावले होते. आता तो पुन्हा एकदा ४,००,००० डॉलर्स बक्षीस रकमेच्या या स्पर्धेत सहभागी होणार आहे. गेल्या हंगामात डीपी वर्ल्ड इंडिया चॅम्पियनशिपमध्ये माझा आठवडा अविश्वसनीय होता, असे फ्लीटवूडने एका प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. भारतात राहण्याचे अनेक फायदे आहेत, ज्यात लोकांचा स्नेह, शहराचे वातावरण, खाद्यपदार्थ आणि अशा आव्हानात्मक व धोरणात्मक कोर्सवर खेळण्याचा अनुभव यांचा समावेश आहे.

### भारतातील उदयोन्मुख क्रीडा स्टार्टअप परिस्थितीवर अहवाल

**नवी दिल्ली :** २०३० मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल खेळांसह अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन भारत करणार असल्याच्या पृष्ठभूमीवर, क्रीडा सचिव हरी रंजन राव यांनी भारताची क्रीडा स्टार्टअप परिसंस्था : सद्यस्थिती आणि उदयोन्मुख संधी नावाचा एक सर्वसमावेशक अहवाल प्रसिद्ध केला.

असोसिएशन फॉर स्पोर्ट्स इंडस्ट्री प्रोफेशनल्स (एएसआयपी) ने इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी, गाझियाबाद यांच्या सहकार्याने तयार केलेल्या या अहवालात, भारतातील क्रीडा स्टार्टअप क्षेत्राच्या सद्यस्थितीबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आहे. रंजन राव म्हणाले, संशोधन आणि सहकार्याच्या माध्यमातून भारताच्या क्रीडा उद्योगाला बळकट करण्याच्या एएसआयपीच्या प्रयत्नांमुळे मला प्रोत्साहन मिळाले आहे. या अहवालाचा क्रीडा क्षेत्राला निश्चितच फायदा होईल आणि क्रीडा मंत्रालय या निष्कर्षांचा वर्तमान आणि भविष्यात कसा उपयोग करता येईल, याचा शोध घेईल. एएसआयपीचे संस्थापक आणि अध्यक्ष शाजी प्रभाकरन म्हणाले की, हा अहवाल ज्ञान-आधारित क्रीडा परिसंस्थेचे संगोपन करण्याच्या एएसआयपीच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

### मंधानाचे अव्वल स्थान कायम, हरमनप्रीत सातव्या स्थानी

**दुबई :** भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर आयसीसी महिला एकदिवसीय क्रमवारीत एका स्थानाने वर चढून सातव्या स्थानी पोहोचली आहे, तर उपकर्णधार स्मृती मंधाना अव्वल स्थानावर कायम आहे. न्यूझीलंडची अनुभवी खेळाडू सोफी डिव्हाईन दोन स्थानांनी घसरून नवव्या स्थानी पोहोचल्यानंतर क्रमवारीत हा बदल झाला आहे. भारताची जेमिमा रॉड्रिग्स १२व्या स्थानी कायम आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या आयसीसी महिला चॅम्पियनशिप मालिकेच्या अंतिम सामन्यात शानदार ९४ धावा केल्यानंतर न्यूझीलंडची फलंदाज मॅडी ग्रीनने क्रमवारीत लक्षणीय झेप घेतली आहे. ३३ वर्षीय ग्रीनच्या ड्युनेडिनमधील ७३ चेंडूंतील खेळीमुळे तिच्या संघाला २०० धावांनी विजय मिळवून मालिका ३-० ने जिंकण्यास मदत झाली. या कामगिरीमुळे ती पाच स्थानांनी वर चढून ६१० रेटिंग गुणांसह १७व्या स्थानी पोहोचली आहे. हे तिच्या कारकीर्दीतील सर्वोत्तम मानांकन आहे. न्यूझीलंडची अष्टपैलू खेळाडू अमेलिया केरने अंतिम एकदिवसीय सामन्यात शानदार कामगिरी केली. तिने ८० धावा केल्या आणि २२ धावांत पाच बळी घेतले. त्यामुळे तिला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीमुळे तिला मालिकावीर पुरस्कारही मिळाला. या कामगिरीमुळे केर २१ व्या स्थानावरून संयुक्त १९ व्या स्थानावर पोहोचली आहे.

# दोन्ही विश्वचषकांत वेगवेगळी भावना

### टी-२० विश्वचषक विजेता सूर्यकुमारचे मत

**◆ नवी दिल्ली, १७ मार्च**



२०२४ च्या संघातील खेळाडूंमध्ये आयसीसी (आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद) चषकाचा प्रदीर्घ दुष्काळ संपवण्यासाठी अनुभवी वृत्ती होती, तर यावर्षी विजेतेपद कायम राखणाऱ्या संघात तारुण्याचा तीव्र जोश होता असे मत भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने दोन्ही टी-२० विश्वचषक विजेत्या संघांची तुलना व्यक्त करताना म्हटले.

सूर्यकुमारने दोन्ही चषक विजेत्या संघांमधील सूक्ष्म फरकांवर चर्चा केली. २०२४ मध्ये तो रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळला होता. त्या संघात विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यांच्यासारखे अनुभवी खेळाडूही होते. बार्बाडोसमध्ये विजय मिळवल्यानंतर या तिन्ही अनुभवी खेळाडूंनी खेळाच्या सर्वांत लहान प्रकारातून निवृत्ती घेतली.

दोन्ही संघांची तुलना करताना सूर्यकुमार म्हणाला, दोन्ही संघांमध्ये फक्त एकोणीस ते वीस गुणांचा फरक होता. तो अनुभवाचा जोश होता, तर इथे खेळाडू पूर्णपणे जोशात होते. आपल्या घरच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या २०२६ च्या स्पर्धेत भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार होता, पण २०२४ च्या संघाबद्दल असे म्हणता येणार नाही, ज्याला आयसीसी विजेतेपद जिंकण्याच्या मार्गावर मानसिक आव्हानांचाही सामना करावा लागला.

२०२६ चा संघ २०२४ च्या संघापेक्षा थोडा चांगला होता का, असे विचारले असता सूर्यकुमार म्हणाले, २०२४ मध्ये आमच्याकडे खूप अनुभव होता. त्यावेळी संघात अनुभवी आणि अनेक चांगले खेळाडू होते. आमच्याकडे आजही चांगले खेळाडू आहेत, पण त्यावेळी आमच्या संघात खूप अनुभव होता आणि प्रत्येक खेळाडू आपल्या भूमिकेसाठी पूर्णपणे तयार होता.

या वर्षाबद्दल बोलायचे झाले तर, मी म्हणेन की आमच्याकडे अनुभव कमी होता पण उत्साह जास्त होता. बहुतेक खेळाडू २५ ते २७ वयोगटातील आहेत. भारतात विश्वचषक जिंकल्यावर कसे वाटते, हे त्यांना समजावून सांगणे महत्त्वाचे होते, विशेषतः जेव्हा स्टेडियममध्ये ५०,००० किंवा १,००,००० लोक तुम्हाला प्रोत्साहन देत असतात.

सूर्यकुमार म्हणाला, त्यावेळी कसे वाटेल हे खेळाडूंना सांगणे महत्त्वाचे होते. नाहीतर, मला वाटते की संघांच्या कौशल्याच्या बाबतीत टी-२० फॉरमॅटमध्ये फक्त थोडासाच फरक असतो. पण मला वाटते की यावेळी खेळाडू अधिक उत्साही होते. २०२६ मध्ये संघाचे कर्णधारपद भूषवल्यानंतर आणि २०२४ च्या संघाचा एक महत्त्वाचा सदस्य राहिल्यानंतर सूर्यकुमारने आपल्या भावना कशा सांभाळल्या?

यावर तो म्हणाला, मला वाटते भावना जवळपास सारख्याच होत्या. आम्ही तिथेही भारतासाठी खेळत होतो आणि आम्हाला विश्वचषक जिंकायचा होता. २०२६ मध्येही ध्येय तेच होते, पण २०२६ मध्ये भावना थोडी जास्त तीव्र होती कारण आम्ही मायदेशात खेळत होतो.

**पत्नीच्या प्रश्नाने मिळाली ऊर्जा**

२०१८ साली पत्नी देविशाने सूर्यकुमारला एक साधा प्रश्न विचारला होता: जर तुला भारतासाठी खेळायचे असेल, तर तुझ्या काय योजना आहेत? त्या अतिशय साध्या संभाषणानंतर आठ वर्षांनी, सूर्यकुमारने भारताला टी-२० विश्वचषक विजेतेपद यशस्वीपणे कायम राखण्याचे नेतृत्व केले. २०१६ मध्ये जेव्हा मी केकेआरकडून खेळत होतो, तेव्हा आमचे लग्न झाले. सर्व काही अगदी सुरळीतपणे चालले होते. मी चांगला खेळत होतो आणि खेळाचा आनंद घेत होतो. २०१८ मध्ये मी मुंबई इंडियन्समध्ये सहभागी होईपर्यंत ती माझ्या प्रवासावर आणि दिनचर्येवर लक्ष ठेवून होती.

# सध्याचा भारतीय टी-२० संघ सर्वांत मजबूत

### रिकी पाँटिंगकडून गौरवोद्गार

**◆ दुबई, १७ मार्च**

नुकत्याच झालेल्या टी-२० विश्वचषकातील भारताच्या विजयानंतर भारतीय संघ आतापर्यंतचा सर्वांत मजबूत टी-२० आंतरराष्ट्रीय संघ ठरला आहे. संघातील खेळाडूंची संख्या, अनुभव आणि सातत्य यामुळेच व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये भारताने उत्कृष्ट कामगिरी केली आहे, असे गौरवोद्गार ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटिंगने काढले.

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडला ९६ धावांनी पराभूत करून तिसऱ्यांदा आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक जिंकला आणि सलग दोनदा विजेतेपद पटकावणारा पहिला संघ ठरला.

भारताने पुरुष मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व कायम राखले आहे. २०२३ च्या अखेरपासून, चार प्रमुख आयसीसी स्पर्धांमध्ये भारताने केवळ दोन सामने गमावले आहेत. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध आणि दुसऱ्यांदा २०२६ च्या टी-२० विश्वचषकाच्या सुपर एट टप्प्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध संघाला पराभव पत्करावा लागला.

आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये स्थान मिळवलेल्या पाँटिंगला विचारण्यात आले की, सध्याचा भारतीय संघ टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासातील सर्वांत



मजबूत संघ आहे का, तेव्हा तो म्हणाला, तुम्ही भारतीय संघाची व्हाईट-बॉल फॉरमॅटमधील कामगिरी पाहिली, केवळ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्येच नाही, तर गेल्या पाच-सहा वर्षांतील आयसीसी स्पर्धांमध्येही, ती खूप प्रभावी राहिली आहे. केवळ टी-२० संघच नाही, तर भारताचा हा व्हाईट-बॉल संघ खूप मजबूत आहे. सलग दोन विश्वचषक जिंकल्याबद्दल पाँटिंगने भारतीय संघाचे अभिनंदन केले.

तीन वेळा विश्वचषक विजेता पाँटिंग म्हणाला की, आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये दबावाखाली क्रिकेट खेळण्याच्या अनुभवाने संघाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

पंजाब किंग्सचे मुख्य प्रशिक्षक पाँटिंग म्हणाले, या सध्याच्या संघाबद्दल एक गोष्ट कदाचित दुर्लक्षित केली जाते, ती म्हणजे या खेळाडूंचा अनुभव आणि त्यांनी किती क्रिकेट खेळले आहे - मग ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट असो किंवा फक्त आयपीएल.

आयपीएलचे सामने आंतरराष्ट्रीय सामन्यांइतकेच मोठे असतात, त्यामुळे हा भारतीय संघ उत्कृष्ट संतुलन आणि एका शानदार संघासह पूर्ण तयारीने मैदानात उतरला होता. सुपर एट टप्प्यात भारताला दक्षिण आफ्रिकेकडून ७६ धावांनी पराभव पत्करावा लागला होता. त्याबद्दल पाँटिंग म्हणाला, त्या धक्क्यामुळे संघाला पुन्हा संघटित होण्यास मदत झाली. जेव्हा तुम्ही सलग १२ सामने जिंकता, तेव्हा एखादा वाईट दिवस येणारच असतो. मला आनंद आहे की हा दिवस लवकर आला. कदाचित भारताला अशाच एका धक्क्याची गरज होती.

भारताने जोरदार फलंदाजी करत याला प्रत्युत्तर दिले आणि उपांत्य फेरी व अंतिम सामन्यासह आपल्या उर्वरित चारपैकी तीन सामन्यांमध्ये २५० पेक्षा जास्त धावा केल्या.

# स्नूकर क्लासिकमध्ये ध्रुव सीतवालाचा विजय

**◆ मुंबई, १७ मार्च**

मंगळवारी येथे झालेल्या सीसीआय स्नूकर क्लासिकच्या चौथ्या फेरीच्या एकतर्फी सामन्यात ध्रुव सीतवालाने असित पांड्याचा ४-० असा पराभव केला. बिलियर्ड्स व्यावसायिक सीतवालाने स्नूकरमध्येही उत्कृष्ट कामगिरी करत हा सामना ४-० (७४-१७, ४६-३१, ५०-४१, ६३-३५) असा जिंकला. तरुण रोहन पैने आशिष गोरेचा ४-२ (६९-४२, ७५-१, ४७-५०, ५३-४०, ४४-५७, ७८-४२) असा पराभव केला. सिद्धार्थ पारिखने चौथ्या फेरीत रोहन कोठारेचा ४-१ असा पराभव केला, तर रोविन डिसोझाने आर गिरीशचा ४-३ असा पराभव करून पुढील फेरीत प्रवेश केला.

# अंतिम पंघालचा पराभव करून मीनाक्षी गोयतची भरारी

### आशियाई अजिंक्यपदासाठी भारतीय संघात स्थान निश्चित

**◆ नवी दिल्ली, १७ मार्च**

मीनाक्षी गोयतने दृढ आत्मविश्वासाच्या जोरावर अंतिम पंघालला पराभूत करून पुढील महिन्यात होणाऱ्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय महिला संघात आपले स्थान निश्चित केले. दोन वेळा विश्वविजेती अंतिमसाठी हा क्षण दुःखद ठरला.

यापूर्वी चाचणी सामन्यांमध्ये अंतिमकडून तीन वेळा पराभूत झालेल्या मीनाक्षीने यावेळी मजबूत बचावात्मक खेळ दाखवला आणि ६-२ अशी आघाडी घेतल्यानंतर उलटफेर करून विजय मिळवला. अनुभवी विनेश फोगाटने संघ सोडल्यापासून आशियाई खेळांतील कांस्यपदक विजेत्या अंतिमने ५३ किलो वजन गटात वर्चस्व गाजवले होते.

सामन्यादरम्यान, मीनाक्षीने अंतिमच्या डोक्यावर वारंवार घट्ट पकड ठेवली, ज्यामुळे तिला आपले आक्रमक कौशल्य वापरता आले नाही. सुरुवातीला, अंतिमने मीनाक्षीचे दोन्ही पाय पकडण्याचा प्रयत्न केला, पण तिचा हा डाव अयशस्वी ठरला.

मीनाक्षीने सामन्याच्या सुरुवातीलाच अंतिमला मॅटवर आपटून आघाडी घेतली, तर अंतिमने एक गुण मिळवून प्रत्युत्तर दिले. २१ वर्षीय अंतिमने एका पायावर पकड (वन-लेग होल्ड) करून प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला, पण मीनाक्षीचा बचाव भक्कम राहिला. अंतिमने पुश-आऊट करून २-२ अशी बरोबरी साधली.

दुसऱ्या फेरीत, मीनाक्षीने एकापाठोपाठ एक टेकडाउन्स करून ६-२ अशी आघाडी घेतली. सामन्याच्या शेवटच्या नऊ सेकंदात, तिने तीन वेळच्या आशियाई चॅम्पियनशिप पदक विजेत्याला एका मजबूत पकडीने अंतिमला मॅटवर दाबून आश्चर्यचकित केले. पराभवानंतर अंतिम पंघाल काही वेळ मॅटवर पडून राहिली, तर मीनाक्षी हसून हात पुढे करत तिच्याजवळ गेली.



आशियाई कुस्ती अजिंक्यपदाच्या निवड चाचणी स्पर्धेत महिलांच्या ५३ किलो वजन गटाच्या अंतिम सामन्यात अंतिम पंघालला पराभूत केल्यानंतर वडिलांसोबत कुस्तीपटू मीनाक्षी गोयत

# महिलांसाठी अधिक कसोटी सामने व्हावेत

### भारतीय खेळाडू प्रतीका रावलचे मत

**◆ नवी दिल्ली, १७ मार्च**

ऑस्ट्रेलियाच्या नुकत्याच झालेल्या दौऱ्यात आपल्या कसोटी पदार्पणात अर्धशतक झळकावणारी भारतीय फलंदाज प्रतीका रावलने, कसोटी क्रिकेट हा आपला आवडता प्रकार असल्याचे सांगत, महिलांसाठी अधिक कसोटी सामने खेळवण्याचे समर्थन केले आहे.

या महिन्याच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलिया दौऱ्यात खेळल्या गेलेल्या दिवस-रात्र कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात ६३ धावा करून प्रतीकाने भारताला डावाने होणाऱ्या पराभवापासून वाचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. दिल्ली स्पोर्ट्स जर्नलिस्ट्स असोसिएशन (डीएसजे) द्वारे आयोजित स्पोर्ट्स जर्नलिस्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसजेएफआय)च्या परिषदेच्या निमित्ताने बोलताना, प्रतीका म्हणाली, कसोटी क्रिकेट हा सर्वांत सुंदर प्रकार आहे. लहानपणापासून माझे वडील आणि प्रशिक्षक म्हणायचे की, या प्रकारात चांगली कामगिरी करणे खूप महत्त्वाचे आहे. जेव्हा तुम्ही त्या प्रकारे तयार असता, तेव्हा तो नैसर्गिकरीत्या तुमचा आवडता प्रकार बनतो. तिने सांगितले की, व्हिव्हियन रिचर्ड्स, सचिन तेंडुलकर, ब्रायन लारा आणि रिकी पाँटिंग यांसारख्या महान खेळाडूंच्या कसोटी सामन्यांचे व्हिडीओ पाहून मी या फॉरमॅटसाठी स्वतःला तयार केले.

प्रतीका म्हणाली, मी या महान फलंदाजांचे अनेक व्हिडीओ पाहिले आहेत. ज्या प्रकारे ते कसोटी क्रिकेट खेळले, ते नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. महिलांच्या कसोटी सामन्यांची संख्या वाढवण्याबद्दल विचारले असता, ती म्हणाली की जेवढे जास्त कसोटी सामने होतील, तेवढे चांगले. माझ्या मते, कसोटी क्रिकेट खेळण्याचा अनुभव केवळ खेळाडूमध्येच बदल घडवत नाही, तर एक व्यक्ती म्हणूनही तिला परिपक्व बनवतो.



प्रतीका रावल

**रोख पारितोषिक प्रदान**

एसजेएफआयच्या चार दिवसीय सुवर्ण महोत्सवी राष्ट्रीय परिषदेच्या समारोपानिमित्त अरुण जेटली स्टेडियमवर आयोजित पुरस्कार सोहळ्यात, दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रोहन जेटली यांनी प्रतीकाला ५१ लाख रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान केले. विश्वचषक विजेत्या भारतीय १९ वर्षांखालील पुरुष संघाचा सदस्य असलेल्या उद्धव मोहनला ११ लाख रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले.

### पीएसपीबीने पुरुषांचे विजेतेपद पटकावले

**◆ इंदूर, १७ मार्च**

पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड (पीएसपीबी) च्या पुरुष संघाने मंगळवारी येथे झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय टेबल टेनिस चॅम्पियनशिपमध्ये आपले वर्चस्व कायम राखले, तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) दोन वर्षांनंतर महिलांचे विजेतेपद पटकावले.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात पीएसपीबीने पश्चिम बंगालचा ३-० असा एकतर्फी पराभव केला. पायस जैनने अंकुर भट्टाचार्यचा चार गेममध्ये १२-१०, ११-४, १-११, ११-९ असा पराभव करून पीएसपीबीला सकारात्मक सुरुवात करून दिली. महिलांचा अंतिम सामना अटीतटीचा झाला आणि एका रोमांचक सामन्यात पीएसपीबीला ३-२ ने हरवून आरबीआय संघाने विजेतेपद पटकावले.

# भारतीय संघाचे सामूहिक यशाला प्राधान्य : संजू सॅमसन

**◆ तिरुवनंतपुरम, १७ मार्च**

सध्याचा भारतीय संघ वैयक्तिक कामगिरीपेक्षा सामूहिक यशाला प्राधान्य देतो. यासाठी ड्रेसिंग रूममधील संघाच्या नेतृत्व गटाने अवलंबलेले एक महत्त्वाचे धोरण कारणीभूत असल्याचे भारताचा टी-२० विश्वचषक विजेता यष्टीरक्षक-फलंदाज संजू सॅमसनने सांगितले.

टी-२० विश्वचषकात स्पर्धावीर ठरलेल्या सॅमसनने सांगितले की, संघ वैयक्तिक विक्रम प्रस्थापित करण्यापेक्षा सामने जिंकण्यावर अधिक भर देतो. आता प्रत्येक जण तसाच विचार करत आहे. हा आमच्या कर्णधाराने आणि प्रशिक्षकाने ड्रेसिंग रूममध्ये घेतलेला एक जाणीवपूर्वक निर्णय होता. आमचा नेतृत्व गट संघाला सातत्याने हेच सांगतो की, संघ प्रथम आणि वैयक्तिक कामगिरी द्वितीय क्रमांकावर असली पाहिजे. ही मानसिकता खेळाडूंमध्ये वारंवार रुजवली गेली आहे, याकडे त्याने लक्ष वेधले.

सॅमसन म्हणाला, हा विचार आपोआप प्रत्येक खेळाडूच्या मनात रुजला आणि त्यामुळेच आम्ही प्रत्येक सामना खेळलो. क्रिकेट खेळताना मी नेहमीच स्वतःच्या तत्त्वांशी प्रामाणिक राहणे पसंत केले आहे आणि संघाच्या यशात योगदान देणे हा खेळाचा सर्वात महत्त्वाचा पैलू आहे.

केरळमध्ये जन्मलेल्या संजू सॅमसनने सांगितले की, लहान वयात विविध वयोगट स्पर्धांमध्ये केरळकडून खेळायला सुरुवात केल्यापासून मी क्रिकेटला एक सांघिक खेळ मानतो. माझ्या १३ वर्षांखालील केरळकडून खेळण्यापासून ते आजपर्यंत, मी क्रिकेटला नेहमीच एक सांघिक खेळ मानले आहे. आम्ही जिंकण्यासाठी खेळतो. आणि तो विजय मिळवण्यासाठी तुम्ही जे काही करता, त्याचा फायदा सर्वप्रथम संघालाच झाला पाहिजे. केरळचा रहिवासी असून देशासाठी सर्वोच्च स्तरावर खेळणारा क्रिकेटपटू म्हणून आपल्या जबाबदाऱ्यांबद्दल सॅमसन म्हणाला की, अनेक तरुण खेळाडू माझ्या प्रवासावर बारकाईने लक्ष ठेवून असतात. मला काहीतरी सिद्ध करायचे आहे असे वाटले.

# हर्षित राणा आयपीएलला मुकण्याची शक्यता

### केकेआरच्या अडचणी वाढल्या

**◆ कोलकाता, १७ मार्च**

आयपीएल २०२६ ची उलट गणती सुरू झाली आहे. आयपीएलचा पहिला सामना २८ मार्च रोजी खेळला जाईल. मात्र, स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच कोलकाता नाईट रायडर्सला मोठा धक्का बसला आहे. संघाचा युवा वेगवान गोलंदाज हर्षित राणा गुडघ्याच्या शस्त्रक्रियेमुळे स्पर्धेतील महत्त्वपूर्ण भाग मुकण्याची शक्यता आहे.

हर्षित राणावर फेब्रुवारीमध्ये गुडघ्याची शस्त्रक्रिया झाली होती आणि तो तंदुरुस्त होण्यासाठी प्रयत्न करीत आहे. बीसीसीआयचे वैद्यकीय पथक त्याच्या तंदुरुस्तीवर लक्ष ठेवून आहे, परंतु त्याच्या पुनरागमनाची कोणतीही निश्चित तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.



जर तो संपूर्ण स्पर्धेतून बाहेर राहिला, तर ही सलग दुसरी मोठी स्पर्धा असेल ज्यात तो दुखापतीमुळे खेळू शकणार नाही. भारताच्या टी-२० विश्वचषक सराव सामन्यादरम्यान हर्षित राणाला ही दुखापत झाली होती.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळल्या गेलेल्या त्या सराव सामन्यात त्याने फक्त एक षटक टाकले होते, त्यानंतर त्याला गुडघ्यात अस्वस्थता जाणवली. तपासणीत त्याच्या उजव्या गुडघ्याच्या अस्थिबंधात ताण आल्याचे उघड झाले, त्यानंतर त्याला स्पर्धेतून बाहेर पडावे लागले. त्याच्या जागी मोहम्मद सिराजचा संघात समावेश करण्यात आला. मात्र, संपूर्ण स्पर्धेत सिराजला भारताच्या केवळ पहिल्याच सामन्यात खेळण्याची संधी मिळाली.

**रोहित शर्मा मुंबई इंडियन्स संघात सहभागी**

दरम्यान, माजी कर्णधार रोहित शर्मा मंगळवारी मुंबई इंडियन्सच्या संघात सामील झाला. मुंबई इंडियन्सने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक व्हिडीओ शेअर केला. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये, एमआयने घोषणा केली की नवीन हंगामापूर्वी हिटमॅन संघात सामील होत आहे!

# सर्व खेळाडूंचे लक्ष लॉस एंजेलिसकडे : अनाहत सिंग

### स्क्वॅश क्रीडा प्रकाराचा ऑलिम्पिकमध्ये समावेश

**◆ मुंबई, १७ मार्च**

ऑलिम्पिक २०२८ मध्ये स्क्वॅश क्रीडा प्रकाराचा समावेश झाल्याने पुढील दोन वर्षे सर्व खेळाडूंचे लक्ष लॉस एंजेलिसकडे लागले आहे, असे मत भारताची अव्वल मानांकित स्क्वॅशपटू अनाहत सिंगने मंगळवारी मांडले.

ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणे हे प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते. जेएसडब्ल्यू इंडियन ओपनच्या प्री-टूर्नामेंट पत्रकार परिषदेदरम्यान अनाहत म्हणाली, हे खूप रोमांचक आहे. हा ऑलिम्पिकचा भाग पहिल्यांदाच होत आहे आणि सर्व खेळाडू त्याची आतुरतेने वाट पाहत होते. पूर्वी कोणताही खेळाडू शक्य तितक्या राष्ट्रकुल खेळांमध्ये खेळू शकत होता पण आता ऑलिम्पिकही आहेत आणि अर्थातच, प्रत्येक खेळाडूचे ऑलिम्पिकमध्ये जाण्याचे, खेळण्याचे आणि पदके जिंकण्याचे स्वप्न असते. पुढील काही वर्षांत सर्वांचे ध्येय एकच असेल आणि दीर्घकाळात माझ्याही मनात एकच गोष्ट असेल की मी ऑलिम्पिकपर्यंत सराव करू शकेन आणि शक्यतो देशासाठी पदक जिंकू शकेन.

इंडियन ओपन ही एक निराळ्या धाटणीची स्पर्धा आहे जी खेळाडूंना क्रमवारीत गुण मिळविण्याची संधी देईल आणि या वर्षाच्या अखेरीस आशियाई खेळांसाठी गती वाढविण्यात मदत करेल. भारताचा दुसरा सर्वोत्तम मानांकित पुरुष खेळाडू रमित टंडन म्हणाला की, ऑलिम्पिक स्पर्धेत या खेळाचा समावेश केल्याने कॉर्पोरेट जग देखील त्याकडे आकर्षित झाले आहे.

तो म्हणाला, ऑलिम्पिक जगातील सर्वांत मोठी क्रीडा स्पर्धा आहे, त्यामुळे तिथे पोहोचणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. याशिवाय आमच्या खेळाला आणि इतर कॉर्पोरेट घराण्यांच्या सहवासाचाही फायदा झाला आहे, जो ऑलिम्पिकमध्ये सामील झाल्यानंतरच शक्य झाला आहे. ऑलिम्पिकमध्ये या क्रीडा प्रकाराचा समावेश झाल्यानंतर संपूर्ण स्क्वॅश परिसंस्थेत मोठा बदल झाला आहे.

इंडियन ओपनमध्ये खेळल्याने नक्कीच थोडा दिलासा मिळेल पण स्क्वॅशपटू पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या परिस्थितीवरही लक्ष ठेवून आहेत. आपल्याच देशात हे घडत आहे, त्यामुळे आपल्यासाठी हे खूप सोयीचे आहे. त्यानंतर लगेचच मी लंडनमध्ये पुढील स्पर्धा खेळणार आहे. उड्डाण अद्याप रद्द करण्यात आलेले नाही त्यामुळे युद्धाची परिस्थिती कशी होते यावर ते अवलंबून आहे याकडे रमितने लक्ष वेधले.



जेएसडब्ल्यू इंडियन ओपन २०२६ स्क्वॅश स्पर्धेपूर्वी पत्रकार परिषदेला संबोधित करताना अनाहत सिंग आणि रमित टंडन आहेत

## थोडक्यात महत्त्वाचे...



### संगणक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विकासात भर

**अक्कलकुवा** : समग्र शिक्षांतर्गत राज्यातील बहुतांश शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापित केल्या असून, प्रत्येक शाळेत संगणक प्रयोगशाळेसाठी एकेक संगणक प्रशिक्षकही रुजू करण्यात आले आहे. आधुनिक काळातील तांत्रिक शिक्षणाची गरज लक्षात घेऊन तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट समोर ठेवून, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेद्वारे आयसीटी (इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी) हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये नंदुरबार जिल्ह्यातील तब्बल ४९ शाळांमध्ये हा उपक्रम सुरू असून, चांगल्या प्रकारचा हा उपक्रम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे प्रकल्प संचालक संजय यादव यांच्या सूचनेप्रमाणे व नंदुरबार जिल्ह्याचे प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भानुदास रोकडे यांच्या मार्गदर्शनाने राबविण्यात येत आहे, या उपक्रमाचा विद्यार्थ्यांना तसेच शाळेतील इतर शिक्षकांनाही फायदा होत असल्याचे दिसून येत आहे.



### परमार्थ सेवा मंडळातर्फे नित्य अन्नदान सेवा

**नंदुरबार** : शहरातील निराधार व गरजूंसाठी श्रीराम मंदिर परिसरात रोज सायंकाळी अन्नदान सेवा देण्यात येत असून, गेली अनेक वर्षे हा उपक्रम अखंडपणे सुरू आहे. यामुळे स्टेशन परिसरातील गरजूंची भूक भागविली जात असल्याने गोरगरीब, निराधार व्यक्ती भरभरून आशीर्वाद देत आहेत. परमार्थ सेवा मंडळ संस्था नोंदणीकृत असून, संस्थेतर्फे शहरात रोज अन्नदान सेवा दिली जात आहे. स्टेशन रोडवरील नेहरू चौकातील श्रीराम मंदिराच्या ओट्यावर हे अन्नदान रोज सायंकाळी केले जाते. ज्येष्ठ करसल्लागार व लेखापरीक्षक के. एस. शर्मा, संस्थेचे सचिव व कार्यकर्ते नियमित विनामूल्य सेवा देत आहेत. या उपक्रमाचा लाभ रेल्वेस्थानक, बसस्थानक व नेहरू चौक परिसरातील निराधार व निराश्रित वृद्ध, महिला, परित्यक्त्या, विद्यार्थी तसेच गरजू व्यक्तींना मिळत आहे. समाजातील वंचित व गरजू घटकांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने ही सेवा सातत्याने सुरू ठेवण्यात आली आहे. या अन्नदान सेवेसाठी संस्थेचे कार्यकारी मंडळ, सदस्य, सेवाभावी नागरिक तसेच दानशूर व्यक्ती सक्रिय सहभाग घेऊन सहकार्य करीत आहेत, अशी माहिती संस्थेचे सचिव प्रशांत परदेशी यांनी दिली.

### शहादा पालिका निवडणुकीतील आश्वासनांच्या पूर्ततेसाठी कटिबद्ध : नगराध्यक्ष पाटील

**शहादा** : पालिका निवडणूक निकालानंतर नागरिकांमध्ये विकासकामांबद्दल प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. शासनाकडून पालिकेला प्राप्त झालेला निधी कुठल्याही परिस्थितीत परत जाऊ दिला जाणार नाही. निवडणूक काळात दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्यासाठी सर्वजण कटिबद्ध असल्याचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजित पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. सद्यःस्थितीत शहरात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे चार कोटी ३७ लाखांचा अल्पसंख्याक निधी परत जाणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्याची स्पष्टोक्ती करण्यासाठी श्री. पाटील यांनी पत्रकार परिषद बोलावली होती. एकूण चार कोटी ३७ लाखांच्या अल्पसंख्याक निधी कामाच्या यादीसह पारीत झाला असून, केवळ समन्वयाअभावी काम तात्पुरत्या स्वरूपात थांबले आहे. पालिका बांधकाम विभाग सक्षम असल्याने व पालिकेत येणारी कामे केवळ पालिकेच्या माध्यमातून व्हावीत, असा आग्रह आमचा आहे. जेणेकरून त्या निधीमधून शहादा शहर विकासाची कामे चांगल्या पद्धतीने होतील. पालिकेची निवडणूक ही चुरशीची झाली आहे. त्यामुळे मते जुळायला थोडा वेळ लागेल, जो विकासाच्या अजेंडा शहर विकासासाठी मांडण्यात आला होता. त्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत. निधी परत जाणार नाही याबद्दल शहरवासियांनी निश्चिंत राहावे. शहरासाठी मूलभूत समस्या म्हणजे भूमिगत गटारी, डास निर्मूलन, घनकचरा व्यवस्थापन या विषयावरही त्यांनी प्रकर्षाने मत मांडले. शहराच्या सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सर्वपक्षीय नगरसेवक एकत्रितपणे काम करतील आणि शहर विकासासाठी गती देतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या वेळी पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नांवर त्यांनी दिलखुलासपणे उत्तरे दिली.



### कला जीवनात हरितद्रव्याचे काम करते : प्रा. वैशाली पाटील

#### धुळ्यात शिवतीर्थ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे कार्यक्रम

**धुळे** : आयुष्य जगताना लिओ टॉलस्टॉय यांनी प्राचीन भारतात सांगितलेल्या ६४ कला या माणसाच्या मन, बुद्धी आणि संस्कारांना, आनंदी जीवन घडविणाऱ्या जीवनकला आहेत. म्हणून कला ही जीवनात हरीतद्रव्याचे काम करते. संपूर्ण मेंदूला रक्तपुरवठा व ॲक्टिव्ह ठेवायचे काम कला करते, असे प्रतिपादन प्रा. वैशाली पाटील यांनी केले.

शहरातील शिवतीर्थ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त संघाच्या सभागृहात प्रा. वैशाली पाटील यांचा ‘कला जीवनात हरितद्रव्याचे काम करते’ या विषयावर प्रबोधनात्मक कार्यक्रम झाला. संघाचे अध्यक्ष ॲड.जे. टी. देसले अध्यक्षस्थानी होते. प्रा. वैशाली पाटील यांनी आदिमानवापासून सिंधू संस्कृती ते आजची स्त्री या परिवर्तनावर प्रकाशझोत टाकला. स्त्री ही पुरुषांइतकेच काम करते. म्हणून जर मुलगा पत्नीला घरकामात थोडी मदत करत असेल, तर या नव्या परिवर्तनाचा स्वीकार करायला हवा. बदल स्वीकारणे आनंदी आयुष्याची पर्वणी आहे. तसेच कला जमत नसेल तर ६५ कला म्हणजे जे घडते, त्याला योग्य प्रतिसाद देणे. यामुळे भावनिक बुद्धिमत्ता वाढते व निरोगी, आनंदी आयुष्य जगता येते, असे सांगितले.

ॲड. जे. टी. देसले म्हणाले की, परिवर्तनाच्या वाटचालीत स्त्री-पुरुष समानतेचा विचार हा केवळ घोषवाक्य न राहता तो प्रत्यक्षात उतरविला पाहिजे. यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांचे महिलांचे परिवर्तनवादी मंच तयार होणे जरुरीचे आहे. या वेळी संघातील महिला भगिनींचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. उपाध्यक्ष ॲड. एम. एस. पाटील, सचिव प्रा. के. बी. बागुल, विमल पाटील, सीमा पाटील, चंपावती अग्रवाल यांनी गीत सादर केले.

# नवीन उद्योग भवनामुळे सर्व कार्यालये येणार एकाच छताखाली!

## धुळ्यात १४ कोटी ८० लाखांच्या निधीतून साकारणार प्रशस्त इमारत
## पालकमंत्री रावल यांच्या मार्गदर्शनात आमदार अग्रवाल यांचा पाठपुरावा

**धुळे** : शहरासह जिल्ह्यातील उद्योजकांच्या सोयी-सुविधांसाठी धुळे जिल्हा उद्योग केंद्राच्या जागेवर प्रशस्त उद्योग भवनाची इमारात आकाराला येणार आहे. या उद्योग भवनामुळे उद्योगाशी संबंधित विविध शासकीय-निमशासकीय कार्यालये एकाच छताखाली येणार असून, या भवनाच्या उभारणीसाठी आज राज्य शासनाने तब्बल १४ कोटी ८० लाखांच्या निधीला मंजुरी दिली. उद्योग भवनाच्या प्रलंबित मागणीसाठी पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार अनुप अग्रवाल यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू होता. त्याला अखेर यश आले आहे.

केंद्र शासनाच्या ईओडीबी धोरणांतर्गत व्यवसाय सुलभता निर्माण व्हावी, धुळे शहरासह जिल्ह्यात औद्योगिक गुंतवणूक वाढावी, औद्योगिक घटकांना उद्योग उभारणे सोयीचे व्हावे, या उद्देशाने उद्योगांशी संबंधित सर्व संलग्न शासकीय-निमशासकीय कार्यालये एकाच छताखाली यावीत यासाठी धुळे शहरात नवीन उद्योग भवन उभारावे, अशी मागणी शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी केली होती.



याबाबत त्यांनी ५ मार्च २०२५ रोजी उद्योगमंत्री उदय सामंत यांना पत्र देत उद्योग भवनाची कशी आवश्यकता आहे, याबाबत भूमिका मांडली होती. त्यावर उद्योगमंत्री सामंत यांनी उद्योग विभागाच्या आयुक्तांना उचित कार्यवाहीचे निर्देश दिले होते. आमदार अग्रवाल यांच्या पाठपुराव्याने उद्योग संचालनालयाने धुळे शहरातील जिल्हा उद्योग केंद्राच्या जागेवर नवीन प्रशस्त उद्योग भवनाची इमारत उभारण्याचा प्रस्ताव शासनाला दिला होता. त्यानुसार आज राज्य शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने उद्योग भवनाच्या इमारतीसाठी १४ कोटी



८० लाखांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली. ही इमारत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून बांधण्यात येणार असल्याचेही परिपत्रकात नमूद आहे.

**चार मजली इमारत साकारणार**

उद्योग भवनाच्या नवीन ग्राउंड फ्लोअरसह चार मजली इमारतीत अनेक सोयी-सुविधांची पूर्तता असेल. यामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग, सोलर यंत्रणा, दिव्यांगांसाठी रॅम्प, फर्निचर, पाणीपुरवठा, अग्निशामक यंत्रणा, संरक्षक भिंत, अंतर्गत रस्ते, पार्किंग, लिफ्ट आदींचा समावेश आहे. विशेष म्हणजे या इमारतीत सोलर यंत्रणा बसविली जाणार असल्याने वीजबिलाचा प्रश्न सुटणार आहे.

**उद्योजकांना मिळणार दिलासा**

केंद्रासह राज्यातील भारतीय जनता पक्ष-महायुती शासनामुळे धुळे जिल्ह्यात काही वर्षांत राष्ट्रीय महामार्गांसह नवीन रेल्वेमार्गांमुळे दळणवळणाची सुविधा निर्माण झाल्या. तसेच उद्योगांना आवश्यक पाण्याच्या उपलब्धतेसाठी विविध प्रकल्पांची कामेही पूर्णत्वास आली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे पाठपुराव्यातून आमदार अग्रवाल शहरातील गोंदूर विमानतळाच्या विस्तारीकरणासाठीही आग्रही आहेत. एकूणच जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला पोषक स्थिती निर्माण होत असताना आता आमदार अग्रवाल यांच्या पाठपुराव्यातून उद्योग भवनाची निर्मिती होत आहे. यामुळे उद्योग घटकांशी संबंधित सर्व शासकीय-निमशासकीय कार्यालये एकाच छताखाली येणार आहेत. यामुळे जिल्हाभरात औद्योगिक गुंतवणूक वाढीला चालना मिळू शकेल. एकाच छताखाली सर्व कार्यालये आल्याने उद्योग उभारणाऱ्या औद्योगिक घटकांची येणाऱ्या विविध समस्या दूर होण्यास मदत होणार आहे.

> “ धुळे शहरासह जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी धुळ्यात उद्योग भवन व्हावे, यासाठी
>
> 
>
> पाठपुरावा सुरू होता. आज राज्य शासनाने ही मागणी मान्य करत त्यासाठी सुमारे १५ कोटींचा निधी मंजूर केला आहे. यामुळे उद्योग घटकाशी संबंधित विविध कार्यालये एकाच छताखाली येऊन उद्योजकांना सोयीचे होईल. यातून भविष्यात औद्योगिक गुंतवणूक वाढण्यास मदत होईल. उद्योग भवनासाठी निधी मंजूर केल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांचे आभार.
>
> **-अनुप अग्रवाल (आमदार, धुळे शहर)**

# शहाद्यात ग्रामीण उत्पादने अन् संस्कृतीचा जागर!

## जिल्हास्तरीय सरस महोत्सवाचा थाटात प्रारंभ



**शहादा : जिल्हास्तरीय सरस प्रदर्शनाचे उद्घाटन करताना नगराध्यक्ष अभिजित पाटील. शेजारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, गटविकास अधिकारी महेश पोतदार आदी.**

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १७ मार्च**

ग्रामीण भागातील महिलांमध्ये नेतृत्वगुण आहेत. विक्रीकौशल्यही आहे. महिला स्वयंसहायता समूहांना भविष्यात त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना मुख्य बाजारपेठ मिळण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी सहकार्य केले, तर त्यांना अधिक चालना मिळण्यास मदत होईल व ते अधिक प्रबळ होतील, असे सांगत शहादावासियांनी तीनदिवसीय सरस महोत्सवाला भेट देऊन खरेदी करण्याचे आवाहन लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजित पाटील यांनी केले.

येथील महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याजवळील पंचायत समितीच्या पटांगणात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अर्थात उमेद अभियानातर्फे ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे जिल्हास्तरीय सरस व विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन नगराध्यक्ष पाटील यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

या वेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक चंद्रकांत पवार, शहादा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश पोतदार, सहाय्यक गटविकास अधिकारी विकास राठोड, इंजिनिअर हरिश्चंद्र भोई, जिल्हा अभियान व्यवस्थापक यशवंत ठाकूर, कार्यालयीन अधीक्षक चंद्रकांत चावरे उपस्थित होते.

प्रदर्शनात तालुक्यातील १३ प्रभागांतील व अक्कलकुवा, धडगाव, तळोदा, नंदुरबार व नवापूर तालुक्यांतील उमेदअंतर्गत ६० पेक्षा अधिक महिला स्वयंसहायता समूहाचे स्टॉल आहेत. गटविकास अधिकारी महेश पोतदार यांनी प्रास्ताविक केले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार यांनी ग्रामीण भागातील उपस्थित महिला स्वयंसहायता समूहातील महिलांना संबोधित करताना उमेद अभियानाचा माध्यमातून सुरू असलेली महिला स्वयंसहायता गटाची चळवळ अधिक व्यापक झाली असून, महिला बचत गटाच्या माध्यमातून स्वावलंबी बनत आहेत. लखपतीदीदीही होत आहेत, तसेच बँक कर्ज, समुदाय गुंतवणूक निधी या माध्यमातूनही कर्ज घेऊन विविध व्यवसाय करीत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी गटातील महिला प्रेरिका कविता अशोक भामरे, गणोर यांनीही अभियानाच्या माध्यमातून महिलांचे व कुटुंबाचे जीवनमान कसे उंचावत असल्याचे प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. प्रभाग समन्वयक राजेश देवकर यांनी सूत्रसंचालन केले. तालुका अभियान व्यवस्थापक ईश्वर जगदाळे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील तालुका व्यवस्थापक व प्रभाग समन्वयकांनी सहकार्य केले.

# बिजासनीमाता मंदिरात चैत्रोत्सवाची तयारी पूर्ण

## विश्वस्त सदस्य मोहन जोशी यांची माहिती

**शिरपूर, १७ मार्च**

राज्यातील ४७ कुळांची कुलदैवत बडी बिजासनीमाता मंदिरात चैत्र नवरात्रोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, या पार्श्वभूमीवर विविध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आल्याची माहिती मंदिरांचे विश्वस्त सदस्य मोहन जोशी यांनी दिली. महाराष्ट्र- मध्य प्रदेशाच्या सीमेवर बिजासन (ता. सेंधवा, जि. बडवाणी) येथे बडी बिजासनी माता मंदिरात गुरुवारपासून (१९ मार्च) चैत्र नवरात्रोत्सव साजरा केला जाणार असल्याने या पार्श्वभूमीवर बिजासनी माता मंदिर समितीची बैठक शनिवारी (१४ मार्च) झाली. बैठकीत उपजिल्हाधिकारी रमेश सिसोदिया, तहसीलदार कार्तिक मोर्या, सेंधवा तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी ओमप्रकाश चोंगडे, बिजासनी पोलीस ठाण्याचे प्रभारी रोहित पाटीदार, सदस्य मोहन जोशी, राजेश जोशी, राम महाजन, मालवी, बजारिया सोलंकी, शिवम सोनी, रितेश सोनी आदी उपस्थित होते.

समिती सदस्य मोहन जोशी म्हणाले की, श्री बिजासनमाता मंदिरात नवरात्रोत्सव गुरुवारपासून (१९ मार्च) २७ मार्चपर्यंत साजरा केला जाईल. यात १९ मार्चला घटस्थापना, २६ मार्चला अष्टमीला शिवशक्ती महायज्ञ, सकाळी महायज्ञपूजा, अकराला अग्निस्थापना, दुपारी दोनला रुद्रहवन महापूजा आणि रात्री नऊला



महाअष्टमी हवनपूजा, २७ मार्चला रामनवमीला सकाळी सहाला पूर्णआहूती महापूजा होईल. चैत्र नवरात्रात प्रामुख्याने नवस फेडण्यासाठी महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात राज्यातील लाखो भाविकांची मोठ्या संख्येने हजेरी लावतात. भाविकांना देवीचे दर्शन घेणे सुलभ व्हावे, यासाठी कायदा- सुव्यवस्था राखण्यासाठी मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. तसेच पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. मंदिरातील स्वयंसेवकही पोलिसांच्या मदतीला राहणार आहेत. नवरात्रोत्सवानिमित्त २७ मार्चपर्यंत मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. तसेच वाहनतळ व भोजनाची व्यवस्था केली आहे.

# वैयक्तिक वादाला धार्मिक रंग देणाऱ्यांना नंदुरबारला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

## अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई

**नंदुरबार** : शहरात किरकोळ कारणावरून झालेल्या मारहाणीच्या घटनेला जाणीवपूर्वक धार्मिक वादाचे स्वरूप देऊन सामाजिक शांतता बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन तरुणांना नंदुरबार शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अफवा पसरवून शहरात गैरसमज निर्माण केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पोलिसांची धडक कारवाई**

घटनेचे गांभीर्य ओळखून शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक भुनेश मराठे यांच्या फिर्यादीवरून खोट्या अफवा पसरवणारे संशयित समीर खान शेर खान पठाण (वय २६, रा. पटेलवाडी), शाहरुख खान रहिम खान पठाण ऊर्फ मास (वय २९, रा. जुना बैल बाजार) आणि शेख शोएब शेख फारूक ऊर्फ माज (वय २६, रा. काली मशीदजवळ) या तिघांविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या कलम १९२, ३५३(२) आणि ३ (५) अन्वये गु.र.नं. ३६६/२०२६ नुसार गुन्हा नोंदवून त्यांना अटक करण्यात आली आहे.

> **नेमकी घटना काय?**
>
> १३ मार्चला मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिरासमोर वाहनाचा कट लागल्याच्या कारणावरून दोन गटांत वाद झाला होता. याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात दोन्ही गटांनी परस्परांविरुद्ध तक्रारी दिल्याने (गु.र.नं. ३६३/२०२६ व ३६४/२०२६) क्रॉस गुन्हे दाखल करण्यात आले होते. मुळात या वादात कोणताही धार्मिक संदर्भ नव्हता, असे स्वतः फिर्यादीने स्पष्ट केले होते.

**धार्मिक वादाचे खोटे स्वरूप**

मात्र, गु.र.नं. ३६३/२०२६ मधील साक्षीदाराने या वैयक्तिक वादाला धार्मिक वादाचे स्वरूप देऊन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात निष्पन्न झाले. यामुळे शहरात काही काळ अफवा पसरली होती.

**पोलिसांचे आवाहन**

वैयक्तिक वादाला धार्मिक रंग देऊन शहराची कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणाऱ्यांची गय केली जाणार नाही. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि शहरात शांतता राखावी, असे आवाहन नंदुरबार शहर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांना आता मिळणार ‘जी-९’ केळीची दर्जेदार रोपे

## शहादा खरेदी-विक्री संघाचा नवा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १७ मार्च**

बियाणे, खते आणि कीटकनाशके विक्रीच्या वाढत्या स्पर्धेत आपले वेगळेपण सिद्ध करीत शहादा तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाने आता केळी रोप विक्रीच्या क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. आनंद (गुजरात) येथील प्रसिद्ध आयकॉनिक इंटरनॅशनल कंपनीच्या ‘जी-९ व्हरायटी’ रोपांच्या विक्रीचा प्रारंभ नुकताच उत्साहात करण्यात आला.

खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष काशिनाथ पाटील यांच्या हस्ते पहिल्या रोपांच्या गाडीचे पूजन करण्यात आले. या वेळी शेतकरी शरद पाटील यांच्याकडे रोपांचा क्रेट सुपूर्द करून विक्रीचा ‘श्रीगणेशा’ झाला. याप्रसंगी प्रा. डी.सी. पाटील, संचालक रवींद्र विठ्ठल पाटील, सुदाम सोमजी पाटील, विनोद चिंतामण पाटील, अंबालाल पाटील, विश्वनाथ पाटील, आयकॉनिक कंपनीचे म



> शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र ठरत आम्ही दर्जेदार केळी रोपांची हमी देत आहोत. जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.
> **- अनिल अशोक पाटील (चेअरमन, खरेदी-विक्री संघ, शहादा)**

र्केटिंग हेड मच्छिंद्र माळी, मॅनेजर अनिल पाटील आणि परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

परिसराचे नेते दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी चेअरमन प्रा. मकरंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली, संघाचे उत्पन्न वाढविण्यासाठी आणि शेतकऱ्यांना दर्जेदार सेवा देण्यासाठी हा म हत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. आतापर्यंत दोन लाख रोपांची नोंदणी झाली असून, मेअखेरपर्यंत पाच लाख रोपांच्या विक्रीचे उद्दिष्ट आहे. खरेदी केलेली रोपे थेट शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचविली जाणार आहेत. १० एप्रिलपर्यंत १६ रुपये प्रतिरोप आणि त्यानंतर १८ रुपये प्रतिरोप या दराने बुकिंग सुरू आहे.

# नंदुरबारमध्ये वस्त्रोद्योग मंत्रालयाचा ‘चौपाल’ उपक्रम

## ८० हून अधिक कारागिरांचा उत्स्फूर्त सहभाग



**नंदुरबार** : जिल्ह्यातील स्थानिक हस्तकलेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि कारागिरांना मुख्य प्रवाहातील बाजारपेठेशी जोडण्यासाठी, विकास आयुक्त (हस्तकला), वस्त्रोद्योग मंत्रालयातर्फे आयोजित ‘चौपाल’ उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालय आवारातील नियोजन भवनात उत्साहात झाला. उपक्रमात जिल्ह्यातील ८० पेक्षा अधिक कारागिरांनी केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती जाणून घेतली.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे कारागिरांना देण्यात आलेले ‘कारागीर पहचान कार्ड’बाबतचे मार्गदर्शन होते. छत्रपती संभाजीनगर येथील हस्तकला सेवा केंद्राचे सहाय्यक संचालक अमन कुमार आणि हस्तकला प्रोत्साहन अधिकारी शैलेंद्र सिंह यांनी कारागिरांना नोंदणी प्रक्रियेची माहिती दिली. अनेक नवीन कारागिरांची यावेळी जागीच नोंदणीही करण्यात आली. सक्षमीकरणासाठी आर्थिक सहाय्य, विपणन संधी, पुरस्कारांचे प्रक्रिया, परंपरा जतन यांसह विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. त्यात मुद्रा कर्ज आणि विविध सामाजिक सुरक्षा योजना, स्थानिक उत्पादनांना राष्ट्रीय आणि जागतिक बाजारपेठ मिळवून देणे, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील हस्तकला पुरस्कारांसाठी सहभागी होण्याची प्रक्रिया, भारताची विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

**युवाशक्ती अन् विविध विभागांचा समन्वय**

उपक्रमात केवळ कारागीरच नव्हे, तर महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), जिल्हा उद्योग केंद्र आणि ट्रायबल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनीही सक्रिय सहभाग नोंदविला. युवकांनी जागतिक स्तरावर न्यावी, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

पारंपरिक ‘चौपाल’ संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमामुळे कारागीर आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद साधला गेला. ग्रामीण उद्योजकता आणि कौशल्य विकासाला गती देण्यासाठी हा कार्यक्रम मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# तळोद्यात बिबट्याचा वावर

## शेळीचा फडशा : बंदोबस्त करण्याची मागणी

**मनोज माळी**
**तळोदा, १७ मार्च**

शहरालगतच्या भागात बिबट्याचा पुन्हा एकदा वावर वाढल्याचे समोर आले असून, बिबट्याने केलेल्या हल्ल्यात आमराईतील झोपडीतील शेळीचा फडशा पाडला. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अलीकडील घटनेत एका प्राण्याचा बळी गेल्याने शेतकरी आणि स्थानिक रहिवासी अधिकच घाबरले आहेत.

सोमवारी (१६ मार्च) रात्री साडेअकराच्या सुमारास शेतकरी राजेश तुकाराम सूर्यवंशी यांच्या शेतालगत असलेल्या आमराईतील झोपडीत बांधलेल्या शेळ्यांवर बिबट्याने हल्ला केला. त्यात एका शेळीचा जागीच मृत्यू झाला.घटनेनंतर परिसरातील लोकांनी आरडाओरड करताच बिबट्या तेथून पळून गेला. मात्र, काही वेळानंतर तो पुन्हा त्या ठिकाणी परत आल्याचे दिसून आले. याही वेळी नागरिकांनी सतर्कता दाखवत आवाज करून त्याला पळवून लावले. प्रत्यक्षदर्शींच्या मते, दोराला अडकलेल्या शेळीवर बिबट्या ताव मारत असल्याचे दृश्य त्यांनी पाहिले, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण आणखी तीव्र झाले आहे.

दरम्यान, रात्री एकटे बाहेर जाणे टाळावे, पाळीव प्राण्यांची सुरक्षित व्यवस्था करावी आणि बिबट्याचा कोणताही मागोवा आढळल्यास तत्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन वनविभागातर्फे करण्यात आले आहे. वनविभागाने केवळ नागरिकांना केवळ खबदारी घेण्याचे आवाहन न करता, मनुष्यहानीची वाट न पाहता, या बिबट्यांना जेरबंद करण्याची युद्ध पातळीवर उपाययोजना राबविण्यात यावे, अशी तालुक्यातील नागरिक, शेतमजूर, शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.



## घरगुती गॅसचा वापर करणाऱ्या तीन हॉटेल्सवर पुरवठा विभागाची कारवाई

### चार सिलेंडर जप्त; अहवाल डीएसओ कार्यालयाकडे होणार सादर

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, १७ मार्च**

घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक कारणांसाठी वापर करणाऱ्या तीन हॉटेल्सवर पुरवठा विभागाने मंगळवारी (१७ मार्च) कारवाई केली. या कारवाईत ४ घरगुती गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले असून या कारवाईचा अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाला सादर करण्यात येणार असल्याची माहिती पुरवठा निरीक्षण अधिकारी शिवकुमार निरगुडे यांनी दिली आहे.

सध्या गॅस सिलेंडरच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. घरगुती वापराच्या सिलेंडरवर मिळणारे अनुदान आणि व्यावसायिक सिलेंडरच्या किमतीत मोठी तफावत असल्याने काही हॉटेल चालक जास्तीचा नफा कमवण्यासाठी घरगुती सिलिंडरचा वापर करत असल्याचे समोर येत आहे. यामुळे घरगुती ग्राहकांना वेळेवर गॅस उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होत आहेत. ही बाब लक्षात घेऊन पुरवठा विभागाने कडक पावले उचलायला सुरुवात केली आहे.

मंगळवारी (१७ मार्च) शहरातील हॉटेल एकवीरा, शीतल डायनिंग आणि अशोक रेस्टॉरंट या ३ हॉटेल्समध्ये तपासणी करण्यात आली. यावेळी नियमांचे उल्लंघन करून घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याचे आढळून आले. त्यानंतर प्रशासनाकडून जप्तीची कारवाई करण्यात करण्यात येवू जप्त केलेले सिलेंडर गॅस एजन्सीला सुपूर्द करण्यात आल्याची माहिती पुरवठा निरीक्षण शिवकुमार निरगुडे यांनी 'तभा'ला दिली.

**हॉटेल चालक प्रशासनाच्या रडारवर**

जप्त करण्यात आलेल्या सिलिंडरचा पंचनामा करण्यात आला असून हा अहवाल तातडीने डीएसओ कार्यालयाकडे वर्ग केला जाणार आहे. हॉटेल किंवा इतर व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्ये निळ्या रंगाचा सिलिंडर वापरणेच बंधनकारक आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर इंधन जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

---

## चुंचाळे गायरान प्रश्न निकाली; ११५ घरकुलांचे जागा मोजमाप

### आजी-माजी आमदार सोनवणे यांचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, १७ मार्च**

चुंचाळे येथील गायरान प्रश्न निकाली निघाला आहे, यात गेल्या ३५ वर्षापासून प्रलंबीत असलेल्या घरकुलांच्या जागा मोजणीचा प्रश्न मोकळा होऊन जागेचे मोजमाप करण्यात येणार आहे. त्यामुळे या परिसरातील सुमारे ११५ आदिवासी बांधवांना घरकुलाचा लाभ मिळणार आहे.

आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे व माजी आमदार लताताई सोनवणे यांनी तसेच आदिवासी सेवक संजीव पांडुरंग शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी बांधवांच्या या मागणी संदर्भात जळगाव जिल्हाधिकारी यांच्यामार्फत आमदार प्राध्यापक चंद्रकांत सोनवणे यांनी पाठपुरावा केला. यामुळे प्रश्न निकाली काढला असून गायरान प्रश्न मार्गी लागला असून इ ११५ घरकुलांसाठी पंचायत समिती मार्फत जागावाटप जागा मोजमाप सुरू झाले आहे. तसेच या गावात आता जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याची टाकी, महिला व पुरुषांसाठी सार्वजनिक शौचालय व घरकुले मंजूर करण्यात आले आहे.

चुंचाळे ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या गायरान जमिनीवर गेल्या ३० ते ३५ वर्षापासून आदिवासी पावरा समाजाचा रहिवास आहे. मात्र ते घरकुलापासून वंचित होते. त्यासाठी आदिवासी सेवक संजीव शिरसाट यांच्या नेतृत्वाखाली तितऱ्या बारेला, रेल सिंग बारेला, कीर्ती बारेला यासह आदिवासी बांधवांना घरकुल मिळावे यासाठी माजी आमदार लताताई सोनवणे, आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती गट विकास अधिकारी मंजुश्री गायकवाड यांच्याकडे निवेदन दिले होते.

घरकुल मोजमापप्रसंगी रेवलसिंग बारेला पोलीस पाटील, चुंचाळे ग्रा.प.चे नौशाद तडवी सरपंच, सपना कोळी उपसरपंच, सरला कोळी ग्रा.प.सदस्या, कुर्बान तडवी, रहेमान तडवी, संजय पाटिल, मनोज धनगर, बैतुल तडवी, जरीना तडवी, अनिल पावरा ग्रा. प. सदस्य मेलाणे, देवसिंग पावरा पोलीस पाटील उनपदेव, गणदास बारेका पोलीस पाटील शेवरे बुद्रुक, कालुसिंग बारेला, तारसिंग बारेला, मन्या बारेला, रेवलसिंग बारेला, दिनेश बारेला, किर्ती बारेला, कुंती बारेला, दुनाबाई बारेला, रुखमाबाई बारेला, विमलबाई बारेला, जेहदु बाई बारेला, सुकमा बाई बारेला, कुंमटी बाई बारेला, बजाऱ्या बारेला, दिवसिंग बारेला, मगन बारेला, नानल्या बारेला, भावलाल बारेला उपस्थित होते .

पी एम आवास योजना व शबरी योजने अर्नगत ११५ आदिवासी यांना घरकुल जागेसाठी गटविकास अधिकारी डॉ .मंजुश्री गायकवाड यांच्या आदेशानुसार पंचायत समितीचे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक दिनेश पाटील, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता हर्षल चौधरी, ग्रामसेवक निकेतन बिऱ्हाडे यांनी जमिनीचे मोजमाप केले.



आदिवासींचा जिव्हाळ्याच्या घरकुल प्रश्नी बऱ्याच वर्षापासून प्रयत्नशील होतो. २८ ऑक्टोबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात लेखी निवेदन देत उपोषणादरम्यान तितऱ्या बारेलासह आदी आदिवासी बांधव ठाण मांडून होते. अखेर आमदारांच्या प्रयत्नाने आदिवासी बांधवांचे घरकुलाचे स्वप्न सत्यात उतरत आहे.

**-संजीव पांडुरंग शिरसाठ (आदिवासी सेवक)**

---

## कंत्राटी कामगारांचा वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी; कामबंद आंदोलनाचा निर्णय मागे

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, १७ मार्च**

नगरपरिषदेत कंत्राटी कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. त्यामुळे कामगारांनी दिलेला कामबंद आंदोलनाचा इशारा मागे घेतला आहे.

गेल्या ४ महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे कामगारांमध्ये नाराजी होती. दरम्यान, ही परिस्थिती लक्षात घेऊन आ.चंद्रकांत सोनवणे यांनी वेतनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार नगराध्यक्षा नम्रता पाटील, मुख्याधिकारी राम निवास झंवर आणि नगरसेवकांनी तत्काळ पुढाकार घेत ठेकेदाराशी चर्चा केली. तसेच नगरपरिषदेकडून ठेकेदाराला ३ महिन्यांचे बिल अदा करून कामगारांचे वेतन तात्काळ देण्याचे आदेश देण्यात आले.

या निर्णयामुळे कामगारांना दिलासा मिळाला असून त्यांनी आंदोलन मागे घेत पुन्हा कामावर रुजू होण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी बांधकाम सभापती हुसेन खान पठाण, स्वच्छता सभापती रमेश शिंदे तसेच इतर नगरसेवकांनी कामगारांशी संवाद साधून परिस्थिती शांततेत सोडवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

**न्याय देणे ही आमची जबाबदारी**

कामगारांनी कामबंद आंदोलनाचा निर्णय मागे घेतल्यानंतर नगराध्यक्षा नम्रता पाटील, मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी, पाणीपुरवठा व स्वच्छता या सेवा शहरासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कामगारांच्या अडचणी समजून घेत त्यांना न्याय देणे ही आमची जबाबदारी आहे. कामगारांनी प्रशासनावर दाखवलेला विश्वास कायम ठेवू, अशी प्रतिक्रिया दिली.

---



## वरणगावात समाधान शिबिर स्थगित; संतप्त नागरिकांकडून भुसावळ तहसीलदारांना मोर्चाद्वारे निवेदन

**भुसावळ** : वरणगाव शहर परिसर तसेच मंडळ स्तरावरील छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर वरणगाव नगरपरिषद येथे सोमवार दि. १६ मार्च रोजी घेण्यात येणार होते. या अनुषंगाने नायब तहसीलदार प्रीती लुटे यांच्या उपस्थितीत शिबिर पूर्वतयारी बैठकही पार पडली होती. मात्र, ऐनवेळी समाधान शिबीर सोमवारी पुढे ढकलण्यात आल्याचे समारे आले.

त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळून नागरिकांनी भुसावळ तहसील कार्यालयावर मोर्चा नेत तहसीलदार निता लबडे यांना निवेदन देत निषेध केला.

समाधान शिबीराच्या पार्श्वभूमीवर सोमवारी सकाळपासूनच वरणगाव नगरपरिषद येथे सुमारे ३०० च्यावर नागरिकांची गर्दी झाली होती. रेशन कार्डसंदर्भातील नोंदणी, १४ अंकी क्रमांक मिळविणे, नाव वाढवणे किंवा कमी करणे यांसारख्या कामांसाठी नागरिक मोठ्या अपेक्षेने शहरातील अनेक गोरगरीब नागरिकांनी दिवसभराचा रोजगार बुडवून नगरपरिषदेत हजेरी लावली होती.

मात्र शिबीराप्रसंगी तहसिल विभागाचे अधिकारी आलेच नाही. वरणगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सुनील काळे यांनी नागरिकांची नोंद घेण्यासाठी टेबल लावून नोंदणी प्रक्रिया सुरू केली होती. मात्र शिबीर पुढे ढकलण्यात आल्याची माहिती मिळताच नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करीत '१६ तारखेला होणारे शिबीर कोणाच्या आदेशावरून रद्द किंवा पुढे ढकलण्यात आले असा प्रश्न संतप्त नागरिकांनी उपस्थित केला.

यानंतर दुपारी १२ वाजेच्या सुमारास ३००च्यावर नागरिकांनी वरणगावहून भुसावळ तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. प्रशासनाच्या माहितीनुसार, घरगुती गॅस सिलेंडर तुटवड्यामुळे भुसावळ पुरवठा विभाग गॅस सिलेंडर तपासणी करत असल्याचे सांगण्यात येवून शिबीर पुढे ढकलण्यात आले आहे. तहसीलदार निता लबडे यांनी नागरिकांना दिलगिरी व्यक्त करत ' याबाबत रविवारीच पत्र काढण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली असेल त्याबाबत प्रशासनाच्या वतीने दिलगिरी व्यक्त करते'

'शहरातील अनेक गोरगरीब आणि मजूर वर्ग नागरिक रेशन कार्ड, धान्य किंवा अन्य लाभांपासून वंचित आहेत. प्रशासन त्यांना मदत करण्यासाठी तत्पर आहे. आगामी सप्ताहात नगरपरिषद परिसरात शिबीर लवकरच आयोजित केले जाईल आणि नागरिकांनी त्या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.' 'नागरिकांनी आपला संताप व्यक्त करण्यासाठी तहसील कार्यालयाकडे मोर्चा काढला, हे आम्ही समजून घेतो. प्रशासन नागरिकांच्या भावना समजून घेते आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर आहे. पुढील शिबीर अधिक सुव्यवस्थित आणि सुलभ पद्धतीने पार पडेल.''

'नागरिकांनी संयम ठेवावा आणि प्रशासनावर विश्वास ठेवावा. लवकरच तारीख निश्चित करून शिबीर आयोजित केला जाईल आणि नागरिकांच्या समस्यांवर तत्परतेने उपाय केले जातील असेही तहसीलदार निता लबडे सांगितले.

---

## सावदा पालिकेच्या सभेत टक्केवारीच्या मुद्यावरून खडाजंगी

### विरोधक सत्ताधाऱ्यांच्या गोंधळात २७ विषयांना मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**सावदा, १७ मार्च**

सावदा नगरपालिकेची निवडणुकी नंतरची पहिली सर्वसाधारण सभा नगराध्यक्षा रेणुका पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पालिका सभागृहात माजी मुख्यमंत्री स्व यशवंतराव चव्हाण यांचे जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन अभिवादन करण्यात येवून पार पडली

दरम्यान सभेत काही विषयांनावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये कामांच्या टक्केवारीच्या संदर्भात जोरदार खडाजंगी उडाली. या वादविवादा दरम्यान सर्व विषयांवर चर्चा होऊन पटलावर असलेल्या सर्व २७ विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. यावेळी मागील प्रसिडिंग वाचून कायम करण्यादरम्यान राष्ट्रवादी गटाच्या नगरसेविका सीमा लोखंडे व नगरसेवक विशाल तायडे, यांनी पहिल्याच सभेत पटलावर २७ विषय घेण्यात आले आहेत. परंतु दलित वस्ती योजनेंतर्गत एकही काम घेण्यात आले नसल्याचा प्रश्न उपस्थित करीत नगराध्यक्षा मागासवर्गीय गटातून आरक्षणाचा लाभ घेत निवडून आल्या असल्यातरी त्यांना मागासवर्गीय प्रभागातील कामाचा विसर पडला असल्याचेही विचारणा केली.

यावर शिक्षण सभापती सचिन बऱ्हाटे यांनी प्रभागात कामे सुचविली तर ती कामे घेता येतील असे स्पष्टीकरण दिले. तसेच नगराध्यक्षा रेणुका पाटील यांनी आपण मागासवर्गीय प्रभागात अनेक कामे करणार असून त्यासाठी थोडा वेळ द्यावा लागेल असे सांगितले. या प्रभागात अनेक प्रश्न असतांना यापूर्वी तेथे कामे झाली नाहीत, झाली असतील तर ती व्यवस्थित झाली नसल्याचे सांगत येत्या काळात या प्रभागात प्रस्तावित कामे आपण घेऊ असे संगितले

राष्ट्रवादी गटाचे नेते राजेश वानखेडे यांनी ना. वी. ह. पाटील कन्याशाळा व आ.ग. हायस्कुल मधील पी एम श्री योजने मैदान विकास व म जबुतीकरण कामांविषयी प्रश्न उपस्थित केला. यावर काम पालिकेचे नसून जिल्हापरिषद अंतर्गत असून याबाबत जिल्हापरिषद सीइओंकडे या काम ाच्या ठकेदाराची चौकशी करून कार्यवाही करावी व काम पूर्ण करून मिळण्यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे मुख्याधिकारी भूषण वर्मा यांनी संगितले.

या एका योजने अंतर्गत आ.ग.हायस्कूल मध्ये एक सुमारे एक कोटी एकवीस लाख रु खर्चातून एक हॉल बांधण्यात येत असून याचे काम अतिशय निकृष्ट असून याची त्रयस्थ चौकशी करावी, तसेच पालिकेतर्फे चौकशी समिती नेमण्याची मागणी केली, शहरातील फैजपूर रोडवरील काही गटांना एन ए ची परवानगीदरम्यान नाले असतांना त्या कडे दुर्लक्ष करून जुन्या व बनावट मोजणी शीट वापरून त्यांना एन ए परवानगी देण्यात आली असल्याचा आरोप करण्यात आला.

दरम्यान काही कामांचा विषय टक्केवारी वक्तव्य निघाल्याने यावेळी सत्ताधारी नगरसेविका प्रतीक्षा भंगाळे, उपनगराध्यक्ष फिरोजखान पठाण यांनी स्पष्ट नामोल्लेख करून संपूर्ण सभागृहास बोलू नये असे संगितले. या टक्केवारीच्या विषयावरून सभागृहात सत्ताधारी व विरोधक आमने सामने येत शाब्दिक खडाजंगी पहावयास मिळाली.

यावेळी नगरसेवक शाम अकोले, फिरोज खान अब्दार खान यांनी मध्यस्ती केली. व वादावर पडदा पडला. राजेश वानखेडे यांनी साहित्यिक व.पू.होले यांचे नावाने योगा सेंटर किंवा अभ्यासिकेचा विषयासोबत सौजन्य फाउंडेशनतर्फे विश्राम गृहाजवळ छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा संदर्भात प्रस्ताव जुना झाल्याने त्यासाठी नव्याने ठरावाची मागणी देखील केली,

कुशल अकुशल कामे, ठेकेदाराची काम करणारी माणसे, काढण यात येणारे बिल, इतके म ाणसे आवश्यक आहेत का तसेच पालिकेचे कायम स्वरूपी माणसे असताना त्यांची कामे कोणती असे प्रश्न नगरसेवक शाम अकोले यांनी उपस्थित केले.



दरम्यान सभागृहात भाजपा गट नेत्या रंजना भारंबे, सचिन बऱ्हाटे, सूरज परदेशी, नकुल बेंडाळे, सिमरन वानखेडे, सुनील जंगले, आदींनी सहभाग घेतला,

सावदा ग्रामीण रुग्णालयास छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्यासंदर्भात पाठपुरावा करण्याची मागणी माजी नगराध्यक्ष राजेंद्र चौधरी यांनी केली होती. यावर नगरसेवक वानखेडे यांनी जागा नगरपालिका मालकीची असून तेथे पालिकचे रुग्णालय होते. परंतु पालिकेने ग्रामीण रुग्णालयासाठी जागा देताना रुग्णालयास नगरपालिकाच्या पूर्वी अस्तित्वात असलेल्या रुग्णालयाचे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय हेच नाव द्यावे ह्याच अटीवर ती जागा शासनास विनामुल्य दिली असून आता या ग्रामीण रुग्णालयास छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्याबाबत पालिकेने योग्य तो पाठपुरावा करावा असे सांगितले,

---

## नन्हे रोजदार हुजेफा मुल्लाजीचा रोजा

**कासोदा (ता. एरंडोल)** : येथील



सना आर्टचे संचालक जियाउद्दीन मुल्लाजी यांच्या सहावर्षीय मुलगा हुजेफा याने कडक उन्हाळ्यात काही न खाता, न पिता रमजान महिन्याच्या रोजा केला आहे. एक रोजा या महिन्यात २६ वा रोजा जो असतो, त्याला खानदेशी भाषेत 'बडे खतम का' असे म्हणतात, तो रोजा त्याने ठेवला होता. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

---

# डिडॉलर भारतसाठी एक नवी संधी

पेट्रोडॉलर प्रणाली (आंतरराष्ट्रीय तेल व्यापार डॉलरमध्ये करणे) सध्या रशिया, चीन आणि भारत यांसारख्या देशांकडून स्थानिक चलनाचा वापर, ब्रिक्स विस्तार आणि रिन्युएबल एनर्जीकडे जागतिक कल यामुळे आव्हानांचा सामना करत आहे. १९७० च्या दशकापासून अमेरिकन वर्चस्व टिकवून ठेवणारी ही व्यवस्था, आता 'डी-डॉलरायझेशन' आणि पर्यायी पेमेंट सिस्टममुळे कमकुवत होत आहे.

---

**पेट्रोडॉलर प्रणालीला प्रमुख आव्हाने**

**स्थानिक चलनात व्यापार :** रशिया-युक्रेन युद्धानंतर, रशियाने भारत आणि चीनला तेल विकताना डॉलरऐवजी रुबल, युआन किंवा रुपयाचा वापर वाढवला आहे।

**ब्रिक्सचा विस्तार :** ब्रिक्स देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि 'डी-डॉलरायझेशन' ला प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या चलनांचा वापर वाढवण्यावर भर दिला आहे।

**चीनचे युआन :** चीन आखाती देशांकडून (उदा. सौदी अरेबिया) युआनमध्ये तेल खरेदी करण्याचा प्रयत्न करत आहे, ज्यामुळे डॉलरला थेट टक्कर मिळत आहे।

**हरित ऊर्जा संक्रमण :** जागतिक स्तरावर खनिज तेलाकडून नूतनीकरणक्षम ऊर्जेकडे संक्रमण होत असल्याने, तेलावर आधारित पेट्रोडॉलर प्रणालीचे महत्त्व भविष्यात कमी होऊ शकते।

---

**सौदी अरेबियाची बदलती भूमिका :** सौदी अरेबिया आता फक्त अमेरिकेवर अवलंबून न राहता चीनसह अन्य देशांशी व्यापारी संबंध सुधारत आहे, ज्यामुळे डॉलरच्या मक्तेदारीला धक्का बसत आहे।

---

**ऐतिहासिक संदर्भ आणि परिणाम :**

१९७४ मध्ये, अमेरिकेने सौदी अरेबियाला सुरक्षा हमी देऊन तेल व्यापार डॉलरमध्ये करण्याचे मान्य करून घेतले होते, ज्यामुळे डॉलरला जागतिक राखीव चलन म्हणून मान्यता मिळाली या प्रणालीला आव्हान देणाऱ्या राष्ट्रांना (उदा. इराकचा सद्दाम हुसेन) अमेरिकेच्या रोषाला सामोरे जावे लागले होते, जरी सध्या ८०% पेक्षा जास्त तेलाचे व्यवहार डॉलरमध्ये होत असले तरी, वरील आव्हानांमुळे पेट्रोडॉलर प्रणालीचे दीर्घकालीन भविष्य अस्थिर मानले जात आहे. जागतिक राजकारण आणि अर्थव्यवस्थेत सध्या पेट्रोडॉलर, चीनचे चलन युआन आणि भारतीय रुपया यांच्यातील संघर्ष हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

---

**याचे प्रमुख जागतिक परिणाम खालीलप्रमाणे आहेत:**

**१. पेट्रोडॉलर प्रणालीला आव्हान दबदबा कमी होणे :** अनेक दशकांपासून जागतिक तेल व्यापार प्रामुख्याने अमेरिकन डॉलरमध्ये होतो, ज्याला 'पेट्रोडॉलर' म्हणतात. मात्र, आता इराण आणि रशियासारखे देश डॉलर सोडून इतर चलनांत व्यापार करत असल्याने अमेरिकेच्या आर्थिक वर्चस्वाला मोठा धक्का बसत आहे.

**भू-राजकीय तणाव :** इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेल वाहतुकीसाठी युआनमध्ये पेमेंट करण्याची अट घातल्याने अमेरिका आणि इराणमधील तणाव अधिक वाढला आहे.

**२. चिनी युआनचा वाढता प्रभाव पर्यायी चलन :** चीन आपले चलन 'युआन' हे डॉलरला पर्याय म्हणून जागतिक स्तरावर प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. अनेक देश आता तेलाची खरेदी युआनमध्ये करत आहेत, ज्यामुळे चीनचे जागतिक चलन बनण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकते.

**मर्यादा :** युआन हे पूर्णपणे 'कन्व्हर्टेबल' (सहज बदलता येणारे) चलन नसल्यामुळे त्याचा प्रसार अजूनही डॉलरच्या तुलनेत कमी आहे.

**३. भारतीय रुपयाचे जागतिकीकरण स्थानिक चलनातील व्यापार :** भारताने रशियासारख्या देशांशी व्यापार करताना रुपयाचा वापर वाढवला आहे. हे भारताच्या आर्थिक सुरक्षेसाठी आणि डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे.

समस्या: रशियासारख्या देशांकडे मोठ्या प्रमाणात रुपये जमा झाले आहेत, परंतु ते जागतिक बाजारात खर्च करणे त्यांना कठीण जात आहे, कारण रुपया अजून पूर्णपणे जागतिक स्तरावर स्वीकारलेला नाही.

**४. जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम चलन बाजारातील अस्थिरता:**

डॉलरच्या मजबूतीमुळे रुपयासारख्या चलनांचे मूल्य कमी होत आहे (उदा. १ डॉलर = रू. ८७.४९ पर्यंत घसरण), ज्यामुळे आयातीचा खर्च वाढत आहे.

**पुरवठा साखळीत व्यत्यय :** हे चलन युद्ध आणि मध्यपूर्वेतील संघर्षामुळे ऊर्जा संकट निर्माण होऊ शकते आणि जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम होऊ शकतो. संधी: तज्ञांच्या मते, अमेरिका-सौदी पेट्रोडॉलर करारातील बदल ही भारतासाठी आपली आर्थिक ताकद वाढवण्याची एक मोठी संधी असू शकते.

---

**चीनचा युआन आणि'पेट्रोयुआन'चे आव्हान पेट्रोयुआन:**

चीन तेल उत्पादक देशांकडून (उदा. रशिया, इराण) युआनमध्ये तेल खरेदी करण्याचा आग्रह धरत आहे, ज्याला 'पेट्रोयुआन' म्हटले जाते.

**उद्देश :** अमेरिकन डॉलरवर असलेले अवलंबित्व कमी करणे आणि जागतिक व्यापारात युआनचे महत्त्व वाढवणे हा चीनचा मुख्य उद्देश आहे. इराणची भूमिका : ताज्या घडामोडींनुसार, इराणने 'होर्मुझ सामुद्रधुनी' मधून जाणाऱ्या तेल टँकर्सना केवळ युआनमध्ये व्यवहार करण्याची अट घातल्याच्या बातम्या आहेत, ज्यामुळे पेट्रोडॉलर व्यवस्थेला मोठा धक्का बसू शकतो.

**३. सध्याची परिस्थिती आणि परिणाम निर्बंधांवर तोडगा:**

रशिया, इराण आणि वेनेझुएला यांसारखे देश, ज्यांच्यावर अमेरिकेने आर्थिक निर्बंध लादले आहेत, ते या निर्बंधांतून वाचण्यासाठी युआनचा वापर करत आहेत. गुंतवणुकीवर परिणाम: जर पेट्रोयुआनचे वर्चस्व वाढले, तर डॉलरचे मूल्य कमी होऊ शकते, ज्यामुळे जागतिक बाजारात सोने आणि चांदीचे दर वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. मर्यादा: युआनचे महत्त्व वाढत असले तरी, जागतिक गंगाजळीत डॉलरचा वाटा अजूनही ५८% पेक्षा जास्त आहे, तर युआनचा वाटा केवळ २.७% च्या आसपास आहे. त्यामुळे डॉलरचे वर्चस्व पूर्णपणे संपण्यास बराच वेळ लागू शकतो. जागतिक राजकारणात डीडॉलरायझेशन प्रक्रियेला वेग आला असून, भारतही आता अनेक देशांशी स्थानिक चलनात व्यापार करण्याचे प्रयत्न करत आहे.

**- डॉ. अमोल कोपरकर, अर्थतज्ञ**
**(आंतर राष्ट्रीय व्यापार, शेती, वित्त)**

---

**धरणगांव नगरपरिषद ता. धरणगांव जि. जळगांव**

धनपा/बांधकाम विभाग/ जाहिर निविदा सुचना /२०२६/
दिनांक

**- ई निविदा सुचना-**

तमाम शासनमान्य मक्तेदार, यांना ई निविदेव्दारे कळविणेत येते कि, धरणगांव नगरपरिषद हद्दीत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात खालील नमुद कामे करणेसाठी जाहिर निविदेव्दारे दर मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव व तपशील | कामाची मुदत |
|---|---|---|
| १. | धरणगांव नगरपरिषद हद्दीतील गटार, धापे, रस्ते, सर्व प्रकारचे देखभाल दुरुस्ती करणे | ३६५ दिवस |

उपरोक्त कामासाठी www.mahatender.com या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर कामाबाबत सविस्तर माहिती महाटेंडरच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

सही/-
मुख्याधिकारी
धरणगांव नगरपरिषद

**चोपडा नगरपरिषद चोपडा, जि. जळगांव**

**जाहिर निविदा सुचना**

तमाम नोंदणीकृत अभिकर्ता/संस्था/पुरवठादार/सेवा पुरवठादार यांना या वार्षिक निविदेसूचनेद्वारे कळविण्यात येते की, चोपडा नगरपरिषदे मार्फत स्वच्छता विभागाकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता खालील कामांसाठी वार्षिक दरकरार करणेकामी निविदा पध्दतीने निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १. | स्वच्छता विभागाकरीता न. पा. हद्दीत फवारणी करणेकामी जंतुनाशके पुरवठा करणे, |
| २. | विविध अभियान राबविणेकरीता लागणारे बॅनर व त्याअनुषंगिक साहित्य तयार करुन पुरवठा करणे. |
| ३. | विविध अभियान व प्रासंगिक कार्यक्रम राबविणेकरीता आवश्यक असणारे विविध साहित्य किंवा त्याअनुषंगिक साहित्य तयार पुरवठा करणे. |
| ४. | न.प. सफाई कर्मचारी यांना दैनंदिन साफसफाई करीता लागणारे साहित्य व संरक्षक साहित्य पुरवठा करणे. |

वरील निविदेकरीता निविदा प्रपत्राची किंमत र. रु.५००/- तर निविदेसोबत भरावयाची इसारा र.रु.५०००/- असेल. दि.१८/०३/२०२६ ते दि.२५/०३/२०२६ पर्यंत अटी-शर्ती व निविदा फॉर्म इकडील कार्यालयास पहावयास मिळतील.

मुख्याधिकारी
चोपडा नगरपरिषद, चोपडा

**चोपडा नगरपरिषद चोपडा, जि. जळगांव** **जाहिर निविदा सुचना**

चोपडा नगरपरिषदेसाठी खालील नमूद कामांसाठी निविदा मागविणेत येत असुन दि.१८/०३/२०२६ ते दि.२५/०३/२०२६ पावेतो सायं. ०५:०० वाजेपावेतो द्वि-लिफाफा पध्दतीने सीलबंद लिफाफ्यात निविदा स्वतंत्ररित्या नमुद करुन सिलबंद लिफाफा दिलेल्या मुदतीत नगरपरिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करावे. मुदतीनंतर प्राप्त निविदांचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये चोपडा नगरपरिषदेकडील विविध वाहनांसाठी आवश्यकतेनुसार बॅटरी पुरवठा करणे. |
| २. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये चोपडा नगरपरिषदेकडील विविध वाहनांसाठी आवश्यकतेनुसार विविध प्रकारचे ऑईल, कुलंट, युरिया व ग्रीस यांचा पुरवठा करणे. |
| ३. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये चोपडा नगरपरिषदेकडील विविध वाहनांसाठी आवश्यकतेनुसार निघणा-या दुरुस्तीसाठी लागणारे साहित्यांचा पुरवठा करणे. |
| ४. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये चोपडा नगरपरिषदेकडील विविध वाहनांसाठी आवश्यकतेनुसार टायरट्युबचा पुरवठा करणे. |
| ५. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये चोपडा नगरपरिषदेकडील विविध वाहनांसाठी आवश्यकतेनुसार निघणाऱ्या विविध दुरुस्तीचे कामे करणे. |

वरील निविदेकरीता निविदा फी र.रु.५००/- तर बयाणा र.रु.५०००/- असेल. दि.१८/०३/२०२६ ते दि.२५/०३/२०२६ पर्यंत अटी-शर्ती व निविदा फॉर्म इकडील कार्यालयास पहावयास मिळतील.

मुख्याधिकारी
चोपडा नगरपरिषद, चोपडा

## थोडक्यात महत्त्वाचे...



### सोयगाव बसस्थानकात मोफत पाणपोई सुरू

**सोयगाव** : संतश्री आसारामबापू साधक परिवारातर्फे व हरिभक्त परायण नाईकदादा यांच्या कृपेने अध्यक्ष राजेंद्र आहिरे व विजय आहिरे यांच्यातर्फे मंगळवारी (१७ मार्च) सोयगाव बसस्थानकात मोफत पाणपोई सुरू करण्यात आली. तालुक्यातील खेड्यापाड्यातून येणाऱ्या नागरिकांना शुद्ध व शीतल पाण्याची सेवा सुरू केली. वाहतूक नियंत्रक कडुबा भडके, विजय आहिरे, समाजसेवक अंकुश पगारे, गोविंद आहिरे यांच्या हस्ते पाणपोईचे उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी वाहतूक नियंत्रक कडुबा भडके, गोविंद अहिरे, अंकुश पगारे, योगेश बोखारे, अमोल सोहनी, भय्या सुर्वे, ईश्वर आगे, गोलू शिंदे, साई बोखारे आदी उपस्थित होते.

### नशिराबाद येथे वीरपत्नींचा २२ रोजी सन्मान

**नशिराबाद** : स्वयंशोध फाउंडेशनच्या वतीने देशासाठी बलिदान दिलेल्या शूर जवानांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'वीरांना वंदन : वीरपत्नी सन्मान सोहळा' आयोजीत करण्यात आला आहे. नशिबाद येथील न्यू इंग्लिश स्कूल परिसरात रविवार, २२ मार्च रोजी सकाळी ९ वाजता राणी लक्ष्मीबाई सभागृहात वीरमरण आलेल्या सैनिकांच्या बलिदानाची आठवण जपण्यासह त्यांच्या वीरपत्नींच्या धैर्याचा गौरव करण्यात येणार आहे. या प्रसंगी वीरमाता आणि वीरपत्नींना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. स्वयंशोध फाउंडेशनने सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

### गोठा शेड अनुदान चार वर्षांपासून मंजूर

#### कर्ज काढून बांधकाम पूर्ण करूनही लाभापासून वंचित

**कासोदा (ता. एरडोल)** : एरंडोल तालुक्यातील उमरे येथील लताबाई संभाजी पाटील यांना फेब्रुवारी २०२२ ला गोठा शेड मंजूर झाले आहे. त्यानुसार या लाभार्थीनी कर्ज काढून गोठा शेड बांधकाम एप्रिल २०२२ दरम्यान पूर्ण केले. परंतु अद्याप पर्यत पंचायत समितीत संबधीत विभागातर्फे वेळोवेळी मागणी पाठपुरावा करूनही या लाभार्थ्यास अनुदानाचा लाभ मिळालेला नाही. यासंदर्भात अनुदान लाभ न मिळाल्याने सोमवार १६ मार्च पासून एरंडोल पंचायत समिती येथे कुटुंबासह आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे.

उमरे येथील लताबाई संभाजी पाटील यांना फेब्रुवारी २०२२दरम्यान गोठा शेड मंजूर झाले होते. त्यानुसार त्यांनी ६९ हजार ४४९ रुपयांचे कर्ज काढून गुरांचा गोठा बांधकाम पूर्ण केले. त्या अनुषंगाने एप्रिल २०२२ मध्ये शासन अनुदानासाठी गेल्या चार वर्षांत पंचायत समिती एरंडोलकडे वारंवार मागणी केली. त्यांना अद्यापही गोठा बांधकाम शासन अनुदानाची रक्कम मिळाली नाही. त्यानुसार अनुदान रक्कम त्यांना न मिळाल्याने ते १६ मार्च २०२६ रोजी पंचायत समिती एरंडोल येथे कुटुंबासह आमरण उपोषणाला बसणार असल्याचे पत्रक त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जळगाव यांना दिले असून त्याच्या प्रती संबंधिताना दिलेल्या आहेत. सदर उपोषणा दरम्यान काही बरे वाईट झाल्यास त्यास गटविकास अधिकारी पंचायत समिती एरंडोल हे जबाबदार असतील असेही पत्रकात नमूद केले आहे.



### मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे मोतीबिंदू तपासणी शिबिर

#### १२७ जणांच्या तपासणीनंतर ७१ रुग्णांवर होणार शस्त्रक्रिया

**अमळनेर** : येथील मंगळ ग्रह सेवा संस्था, ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाउंडेशन पाळधी, संकल्प सेवा फाउंडेशन धनवाडी व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांच्यातर्फे १५ मार्च रोजी श्री मंगळ ग्रह मंदिरात मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर पार पडले. यात १२७ रुग्णांची नेत्रतपासणी करण्यात आली असून तपासणीअंती ७१ रूग्णांवर मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

अमळनेर येथे मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे नेत्ररूग्ण तपासणी शिबिरात डॉ. राहुल चौधरी, भुपेंद्र वाघ, विजय संमेसे, हर्षदा शिंदे, प्राची गायकवाड, योगेश कोळी, सागर पाटील यांनी रूग्ण तपासणी केली. यात अमळनेर, धुळे, चोपडा, जळगाव, एरंडोलसह तालुक्यातील ग्रामीण भागातील रूग्णांचा सहभाग होता. शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आलेल्या रूग्णांना मंगळवार, दि. १७ मार्च रोजी श्री मंगळग्रह मंदिर येथून विशेष वाहनाने आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) येथे शस्त्रक्रियेसाठी त्यांना रवाना करण्यात येणार आहे.

नेत्र रूग्ण तपासणीसाठी मंगळ ग्रह सेवा संस्थेचे जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी, रजनीकांत पाटील, गणेश शिंदे, प्रमोद पाटील, नितेश बारी आदींनी सहकार्य केले. दरम्यान, नेत्र रूग्ण शिबिर दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी श्री मंगळ ग्रह मंदिर येथे नियमितपणे घेण्यात येते. याचा गरजू रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

### लाकूड वखारीतील अवैध साठ्यावर तत्काळ कारवाई करा

#### वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना लहुजी सेनेतर्फे निवेदन

**पाचोरा** : भडगाव शहर व परिसरात बेकायदेशीर लाकूडतोड होत आहे. यासंदर्भात परिसरातील लाकडांच्या वखारातील अवैध लाकूड साठा प्रकरणी तपासणी होवून तात्काळ कारवाई करण्यात यावी यासंदर्भात पाचोरा वनपरिक्षेत्र अधिकारी यांना लहुजी सेनेचे प्रदेश अध्यक्ष गुरुदास भालेराव यांच्या तर्फे निवेदन देण्यात आले.

पाचोरा वनपरिक्षेत्र अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भडगाव शहर व परिसरात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर लाकूडतोड सुरू आहे. अनेक व्यक्तींकडून जिवंत झाडांची अवैध तोड करीत ट्रॅक्टर, पिकअप व इतर वाहनांमधून खुलेआमपणे वाहतूक केली जात आहे. यात संबधीत लाकडांच्या वखारीत अवैधपणे लाकूड साठा केला जात असून यामुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

झाडे ही पर्यावरणासाठी महत्त्वाचे असून त्यांची होणारी बेकायदेशीर तोड उघडपणे होत असूनही संबंधित विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात गांभीर्याने दखल घेत भडगाव शहर व परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर लाकूडतोडीची तात्काळ चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी. तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी नियमित तपासणी व देखरेख करण्याची कार्यवाही करावी. भडगाव येथील लाकडांच्या वखारीवर राजरोस होणारा अवैध लाकुड वाहतूक साठा थांबविण्यात यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# केळी पीकविमा प्रस्तावांची पडताळणी

## ९६ हजारांपैकी फक्त ५० हजार हेक्टरवर प्रत्यक्ष लागवड; बनावट विमा अपात्र अर्ज नामंजुरीच्या प्रक्रियेला वेग

**जळगाव, १७ मार्च**

जळगाव जिल्ह्यात पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना (आंबिया बहार) २०२५-२६ अंतर्गत सुमारे ९६ हजार १५७.२० हेक्टर क्षेत्रात ९१ हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी केळी पिक विमा नोंद केली होती. व शेतकरी हिस्सा रकमेचा भरणा केला होता. परंतु उपग्रह तपासणीदरम्यान ५० हजार २११.३३ हेक्टर क्षेत्रावर केळी लागवड आहे. तसेच केळी लागवड नसताना ४५ हजार ९४५.८७ हेक्टर क्षेत्रावर पिक विमा नोंद असल्याचे आढळून आल्याने जिल्ह्यात केळी पिक विमा प्रस्तावांची पडताळणी करण्यात आली असून यात केळी लागवड नसलेल्या संबंधित शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव योजनेच्या तरतुदीनुसार नामंजूर करण्याची प्रक्रिया विमा कंपनीमार्फत सुरू करण्यात आली आहे.

**९९ हजार शेतकऱ्यांनी केला ८७ कोटी रकमेचा सहभाग हिस्सा भरणा**


जळगाव जिल्ह्यात भारती कृषि विमा कंपनीमार्फत फळपिक विमा योजना राबविण्यात आली आहे. या योजनेत एकूण ९९ हजार ९४८ शेतकऱ्यांनी सहभाग घेत १ लाख ३ हजार ३६९ हेक्टर क्षेत्र संरक्षित केले आहे. यात ८७ कोटी ६२ लाख रूपये शेतकरी हिस्सा म्हणून विमा कंपनीकडे जमा करण्यात आले आहेत.

> **२३ मार्चपर्यंत मांडता येणार बाजू**
> यासंदर्भात संबंधित शेतकऱ्यांना त्यांचे म्हणणे मांडायचे असल्यास सोमवार २३ मार्चपर्यंत तालुका कृषी अधिकारी कार्यालयात निवेदन सादर करावे, असे आवाहन जिल्हास्तरीय आढावा समितीमार्फत करण्यात आले आहे. निर्धारित कालावधीत निवेदन सादर न केल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असेही जिल्हास्तरीय आढावा समितीने म्हटले आहे.



**जळगाव धरणगावसह पूर्व भागात सात तालुक्यात पडताळणी**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार अंबिया बहार हंगाम २०२५-२६ च्या केळी पिक विमा प्रस्तावांची पडताळणी सुदूर संवेदन तंत्रज्ञानाच्या (रिमोट सेन्सर तंत्र) माध्यमातून महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (एमआरएसएसी) मार्फत करण्यात आली. जळगाव, मुक्ताईनगर, यावल, रावेर, चोपडा, धरणगाव व जामनेर या सात तालुक्यांतील जास्त विमा क्षेत्र असलेल्या भागांची तपासणी करण्यात आली.




**नोंदणीपेक्षा प्रत्यक्ष लागवडीत तफावत**

या तपासणीदरम्यान ९१ हजार ८८० शेतकऱ्यांच्या ९६ हजार १५७.२० हेक्टर विमा क्षेत्रापैकी ५० हजार २११.३३ हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्ष फळपिक आढळून आले आहे. तसेच ४५ हजार ९४५.८७ हेक्टर क्षेत्रावर केळी पिक लागवड झाली नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव योजनेच्या तरतुदीनुसार केळी पिक विमा नामंजूर करण्याची प्रक्रिया संबधीत पिक विमा कंपनीमार्फत सुरू करण्यात आली आहे.

**पश्चिम भागातील आठ तालुक्यातदेखील तपासणी**

दरम्यान, भुसावळ, बोदवड, अमळनेर, एरंडोल, पारोळा, चाळीसगाव, भडगाव व पाचोरा या आठ तालुक्यांतील फळपिक विमा प्रस्तावांची प्रत्यक्ष पडताळणी प्रक्रिया सुरू आहे.

**७ हजारपैकी केवळ पावणेचार हजार हेक्टरवर लागवड, अद्याप तपासणी सुरू**

यामध्ये ७,२६७ शेतकऱ्यांच्या ७,०७४.३० हेक्टर क्षेत्रापैकी ४,१६० शेतकऱ्यांचे ३,८३०.५५ हेक्टर क्षेत्रावर फळपिक आढळून आले असून २,२३० शेतकऱ्यांच्या २,११८.२३ हेक्टर क्षेत्रावर पिक आढळून आलेले नाही. उर्वरित शेतकऱ्यांची तपासणी प्रक्रिया सुरू असल्याचे सदस्य सचिव, जिल्हास्तरीय आढावा समिती तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी म्हटले आहे.

# अतिवृष्टी काळातील नुकसानग्रस्त रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी १० कोटींच्या निधीस मंजुरी

## रस्ते-पुलांच्या कामांच्या निविदांची लवकरच अंमलबजावणी : आमदार पाटील

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, १७ मार्च**

जून ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान पाचोरा व भडगाव तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीत नुकसानबाधीत रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी पहिल्या टप्प्यात १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्ते व पुलांच्या कामांसाठी प्रशासकीय मान्यताही मिळाली असून सध्या संबंधित कामे निविदा प्रक्रियेत असल्याची माहिती आमदार किशोर पाटील यांनी दिली.

पाचोरा-भडगाव मतदारसंघात गत मान्सूनदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. विशेषतः पिंपळगाव (हरेश्वर)-शिंदाड गटातील गावांमध्ये शेतजमीनींचे नुकसान होण्याबरोबरच अनेक पशुधन वाहून गेल्याने हानी झाली आहे. तसेच अनेक रस्ते आणि पुलांची दुरावस्था झाली होती. या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी तसेच वाहून गेलेल्या गुरांचा मोबदला मिळावा यासाठी गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे.

दरम्यान, राज्याचे आपत्ती व्यवस्थापन, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे पाठपुरावा आमदार किशोर पाटील यांनी पाठपुरावा केला होता. त्यानुसार पाचोरा तालुक्यात विशेषतः अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पिंपळगाव (हरेश्वर)-जुने जरंडी रस्ता, पिंपळगाव-जरंडी (ग्रामीण मार्ग क्र. २०५ आणि ग्रामीण मार्ग क्र. २०३) या दोन्ही रस्त्यांसाठी प्रत्येकी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामांसाठी लवकरच निविदा प्रक्रियेची अंमलबजावणी केली जात आहे. एप्रिल महिन्यापासून रस्ते कामांना प्रत्यक्ष सुरुवात होण्याची शक्यता आहे. तसेच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी मंजूर झालेल्या १० कोटी रुपयांच्या निधीपैकी किमान ८ कोटी रुपयांचा निधी पिंपळगाव (हरेश्वर)गटातील रस्त्यांवर खर्च करण्यात येणार आहे.





> **विरोधकांकडून राजकारण; आंदोलन छेडण्याचा प्रयत्न**
> मंजूर झालेल्या कामांसंबंधित कागदपत्रे पाहून आणि झालेला पाठपुरावा लक्षात घेऊन काही विरोधक आंदोलन किंवा उपोषणाच्या माध्यमातून या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करतील. मात्र विरोधकांनी असा केविलवाणा प्रयत्न करू नये, असे आमदार किशोर पाटील यांनी आवाहन करीत लवकरच या रस्त्यांची कामे शंभर टक्के पूर्ण होतील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

गेल्या अनेक दिवसांपासून पिंपळगाव परिसरातील शेतकऱ्यांचे प्रतिनिधी गोरख पाटील, रवि गीते, पिंपळगावचे सरपंच रवी पाटील, भगवान पाटील, कैलास क्षीरसागर, बी.जी. पाटील, परेश पाटील यांच्यासह शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यां या रस्ते कामांच्या दुरूस्ती व नुतनीकरणासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे, असे आमदार किशोर पाटील यांनी सांगीतले.



### ज्येष्ठ महिलांचे घरातील स्थान अनमोल : डॉ. बाविस्कर

**तभा वृत्तसेवा**
**अमळनेर, १७ मार्च**

मराठी वाङ्मय मंडळ व सावित्रीबाई फुले ज्येष्ठ महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने नांदेडकर हॉल येथे महिला दिनानिमित्त कार्यक्रम पार पडला.

यावेळी प्रमुख वक्त्या जळगाव येथील डॉ. स्वाती परीक्षित बाविस्कर, अनिता चौधरी उपस्थित होत्या. डॉ. स्वाती बाविस्कर यांनी मार्गदर्शन करताना कोरोना काळात स्वतः शिक्षण घेत असताना सासूबाईंनी मुलीची घेतलेली काळजी, याचे उदाहरण देत ज्येष्ठ महिलांचे घरातील स्थान किती महत्त्वाचे असते हे स्पष्ट केले. तसेच ज्येष्ठांनी आपली तब्येत, सौंदर्य कसे जपण्यासह आहाराविषयी मार्गदर्शन केले.

ज्येष्ठ महिला या घराचा कणा असतात, त्यांच्या माध्यमातून मुलांवर संस्कार होतात. त्यामुळे वयोमानानुसार त्यांचा सन्मान व सांभाळ करणे आवश्यक असल्याचे मत सुनीता चौधरी यांनी महिलांशी संवाद साधताना व्यक्त केले. दरम्यान सावित्रीबाई फुले ज्येष्ठ महिला मंडळातर्फे सामाजिक कार्यकर्त्या वसुंधरा लांडगे यांना सामाजिक कार्याबद्दल मानपत्र, सावित्रीबाई फुले यांचा पुतळा, पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. उषा पाटील, कांचन शहा, नगरसेविका सविता संदानशिव, अपूर्वा चौधरी, कल्पना शर्मा, खा. शि. मंडळाच्या उपाध्यक्षा माधुरी पाटील व कार्यकारिणी सदस्या लीना पाटील, योगिता कापडणेकर, माधुरी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले ज्येष्ठ महिला मंडळाने व्यसनमुक्ती विषयावर घोषवाक्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पल्लवी बागुल, अरुणा अलई व योगिता कापडणेकर तर उत्तेजनार्थ पारितोषिक भारती कोळी यांना देण्यात आले. प्रास्ताविक सावित्रीबाई फुले ज्येष्ठ महिला मंडळाच्या अध्यक्षा प्रा. शीला पाटील यांनी केले. सूत्रसंचालन स्नेहा एकतारे यांनी केले. गायत्री भदाणे, रत्ना भदाणे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी डॉ. प्रा. शैलजा माहेश्वरी, मंगला चव्हाण, छाया पाटील, सुदर्शना पाटील, आशा भदाणे, अलका गोसावी, सुनंदा चौधरी यांनी सहकार्य केले.

# साहित्य भारती, सामाजिक समरसता मंचतर्फे साहित्यिक राजू बाविस्कर यांचा हृद्यसत्कार!

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

येथील सुप्रसिद्ध चित्रकार तथा साहित्यिक राजू बाविस्कर लिखित 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथन ग्रंथाला २०२५ चा सर्वोच्च साहित्य अकादमी पुरस्कार घोषित झाला. त्यानिमित्त साहित्य भारती व सामाजिक समरसता मंचतर्फे राजू बाविस्कर यांचा हृद्यसत्कार करण्यात आला.



साहित्य भारती व सामाजिक समरसता मंचच्या सदस्यांनी राजू बाविस्कर यांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन हृद्यसत्कार केला. याप्रसंगी साहित्य भारतीचे देवगिरी प्रांत उपाध्यक्ष विजय लोहार, प्रांत सदस्य विभाकर कुरंभट्टी, जळगाव प्रतिनिधी सुहास देशपांडे व मराठी कथाकार दीपक तांबोळी, सामाजिक समरसता मंचचे विजय मोघे, प्रभाकर धनगर, दशरथ देवमाने, प्रकाश बारी, सुभाष मराठे, भिका भोई, सुरेश कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी साहित्य भारतीचे देवगिरी प्रांत उपाध्यक्ष विजय लोहारयांनी मनोगतात राजू बाविस्कर यांच्याविषयी भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, देशातील अत्यंत प्रतिष्ठित साहित्य अकादमी या स्वायत्त साहित्य संस्थेचा २०२५ वर्षातील महत्त्वाचा साहित्य अकादमी पुरस्कार मराठी भाषेतील सर्वोत्कृष्ट लेखनासाठी शहरातील सुप्रसिद्ध चित्रकार आणि लेखक राजू बाविस्कर यांना जाहीर करण्यात आला आहे. राजू बाविस्कर यांच्या कसदार लेखणीतून साकारलेल्या 'काळ्यानिळ्या रेषा' या लोकप्रिय आत्मकथनपर पुस्तकास हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यामुळे खानदेशातील दर्जेदार साहित्य प्रतिभेचा आणि परंपरेचा राष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा ठसा उमटला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

प्रांत सदस्य विभाकर कुरंभट्टी म्हणाले की, राजू बाविस्कर यांच्या रूपाने जवळपास ३५ वर्षांनंतर खान्देशाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. त्यामुळे खान्देशासाठी हा गौरवाचा आणि अभिमानाचा क्षण आहे, असे सांगत राजू बाविस्कर यांच्या जीवन आणि शैक्षणिक प्रवासाविषयी माहिती दिली. विजय मोघे म्हणाले की, 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथनपर ग्रंथात बाविस्कर यांनी चित्रकलेच्या प्रवासासह वंचित वर्गातील संघर्षाचे थेट आणि भावनिक चित्रण केले आहे. या पुस्तकाचा समावेश एमएच्या अभ्यासक्रमातही करण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले.

> **जळगाव 'तरुण भारत' दिवाळी अंकाचे मुखपृष्ठकार**
> राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त दैनिक 'तरुण भारत'तर्फे २०२५ वर्षात काढण्यात आलेल्या 'दीपस्तंभ प्रचारक' या दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ प्रसिद्ध चित्रकार राजू बाविस्कर यांनी त्यांच्या रंग-रेषांमधून साकारले आहे. दिवाळी अंकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेली अनेक वर्षे व्यक्ती निर्मितीतून राष्ट्रोन्नती या सूत्रावर देशाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका निभावली आहे. संघाचे संस्थापक व आद्य सरसंघचालक परमपूज्य डॉ. केशव बळीराम हेडगेवार, द्वितीय सरसंघचालक परमपूज्य माधव सदाशिव गोळवलकर (श्रीगुरुजी), तृतीय सरसंघचालक परमपूज्य मधुकर दत्तात्रेय देवरस (बाळासाहेब देवरस), चतुर्थ सरसंघचालक परमपूज्य राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभैय्या, पाचवे सरसंघचालक परमपूज्य के. एस. सुदर्शन आणि विद्यमान सरसंघचालक मोहनराव भागवत यांनी व्यक्ती निर्मितीतून राष्ट्रोन्नती या सूत्रावर देशाच्या जडणघडणीत महत्त्वाच्या बजावलेल्या भूमिकांवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे.




### सुतार फाउंडेशनतर्फे राजू बाविस्कर यांचा सत्कार

**जळगाव** : येथील सुप्रसिद्ध चित्रकार तथा साहित्यिक राजू बाविस्कर लिखित 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथन ग्रंथाला २०२५ चा सर्वोच्च साहित्य अकादमी पुरस्कार घोषित झाला. त्यानिमित्त राजू बाविस्कर यांचा अण्णासाहेब सुपडू सुतार फाउंडेशनतर्फे सत्कार सोहळा झाला.



निवृत्त माध्यमिक शिक्षणाधिकारी वाय. एन. ठोसरे यांच्या हस्ते राजू बाविस्र यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन तसेच त्यांच्या पत्नी भारती बाविस्कर यांनाही शाल व बुके देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी आयोजक व अण्णासाहेब सुपडू सुतार फाउंडेशनचे सचिव विजय लुल्हे यांनी राजू बाविस्कर यांना पेढा भरवून अभिनंदनासह शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मुखपृष्ठकार आर्टिस्ट श्यामकांत वर्डीकर, देवकाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष चित्रकार सुनील दाभाडे, ज्येष्ठ साहित्यिक तथा प्राथमिक विभागाचे निवृत्त शिक्षण उपसंचालक, बालकवी राज्य पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कवी अशोक कोतवाल, सुनील कोतकर, टोनी कोतकर आदी उपस्थित होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर मित्रमेळ्याचे संस्थापक संजय भावसार यांनीही अकादमी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल राजू बाविस्कर यांचा विशेष भावपूर्ण सत्कार केला. याप्रसंगी बाविस्कर यांनी भूतकाळात भावसार यांनी केलेल्या निःस्वार्थी सहकार्याबद्दल व त्यांच्या कलाभिरुचीपूर्ण गुणग्राहकत्वाचे अविस्मरणीय प्रसंग उजागर केले. त्या वेळी दोघांचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. राजू बाविस्कर यांची राज्य शासनाच्या साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चरित्र साधने समितीवर सदस्य म्हणून सन्माननीय निवड झाली आहे. बाविस्कर यांच्या ' काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथनाला यापूर्वी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे साहित्य पुरस्कार, यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार, लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार, वसंतस्मृती संस्कृती आत्मचरित्र पुरस्कार, अण्णा भाऊ साठे साहित्य पुरस्कार, लोकमंगल राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार, पद्मश्री दया पवार पुरस्कार, बहिणाबाई सोपानदेव चौधरी साहित्य संस्थेचा वाङ्मय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

### राजू बाविस्कर यांचा उपमहापौर मनोज चौधरी यांच्या हस्ते सन्मान

**जळगाव** : लेखक व चित्रकार राजू बाविस्कर यांच्या ''काळ्या निळ्या रेषा'' आत्मचरित्राला या वर्षाचा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा उपमहापौर मनोज चौधरी यांच्याकडून सत्कार करण्यात आला. उपमहापौर मनोज चौधरी यांनी राजू बाविस्कर यांच्या घरी जाऊन व्यक्तीशः व महानगरपालिकेतर्फे त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.



याप्रसंगी उपमहापौर यांनी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळणे ही जशी मोठी गोष्ट आहे तशीच शहराच्या सन्मानासाठी व नाव लौकिकासाठी हा सन्मान महत्त्वाचा वाटतो, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी हर्षल पाटील, विजय चौधरी, योगेश जाधव व कार्तिक मोरे उपस्थित होते

### स्मृतिशेष चमेली हिंगोणेकर प्रतिष्ठानतर्फे साहित्यिक राजू बाविस्कर यांचा सत्कार

**जळगाव** : येथील सुप्रसिद्ध चित्रकार तथा साहित्यिक राजू बाविस्कर लिखित 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथन ग्रंथाला २०२५ चा सर्वोच्च साहित्य अकादमी पुरस्कार घोषित झाला.



त्यानिमित्त येथील स्मृतिशेष चमेली भाऊराव हिंगोणेकर प्रतिष्ठानतर्फे साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक राजू बाविस्कर यांचा सत्कार करण्यात आला. त्यांचा सत्कार प्राथिक शिक्षण विभागाचे माजी शिक्षण उपसंचालक तथा साहित्यिक शशिकांत हिंगोणेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी हिंगोणेकर यांनी, यंदाचा साहित्य अकादमीचा सन्मानाचा पुरस्कार बाविस्कर यांना त्यांच्या 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथनपर पुस्तकाला घोषित झाला आहे. खान्देशच नव्हे; तर समस्त मराठी साहित्यास याचा अभिमान आणि भूषणपर हा पुरस्कार आहे. हे पारंपरिक आत्मकथन नाही. सभोवतालच्या व्यक्तींची व्यक्तिचित्रणे आहेत. आठवणींच्या पक्षीसारखेच हे अनुभवकथन बाविस्करांनी आंतरिक तळमळीने रेखाटले आहे. दहावीपर्यंतचा आयुष्याचा लेखाजोखा यात आहे. आंबेडकरांचा विद्रोही विचारांचा हलकासा स्पर्श आहे. खरेतर यापुढील लेखन हे त्याच्या आयुष्याचा संघर्ष असणार आहे, असेही त्यांनी नमूद केले.




## महत्त्वाचे

### व्हॅनचा दरवाजा उघडल्याने धावत्या कारचे नुकसान

**जळगाव** : थांबलेल्या व्हॅनचा चालकाने अचानक दरवाजा उघडला. हा दरवाजा धावणाऱ्या कारला ठोकला गेल्याने नुकसान झाले. ही घटना सोमवारी (१६ मार्च) दुपारी तीन वाजेच्या सुमारास गणेश कॉलनी परिसरात ख्वाजॉमिया चौकातून आयएमआर कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्यावर घडली. मोहित सुनिल पाटील (वय २८,रा. निवृत्तीनगर) यांच्या तक्रारीनुसार, दुपारी ते ख्वॉजामिया चौकातून आयएमआर कॉलेजकडे कार (एमएच १४ एलवाय ५०९५) ने जात होते. दर्जी क्लासेस समोर अनधिकृतपणे पीकअप व्हॅन (एमएच १९ सीवाय ५०६८) लावलेली होती. व्हॅनमधील चालक फोनवर बोलत असताना आज बाजुला न पाहता अचानकपणे व्हॅनचा दरवाजा उघडला. तो मोहित पाटील यांच्या कारला ठोकला गेला. त्यामुळे कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या प्रकरणी व्हॅन चालक राम अनिल वैष्णव (वय ३३,रा.शनिपेठ) याच्या विरोधात जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस नाईक संतोष सोनवणे हे तपास करीत आहेत.

### भंगार दुकानाला आग


**जळगाव** : भंगार दुकानाला अचानक आग लागुन तेथील भंगार आगीच्या भक्ष्यस्थानी आले. मेहरुणमधील रामेश्वर कॉलनीत श्रीराम शाळेच्या समोर भंगार दुकानात ही घटना मंगळवारी सकाळी ८.२० वाजेच्या सुमारास घडली. माहिती मिळताच मनपाचे दोन बंब घटनास्थळी रवाना झाले. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी पाण्याचा फवारा मारुन आग आटोक्यात आणली. वेस्ट मटेरियल प्लॉस्टिक व इतर सामान आगीत जळाला. प्रभारी अग्निशमन अधिकारी भारत बारी, वाहन चालक देविदास सुरवाडे, संजय भोईटे, फायरमन रोहिदास चौधरी, जगदीश साळुंखे, ऋषभ सुरवाडे, तेजस बडगुजर, सुमित साळवे,संदीप कोळी या कर्मचाऱ्यांनी मदत कार्य केले.

### घरासमोरून दुचाकी लंपास

**जळगाव** : नेहमीप्रमाणे घरासमोर लावलेली सुमारे ३० हजार रुपये किमतीची होन्डा शाईन ( एमएच १९ सीटी ०५०३) चोरट्याने चोरुन नेली. रविवारी (१५ मार्च) सकाळी सहा वाजेच्या सुमारास ही घटना वराड खु.(ता.धरणगाव) येथे उघडकीस आली. पवन प्रमोद पाटील (वय २६,रा. वराड खु.) यांनी गावात सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नाही. तक्रारीनुसार याप्रकरणी सोमवारी धरणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पाळधी दुरक्षेत्र हवालदार विठ्ठल पाटील हे तपास करीत आहेत.

### बेपत्ता सहा तपासात मिळाले

**जळगाव** : वेगवेगळ्या ठिकाणावरुन बेपत्ता झालेल्या सहा व्यक्ती मिसिंग तपासात पोलिसांना सोमवारी (१६ मार्च) मिळुन आले. यात चार एमआयडीसी व भुसावळ बाजारपेठ तसेच रावेर पोलीस ठाणे येथील प्रत्येकी एक समावेश आहे. २८ वर्षीय ४ मार्च २०२६ रोजी,८८ वर्षीय वयोवृध्द गृहस्थ ५ मार्च, १८ वर्षीय तरुणी १३ मार्च,१९ वर्षीय तरुणी १४ मार्च रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झाले होते. २० वर्षीय तरुणी ८ मार्च रोजी भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीतून तसेच २४ वर्षीय तरुणी १६ मार्च रोजी रावेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झाली होती.मिसिंग तपासात हे सर्व जण सोमवारी पोलिसांना मिळुन आले. त्यांच्या कुटुंबियांना बोलवून त्यांना स्वाधीन करण्यात आले.


गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७)
२२३६१६६, २२२३६९९

### अंकासाठी संपर्क

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९०२३३४५५५०
९६२३६०४७१२

# शाखांची मागणी हेच पंचपरिवर्तन अभियानाचे फलित

## रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षपूर्तीनिमित्त दै. 'तरुण भारत'च्या चर्चासत्रात मान्यवरांचा सूर

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापनेला १०० वर्ष पूर्ण झाले आहेत. संघाविषयीचे गैरसमज आता दूर झाले असून शाखांची मागणी होणे हे सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी सांगितलेल्या पंचपरिवर्तन अभियानाचे फलित असल्याचा सूर 'दै. तरुण भारत'तर्फे आयोजित चर्चासत्रात मान्यवरांनी व्यक्त केला.

'दै. तरुण भारत'तर्फे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षपूर्तीनिमित्त पंचपरिवर्तन या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात संपर्क अभियानाच्या माध्यमातून आलेले अनुभव मान्यवरांनी व्यक्त केले.



**यांनी घेतला चर्चेत सहभाग**

या चर्चासत्रात भूषण क्षत्रिय, सेवाभारतीचे ॲड. देवेंद्र सुर्यवंशी, संस्कार भारतीचे दुष्यंत जोशी, रवींद्र शुक्ल, भाजपाचे महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सुर्यवंशी, देवेंद्र भावसार, हरीष मुंदडा, रा. स्व. संघाचे शहर कार्यवाह विजय ठाकरे यांनी सहभाग घेतला. प्रास्ताविक 'दै. तरूण भारत'चे संपादक चंद्रशेखर जोशी यांनी केले. तर सूत्रसंचालन मनोज भांडारकर यांनी केले. आभार सर्जना मीडिया प्रा. लि. चे सहप्रकल्पप्रमुख संजय नारखेडे यांनी मानले.

**रा. स्व. संघ समाजाच्या केंद्रस्थानी**

संपर्क अभियानात घरोघरी जातांना अनेक अनुभव आले. ज्या घरात गेलो, त्याठिकाणी कुणी ना कुणी, कधी ना कधी तरी संघाशी जोडल्या गेल्याची माहिती मिळाली. विविध माध्यमातून अनेक घरांमधील नागरिक संघाच्या संपर्कात आल्याचे समजले. पंचपरिवर्तन अंतर्गत कर्तव्यांची जाणीवही नागरिकांना करून दिली जात आहे. देशाच्या आणि समाजाच्या केंद्रस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

**संघकार्याविषयी अनेकांना कुतुहल**

पुर्वीच्या काळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी अनेक गैरसमज होते. संघ विशिष्ट समाजाचा आहे अशी भावना होती. मात्र जसाजसा संघ कार्याचा विस्तार झाला तसतसे संघाविषयीचे गैरसमज दूर होऊन कुतुहल निर्माण झाले आहे. आपत्ती असो, कि राष्ट्रकार्य या प्रत्येकात संघाचा सहभाग राहिल्याने संघ कार्याचे स्वरूप व्यापक झाले आहे.

**वस्तीभागातही संघकार्य पोहोचले**

पंचपरिवर्तन अंतर्गत संपर्क अभियानात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य हे आता वस्तीभागातही पोहोचले आहे. नागरिकांना संघासाठी काही ना काही काम करण्याची इच्छा निर्माण झाली आहे. प्रत्येकाला संघ कार्यात आपला सहभाग रहावा यासाठी काही तरी करण्याची धडपड आता दिसू लागली आहे. बालसंस्काराच्या माध्यमातून गावागावातील वस्ती भागात संघ कार्य पोहोचल्याचा अनुभव या संपर्क अभियानातून आला आहे.

**कलेच्या माध्यमातून संघकार्य**

संस्कार भारती ही कला क्षेत्रात काम करते. कलेच्या माध्यमातून संघाचे विचार जनमानसात पोहचविण्याचे कार्य केले जात आहे. दिवाळी, पाडवा पहाट यासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून संघ कार्य कलाक्षेत्रातही विस्तारले आहे.

**माध्यमांमुळे संघ घराघरात**

आजचे युग हे सोशल मीडियाचे आहे. विविध समाज माध्यमांच्या आधारे संघाचे कार्य हे आता घराघरात पोहोचले आहे. संपर्क अभियानामुळे हिंदू संमेलनांना निश्चीतच चांगला प्रतिसाद मिळणार आहे. तुम्ही नव्हे आपण अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असल्याचा सूर मान्यवरांनी व्यक्त केला.

# जळगावात हिंदू जनजागृती समितीतर्फे सामूहिक गुढीपूजनातून नववर्षाचे स्वागत

## पर्यावरण, संघटितपणा अन् आरोग्याचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

गुढीपाडव्यानिमित्त शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, हिंदू जनजागृती समितीतर्फे विविध १५ ठिकाणी सामूहिक गुढीपूजन सोहळा होणार आहे. नववर्षाचे स्वागत एकत्रितपणे करत सकारात्मक संकल्प करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे.

सामूहिक गुढीपूजनावेळी पर्यावरण संरक्षण, कॉलनीतील हिंदूंनी परस्परांमध्ये सौहार्दपूर्ण वातावरण ठेवून संघटित होणे, तसेच निरोगी जीवनशैली अंगीकारण्यासाठी नियमित योगा, प्राणायाम




आणि व्यायाम करण्याचे संकल्प नागरिकांकडून घेतले जाणार आहेत. शहरातील विविध ठिकाणी होणाऱ्या या सामूहिक गुढीपूजन कार्यक्रमात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

**या ठिकाणी होईल सामूहिक गुढीपूजन**

शहरातील चौघुले प्लॉट, वाल्मीक चौक, लक्ष्मीनगर (गेंदालाल मिल), ज्ञानदेवनगर चौक, पांझरापोळ चौक, के. सी. पार्क, मयूर कॉलनी (पिंप्राळा), मेहरूण, मारुती मंदिर (छत्रपती शिवाजी महाराजनगर), सुप्रीम कॉलनी, पिंप्राळा उपनगर, श्रीधरनगर, श्रीरामनगर, रामेश्वर कॉलनी, व्यंकटेशनगर, देविदास कॉलनी परिसरात सामूहिक गुढीपूजन सोहळा होणार आहे.

# सिंधी समाजबांधवांचा चेट्रीचंड्र उत्सव

## आज रात्री 'एक शाम साई झुलेलाल के नाम' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

चेट्रीचंड्र हा सिंधी समाज बांधवाचा उत्सव म्हणजेच गुढीपाडवा. सिंधी बांधवांचा नव वर्ष साजरा करण्याची ही पर्वणी होय.यानिमित्ताने बुधवारी (१८ मार्च) रात्री कंवर नगर परिसरातील पूज्य सेवा मंडळ येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री याठिकाणी एक श्याम भगवान झुलेलाल के नाम हा अतिशय सुदंर कार्यक्रम होत आहे. गोंदिया येथील कलाकार या कार्यक्रमात बहार आणतील. शुक्रवारी (२० मार्च) भगवान झुलेलाल यांची भव्य शोभायात्रा शहरातून निघेल. सिंधी समाज बांधव यात सामील असतील. यानिमित्ताने सिंधी कॉलनी परिसरात उत्साह व आनंदमय वातावरण निर्माण झाले आहे.

**शहरात भव्य शोभायात्रा**

या उत्सवानिमित्त अमर शहीद संत कंवर राम ट्रस्ट व झुलेलाल उत्सव समितीच्या वतीने शुक्रवारी(२० मार्च) फुले मार्केट परिसरातील मरीमाता मंदिर पासून दुपारी चार वाजता पूजा अर्चना करून भव्य शोभायात्रेला सुरुवात होईल. शोभायात्रा शास्त्री टॉवर चौक, एम.जी.रोड (गोलाणी मार्केट), मनपा



इमारत, नेहरु चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (कोर्ट चौक), स्टेट बँक (मुख्य शाखा) मार्गे भगवान झुलेला मंदिर संत कंवरराम चौक येथुन पंचमुखी हनुनाम मंदिर, गणेश नगर, बाबा हरदासराम हाऊसिंग सोसायटी, बाबा हरदासराम समाज मंदिर मार्ग कंवरनगर येथे शोभायात्रेचे आगमन होईल. रात्री नऊ वाजता पुज्य सेवा मंडळ याठिकाणी समारोप होईल.

**आज विशेष कार्यक्रम**

या चेट्रीचंड्र उत्सवाच्या निमित्ताने बुधवार (१८ मार्च) रोजी रात्री कंवर नगर परिसरातील पूज्य सेवा मंडळ येथे भव्य कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आले आहे. एक श्याम भगवान झुलेलाल के नाम हा अतिशय सुंदर कार्यक्रम गोंदिया येथील कलाकारांच्या वतीने सादर करण्यात येईल. या निमित्ताने संपूर्ण समाज बांधवांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा भगवान झुलेलाल यांचे आशीर्वाद घ्यावेत व शोभायात्रेमध्ये महिला भगिनीनी व समाज बांधवांनी व्यवसाय बंद ठेवून मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अमर शहीद संत कंवर राम ट्रस्ट व झुलेलाल उत्सव समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे. यानिमित्ताने सिंधी समाज बांधव त्यांचे व्यवसाय दुपारी चार वाजेपासून बंद ठेवणार आहेत.

**गोलाणी मार्केटमध्ये उत्सव**

पावन दिनानिमित्ताने शुक्रवारी (२० मार्च) सकाळी दहा ते दुपारी तीन वाजेदरम्यान गोलाणी मार्केट येथे लंगदो लाल साई जो मेलो उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात लाल साई जे गीतन ते आधारित भजन संध्या, बारन लाए ड्राईंग कॉम्पेटीशन, लाल साई जी वेशभूषा कॉम्पेटीशन, मुक्त बेसिक हेल्थचेकअप शिबिर, होजमालो डान्सधूम लाल साई की मौजां ही मौजां आणि बक्षिसे. तसेच नाश्ता, महाप्रसाद,सरबत आदी भरघोस कार्यक्रम आयोजित केले आहेत.

# गॅस तुटवडाविरोधात शिवसेना ठाकरे गटातर्फे आंदोलन

## व्यवस्था पारदर्शी करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

जागतिक युध्दजन्य परिस्थितीमुळे देशात तिव्र गॅस टंचाई भासत आहे. गेल्या आठ दिवसापासून एलपीजी गॅस सिलेंडरची झालेली दरवाढ रद्द करावी, वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यात यावी आणि साठेबाजी थांबविण्यात यावी या मागणीसाठी मंगळवारी (१७ मार्च) सकाळी ११ वाजता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने आंदोलन केले. आठ दिवसात गॅस व्यवस्था पारदर्शी न झाल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला दिला.

एलपीजी गॅस सिलेंडर दरवाढ, पुरवठा प्रणालीत अनियमितता, साठेबाजी या बाबी महायुती सरकारच्या नियोजनाच्या अभावातून निर्माण झाल्या,असा आरोप करत जळगाव जिल्हा उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने आज आंदोलन पुकारले. गॅस दरवाढ आणि गॅस तुटवडा विरोधात निषेध केला.

**हा जनतेवर भार**

सध्यस्थितीत व्यावसायिक गॅस सिलिंडर देणे बंद करण्यात आले. त्यामुळे जळगाव जिल्ह्यातील ४० टक्के हॉटेल बंद झाली आहेत. रिक्षा चालकांना गॅस भरण्यासाठी तासंतास रांगेत उभे राहावे लागत आहे. सर्व सामान्य नागरिकांकडून बुकींग करताना अडचणी येत आहेत. घरगुती गॅस सिलेंडरमागे ६० दरवाढ तर




व्यावसायिक सिलेंडरमागे ११५ दरवाढ झाली आहे. रिक्षा चालकांना ३८ रुपये जादा आकारणी केली गेली आहे. ही कुत्रिम दरवाढ असल्याचा आरोप शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रा.भाऊसाहेब सोनवणे यांनी केला.

**अशा आहेत मागण्या**

एलपीजी गॅस दरवाढ त्वरीत रद्द करण्यात यावी. गॅस वितरण पध्दतीत पारदर्शकता आणावी. गॅस साठेबाजी थांबविण्यात यावी. जिल्हाधिकारी यांनी गॅस वितरण आणि गॅस कंपनीच्या प्रतिनिधी यांची बैठक घ्यावी. सर्वांना सिलेंडर मिळेल,अशा पध्दतीने नियोजन करण्यात यावे. ज्या ग्राहकाने एलपीजी बुक केला आहे, त्याला ९६ तासात घरपोच सिलेंडर उपलब्ध करुन द्यावे, यासाठी पुणे जिल्हाधिकारी यांनी पारित केलेला आदेश जळगाव जिल्ह्यातही लागु करावा,अशी मागणी प्रा.सोनवणे यांनी केली. येत्या आठ दिवसात सिलेंडर वितरण व्यवस्थेत सुधारणा न झाल्यास शिवसेना स्टाईल तिव्र आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा तालुका प्रमुख प्रमोद घुगे यांनी यावेळी दिला.

**डोळे अन तोंडाला काळी पट्टी**

आंदोलकांनी आज अनोख्या पध्दतीचा परिचय देत निषेध केला. आंदोलकांनी डोळ्यांना आणि तोंडाला कापडी काळ्या पट्ट्या बांधल्या होत्या. हा अन्याय आम्ही डोळ्यांनी पाहू शकत नाही आणि तोंडाने बोललो तर विरोधक म्हणून आमच्यावर गुन्हे दाखल केले जातात, असा आरोप करत शिवसेना पदाधिकाऱ्यांनी महायुती सरकार विरोधात एल्गार केला.

या आंदोलनात शिवसेनेचे योगेश चौधरी, प्रेमराज राठोड, योगेश पाटील, डॉ.रमाकांत कदम, भगवान धनगर, किरण ठाकूर मनसे पदाधिकारी प्रदीप पाटील, अशोक पाटील, सचिन चौधरी, रामदास कोळी, खुशाल अहिरे, महेश अहिरे, प्रसाद पाटील यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने सामील झाले




**जळगाव : शिखवाल प्रेरणा बहुउद्देशीय महिला मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पाचदिवसीय गणगौर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या आधुनिक युगातही मंडळाने आपली संस्कृती आणि परंपरा जपली आहे. ही परंपरा जपण्याच्या कार्यात संस्थापिका कमलाबाई पांडे यांनी सर्वाधिक योगदान दिले असून, अध्यक्षा भारती ओझा, रजनी जोशी, मीरा जोशी, दुर्गा तिवारी, भारती जोशी, जया तिवारी, चंदा व्यास, मंगला पांडे, यशोदा व्यास आदींचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.**

# त्रिकुटाची तरुणाला बेदम मारहाण

**जळगाव** : मनियार बधुंना तु शिवीगाळ का करतो,असे सांगुन त्रिकुटाने तरुणाला बेदम मारहाण केली. दोन्ही पाय पकडुन रस्त्यावर ओढले. ही घटना शनिवारी (१४ मार्च) रात्री सवा तीन वाजेच्या सुमारास शिरसोली रोडवरील डीमार्ट जवळ सलुन दुकान समोर घडली. याप्रकरणी सोमवारी तिघांविरोधात रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

आकाश प्रकाश सिंदवाणी (वय २८,रा. सिंधी कॉलनी) हा तरुण मोबाईल रिपेअरिंग दुकान चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. आकाश सिंदवाणी यांच्या तक्रारीनुसार, शनिवारी ते त्यांचा मित्र विक्की जसणानी यांच्या घरी आले. दोघांनी जेवण केले. त्यानंतर घरी जाण्यासाठी आकाश हे दुचाकीने निघाले. डी मार्टजवळ हेयर सलुन समोर लघुशंका करण्यासाठी थांबले असता तिघे त्यांच्याजवळ आले. मनियार बधूंना शिवीगाळ का करतो अशी आकाश याना विचारणा करत तिघांनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी आकाश याना मारहाण केली

त्रिकुटाने आकाश यांचे घर गाठले. घरासमोर अंगणात उभे राहुन त्यांना दमबाजी करत धमकाविले. याप्रकरणी विशाल पाटील, राहुल उर्फ आरसी चौधरी,बबल्या पूर्ण नाव माहित नाही. यांच्या विरोधात दुखापत व धमकावल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक भुषण कोते हे तपास करीत आहेत.

# जळगावात घरातून भरदिवसा सोने-चांदीचे दागिने लुटले

## अपार्टमेंटमध्ये एन्ट्री करत चोरट्यांचा डल्ला

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

शहरात कुलुपबंद घरांवर नेहमी चोरट्यांची नजर असते. बंद घर हेरुन त्यात शिरकाव करत चोरटे मुद्देमाल घेऊन पसार होतात. शहरातील देवेंद्रनगरातील प्रभुस्पर्श अपार्टमेंटमध्ये कुलुप बंद दरवाजाचे कडीकोंडा व कुलुप तोडत चोरट्यांनी घरातून ६६ हजार ७५९ रुपयांचे सोने चांदीचे दागिने चोरुन नेले. सोमवारी( १६ मार्च) दुपारी साडेबारा ते साडेचार वाजेच्या सुमारास ही घटना घडली.

प्रीतम प्रल्हाद साळुंखे(वय ४०,रा. फ्लॅट नं.१० दुसरा मजला प्लॉट नं.४३,४४ सर्वे नं.३/४ प्रभुस्पर्श अपार्टमेंट, देवेंद्रनगर) याठिकाणी कुटुंबासह वास्तव्यास आहेत. ते इंशुरन्स प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत.

सोमवारी (१५ मार्च) दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास ते घराच्या मुख्य दरवाज्याला कुलुप लावुन त्यांच्या कार्यालयात बाहेर गेले. त्यांच्या पत्नी ही त्यांच्या सोबत रवाना झाल्या. हे बंद घर चोरट्यांनी हेरले आणि कुलुप कोंडा तोडत आतमध्ये प्रवेश केला. किमती वस्तुच्या शोधात सामान अस्तव्यस्त केला. कपाटातील सामान बाहेर काढला. मुद्देमाल हाती लागताच चोरटे पसार झाले. दुपारी साळुंखे दाम्पत्य घरी आले असता त्यांना कुलुप व कोंडा तुटलेला दिसला. आतमध्ये सामान विखरलेला आणि इतरत्र फेकलेला दिसला. कपाटातील सामान विस्कटलेल्या अवस्थेत दिसला. त्यातील सोनेचांदीचे दागिने गहाळ झाल्याचे उघड झाले. घटना कळताच पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांनी याठिकाणी येऊन घराची पाहणी केली. तसेच प्रकार जाणुन घेतला.

**दुपारी साधली संधी**

दुपारी साडेबारा वाजता साळुंखे दाम्पत्य मुख्य दरवाजाला कुलुप लावुन घराबाहेर पडले. त्यानंतर भर दुपारी चोरट्यांनी या अपार्टमेंटमध्ये प्रवेश केला. जिना चढुन ते वर आले. साळुंखे यांच्या दरवाजाचा कडी कोंडा तसेच कुलुप कापले. आणि आतमध्ये प्रवेश केला. भारी किमती वस्तुना लक्ष्य करत चोरट्यांनी शोधाशोध केली. सोनेचांदीचे दागिने हाती लागताच चोरटे या ठिकाणाहून फरार झाले.

**असा नेला मुद्देमाल**

१८ हजार ७५० रुपये किमतीचे ७.५ ग्रॅम वजनाची सोन्याचे कानातले तीन नग प्रत्येकी अडीच ग्रॅम वजनाचे. १५ हजार रुपये किमतीचे सहा ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, सात हजार पाचशे रुपये किमतीची तीन ग्रॅम वजनाचे सोन्याचे वाट्या, ७ हजार ५०० रुपये किमतीचे तीन ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील रींग, दोन हजार रुपये किमतीचे एक ग्रॅम वजनाचे सोन्याचे कॉईन, आठ हजार रुपये किमतीचे ३४० ग्रॅम वजनाचे चांदीची वाटी, चमचा, पायल,चांदीचे सहा कॉईन असा एकुण ६६ हजार ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरुन नेला. प्रकार कळताच प्रीतम साळुंखे हे तत्काळ रामानंदनगर पोलीसप ठाण्यात रवाना झाले. त्यांनी चोरीची माहिती ठाणे अंमलदार यांना दिली. तसेच त्यांची तक्रार नोंदवून गुन्हा दाखल करण्यात आला.हवालदार सुशील चौधरी हे तपास करीत आहेत.

# कर्तव्यदक्षतेची उब... क्षुधाशांतीला वेळेवर मिळाला जीवनदायी गॅस

## डॉ. भरत अमळकर यांची दक्षता अन् प्रशासनाच्या सतर्कतेची अनुभूती

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

समाजातील गरजुंना अल्प दरात पौष्टिक व दर्जेदार भोजन अल्प दरात देणाऱ्या केशव स्मृती समुहातील क्षुधाशांती सेवा शनिवारी दुपारी अचानक एक अडथळा निर्माण झाला. गॅस सिलेंडर टंचाईमुळे या ठिकाणी केवळ शिल्लक होते. गरजुंच्या पोटाशी जोडलेली ही सेवा थांबू नये म्हणून पदाधिकाऱ्यांनी केशव स्मृती सेवा समुहाचे प्रमुख डॉ. भरतदादा अमळकर यांच्याशी संपर्क साधला व तेथुन चक्रे फिरताच जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी मदतीचा हात दिल्यामुळे मोठे संकट टळले.

'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म'जाणिजे यज्ञकर्म'ही संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळ. केवळ पोट भरण्यासाठी केलेले काम हे साधे उपजीविकेचे साधन असते; पण ते काम जर प्रामाणिकपणे,



समाजहितासाठी आणि कर्तव्यभावनेने केले तर ते 'यज्ञकर्म' म्हणजेच पवित्र कार्य असते. क्षुधाशांतीच्या माध्यमातून होत असलेले काम हे प्रामाणिकपणाला कर्तव्याची जोड ठरते आहे, हे काम यज्ञासारखेच होय. आणि याच ठिकाणी गॅस सिलेंडर टंचाईचा फटका बसला.

**आणि चक्रे फिरली**

गॅस सिलेंडर टंचाईची माहिती प्रकल्पातील संजय याज्ञिक यांनी सेवा समुहाचे अध्यक्ष डॉ.भरतदादा अमळकर यांच्या कानावर घातली. क्षुधाशांतीमध्ये रोज सुमारे १५०० नागरिक जेवण करत असतात. कधी हा आकडा जास्तही असतो. एवढ्या मोठ्या संख्येने येणाऱ्या नागरिकांची यामुळे मोठी गैरसोय होणार होती. डॉ.अमळकर यांनी तात्काळ प्रशासनास पत्र देण्याचा सल्ला देऊन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्याशी संवाद साधला. प्रशासनानेही विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन फिरवली. जिल्हा पुरवठा अधिकारी महेश चौधरी यांनी तातडीने संस्थेशी संपर्क साधुन क्षुधाशांती केंद्राची माहिती घेतली. समाजासाठी चालणारा हा सेवा प्रकल्प लक्षात घेऊन त्यांनी लगेचच गॅस एजन्सीला पत्र दिले तसेच अत्यावश्यक सेवा कोट्यातून त्वरित सिलेंडर पुरविण्याचे आदेश दिले. 'ही सेवा गरजुंना अन्न देणारी आहे, येथे सिलेंडरची कमतरता होऊ देऊ नका' असे स्पष्ट निर्देशही दिले. प्रशासनाच्या तत्परतेचा परिणाम असा झाला की अवघ्या दोन तासात क्षुधाशांती केंद्रात सिलेंडर पोहोचले. पुढील कोटाही त्वरित उपलब्ध करून देण्यात आला आणि थांबण्याच्या उंबरठ्यावर आलेली ही सेवा पुन्हा पुर्ववत सुरू झाली. गरजुंच्या पोटाशी जोडलेली ही सेवा अखंड सुरू रहावी यासाठी प्रशासनाने दाखविलेली संवेदनशीलता आणि कर्तदक्षता पाहून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह लाभार्थ्यांच्या चेहेऱ्यावर दिलासा आणि कृतज्ञतेची भावना उमटली. खऱ्या अर्थाने समाजाच्या गरजा ओळखून तात्काळ निर्णय घेणारे, मानवी संवेदना जपणारे जिल्हाधिकारी लाभणे हे या जिल्ह्याचे भाग्यच अशा भावना या निमित्ताने उमटत आहेत. प्रशासनाच्या या संवेदनशील हस्तक्षेपामुळे अनेक गरजूंना मिळणाऱ्या अन्नसेवेचा दिवा पुन्हा तेजाने पेटत रहाणार आहे.



जळगाव : शहरातील प्रमुख मैदानांपैकी एक असलेल्या सागर पार्क मैदानाचे गेट खालच्या बाजूने तुटले आहे. हे गेट वजनदार असल्याने ते एखाद्याच्या अंगावर पडून दुखापत किंवा नुकसान होण्याची शक्यता आहे. दै. 'तरुण भारत'च्या एका जागृत वाचकाने या गेटचे छायाचित्र उपलब्ध करून देत या गंभीर समस्येकडे लक्ष देण्याची मागणी केली.

# हॉटेल व्यवसायासाठी घरगुती गॅसचा वापर

## जिल्हा पुरवठा विभागाच्या तपासणीत तीन सिलेंडर जप्त

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधनाचा पुरवठा खंडित होणार असल्याच्या अफवां समाज माध्यमावर अजूनही आहेत. यामुळे जिल्ह्यात तसेच जळगाव शहरात नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले असून रिक्षा चालकांकडून प्रति सीटचे दर वाढ करण्यात आली आहे. तर घरगुती गॅस सिलेंडरची देखील दरवाढ झाली असून बऱ्याच ठिकाणी दोनशे ते पाचशे रूपये अधिकचे पैसे देऊन गॅस सिलेंडर उपलब्ध करून घेतले जात आहे. तर दुसरीकडे घरगुती वापरासाठी असलेले गॅस सिलेंडरचा उपयोग व्यावसायासाठी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पुरवठा विभागाकडून तपासणी मोहिम राबविण्यात आली.

जिल्ह्यात घरगुती गॅस सिलेंडरचा पूरवठा सुव्यवस्थित राहावा यासाठी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश चौधरी यांच्या निर्देशानुसार तालुकास्तरावर दक्षता तपासणी पथक नियुक्त करण्यात आले आहेत.

या दक्षता पथकाकडून आतापर्यत जिल्हाभरात तब्बल १४७ ठिकाणी अचानक धाड टाकून



तपासणी करण्यात आली. यात पाचोरा २ आणि यावल तालुक्यात फैजपूर येथे एक असे केवळ तीन ठिकाणी घरगुती वापराचे सिलेंडर व्यावसायिक उपयोगासाठी आणत असल्याचे आढळून आल्याने ३ सिलेंडर जप्ती कारवाई करण्यात आली.

धुळे जिल्ह्यात धडक कारवाईत एकाच वेळी तब्बल २७ घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापरसंदर्भात कारवाई करण्यात आली. तर जळगाव जिल्ह्यात १४७ तपासणी मोहिमेदरम्यान केवळ ३ सिलेंडर जप्त करण्यात आले असून एकूणच खोदा पहाड निकला चुहा अशी स्थिती असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात तब्बल एचपीसीएल, बीपीसीएल, रिलायन्स, इन्डेन असे गॅस वितरक आहेत. घरगुती वापरासाठी १२ लाख ३६हजार ५० असे गॅसधारक ग्राहक आहेत. यात ७ लाख ५१ हजार २३४ एक गॅस हंडीचे तर ४ लाख ८४ हजार ८१६ असे दुहेरी गॅस जोडणीचे ग्राहक आहेत. तसेच उज्ज्वला योजनेंतर्गत २ लाख ७३ हजार ५०८ ग्राहक आहेत. दररोजची मागणी सुमारे ९ ते १० हजार सिलेंडरची असून पुरवठा योग्य प्रमाणात असून वितरण सुरू आहे.

घरगुती गॅस पुरवठा सुव्यवस्थित राहावा यासाठी जिल्हा प्रशासनाने दक्षता पथक नियुक्त केले असून त्यात स्थानिक तालुका पातळीवर तहसीलदार, पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, गॅस कंपन्यांचे विक्रि अधिकारी, पुरवठा विभागाचे निरीक्षक आदींचा समावेश असल्याचे जिल्हाधिकारी यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### बेला अकादमीतर्फे रंगली मैफिल

**जळगाव** : स्वरा पाठक संचलित बेला अकादमी तर्फे भिकमचंद जैन नगर येथे विद्यार्थ्यांच्या गुणदर्शनाचा कार्यक्रम नुकताच पार पडला. सुरुवातीला प्रमुख पाहुण्या विशाखा देशमुख आणि जुईली कलभांडे यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. गणेश वंदनेने सुरू झालेल्या कार्यक्रमात राग भूप तसेच व्हायोलिनवर काही चित्रपट गीते कार्तिकी पाठक, दिव्या जैन, तनिषा पापरीकर, सुजाता रावेरकर, किरण देवरे, राजवीर पाटील यांनी वाजवले. तसेच राग बिहाग सह काही भावगीते अनुजा कुलकर्णी, दिव्यांका तोडकरी, रुद्र पाठक, भक्ती कुलकर्णी यांनी गावून रंगत आणली. त्यांना तबला संगत श्रीपाद पाठक तर हार्मोनियम संगत अर्णीक काश्यपे यांनी केली. हर्षा पाठक यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला उपस्थित पालक तसेच रसिकांनी या मैफिलीचा आनंद घेतला.

### मोनाली कामळस्कर फाउंडेशनतर्फे परळ, धान्य वाटप

**जळगाव** : उन्हाळ्यात पक्षांना पाण्यासाठी वणवण होवू नये म्हणून गेल्या १८ वर्षा पासून मोनाली कामळस्कर फाऊंडेशन तर्फे पक्षांना पाणी पिण्यासाठी परळ (मातीचे पसरट भांडे) आणि धान्य वाटपाचा कार्यक्रम होत असतो. याही वर्षी हा कार्यक्रम रविवार दि. १५ मार्च २५ रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत वृंदा बुक डेपो, टॉवर चौक, जळगांव येथे आयोजित केला आहे, कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डायल ११२ चे पोलिस उप निरीक्षक प्रकाश दिनकरराव पाटील, जनवानी पतपेढीचे अध्यक्ष विजय नारायण वाणी आणि वाणी समाज अध्यक्ष प्रा. डॉ. अम ोल चंद्रकांत वाणी तसेच युवा अध्यक्ष गणेश डाळवाले हे राहणार आहेत. तरी नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने येऊन सदरील परळ व धान्याची पुडी घेऊन आपल्या गच्चीत किंवा अंगणात ठेवावी असे आवाहन प्रकल्प प्रमुख राजेश वाणी व शंकर वाणी, संस्थापक नंदकिशोर कामळस्कर तसेच अध्यक्ष सुधाकर वाणी यांनी केले आहे.



### सुभेदार मल्हारराव होळकर जयंती साजरी

**जळगाव** : श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांची ३३३ वी जयंती जळगाव जिल्हा धनगर समाज महासंघ, मल्हार सेना, अहिल्या महिला संघ आणि कर्मचारी संघटनेच्यावतीने उत्साहात साजरी करण्यात आली. मल्हार सेनेचे जिल्हाप्रमुख रमेश सुलताने यांच्याहस्ते सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी मल्हार सेनेचे माजी सरसेनापती सुभाष सोनवणे, अहिल्यादेवी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर न्हाळदे, धनगर समाज महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष सुभाष करे, जिल्हाप्रमुख अरुण ठाकरे, धनगर समाज कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गणेश बागुल, उपाध्यक्ष तुळशीराम सोनवणे, मल्हार सेनेचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र सोनवणे, शहर प्रमुख प्रवीण पवार, मल्हार सेनेचे उपप्रमुख दिलीप नाझरकर, कुणाल सुलताने यांच्यासह पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होते.

### विद्यापीठात आज एकदिवसीय राज्यस्तरीय परिषद

**जळगाव** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र, कला व मानव विद्या प्रशाळेच्यावतीने पीएम उषा अंतर्गत दि.१८ रोजी क्रीडा सृष्टीमध्ये भारतीय सृष्टी या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.
परिषदेत क्रीडा भारतीचे केशव चौधरी यांचे बीज भाषण होणार आहे. तसेच नवीन शैक्षणिक धोरणात क्रीडा धोरणांचा अंतर्भाव या विषयावर नागपूर येथील डॉ.निरव पांड्या, भारतीय पारंपरिक आहार व आधुनिक पोषणशास्त्र या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.प्रा.दयानंद कांबळे, क्रीडा विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजना व खेळातून रोजगाराच्या संधी या विषयावर जळगावचे क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक तर क्रीडा धोरणे आणि भारतीय क्रीडा सृष्टीचा विकास या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील अमृत बिराडे मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, कला व मानव्य विद्या प्रशाळेचे संचालक प्रा. राम भावसार, क्रीडा भारतीचे जिल्हामंत्री प्रशांत जगताप, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील, प्रा. शरद पाटील, डॉ.संजय चौधरी, जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ.सुरेश थरकुडे यांनी केले आहे.

### दिव्यांग उमेदवारांसाठी आज रोजगार मेळावा

**जळगाव** : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव आणि सेंट्रल युथ फॉर जॉब फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग उमेदवारांसाठी रोजगार व समुपदेशन मेळाव्याचे दि. १८ मार्च रोजी सकाळी १० वाजता शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, जी. एस. ग्राउंड जवळ होणार आहे. या मेळाव्यात नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. १० वी, १२ वी तसेच पदवीधर पदव्यूत्तर योग्य पात्रता असलेल्या इच्छुक दिव्यांग उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर लॉगिन करून संबंधित रिक्त पदांसाठी अर्ज करावा. ज्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही त्यांनी सर्व शैक्षणिक कागदपत्रांसह थेट मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहावे. मेळाव्यादरम्यान नॅशनल करिअर सर्व्हिस सेंटर, मुंबई येथील अधिकारी उपस्थित राहून उमेदवारांना मार्गदर्शन करणार आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, येथे भेट द्यावी किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५७-२९५९७९० वर संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त संदीप गायकवाड यांनी केले आहे.

# ब्राह्मण सभा महिला समितीतर्फे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

ब्राह्मण सभा महिला समितीतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त ब्राह्मण सभा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून भुसावळ येथील उद्योजिका सुनीता जोशी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात वैदेही नाखरे, सुनीता जोशी, श्रद्धा कुलकर्णी, सोनिका मुजुमदार, आरती गोडबोले आदींच्या हस्ते दिप्रज्वलन करुन करण्यात आली. त्यानंतर सुनीता जोशी यांनी उद्योग प्रवास आणि उद्योगाविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर काळाच्या पडद्याड गेलेली पत्रलेखन कलेवर आधारित 'माझं पत्र वाचन' ही स्पर्धा घेण्यात आली.

यात ३५ स्पर्धाकांनी सहभाग



नोंदवला. स्पर्धेत रुपाली जोशी यांनी प्रथम, स्मिता शुक्ल यांनी द्वितीय, आसावरी जोशी यांनी तृतीय तर नेहा रस्से, पल्लवी देसाई आणि उत्तरा कुलकर्णी यांनी उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला. स्पर्धेचे परीक्षण सोनिका मुजुमदार आणि आरती गोडबोले यांनी केले. कार्यक्रमानंतर सर्व सहभागी महिलांना अल्पोपहार देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला आणि सांस्कृतिक प्रमुख वैदेही नाखरे यांनी तर सूत्रसंचालन मीना जोशी यांनी केले. आभार श्रद्धा शुक्ल यांनी मानले. यशस्वीतेसाठी वृषाली व्यवहारे, स्वप्नगंधा जोशी, श्रद्धा कुलकर्णी, रेवती कुरुंभट्टी आदींनी परिश्रम घेतले.

# चित्ररथाच्या माध्यमातून समाजकल्याण विभागाच्या योजनांचा जागर!

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचावी, यासाठी प्रसिद्धी मोहिम ेचा शुभारंभ नुकताच जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला. अपर जिल्हाधिकारी डॉ.श्रीमंत हारकर यांच्याहस्ते एलईडी चित्ररथाला हिरवा झेंडा दाखविण्यात आला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण, उपजिल्हाधिकारी जितेंद्र कुवर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ.रवींद्र ठाकूर, समाज कल्याण अधिकारी अमोल कुलकर्णी, समाज कल्याण विभागाचे अधीक्षक राजेंद्र कांबळे आदी उपस्थित होते.

**११० गावांमध्ये होणार जनजागृती**

समाजकल्याण विभागाच्या



योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी चित्ररथाद्वारे ही जनजागृती म ोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यातील सुमारे ११० गावांमध्ये दोन एलईडी चित्ररथ फिरणार असून याद्वारे समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची प्रचार प्रसिद्धी करण्यात येणार आहेत.



# वॉर्ड क्रमांक १२ मध्ये पर्यावरण जनजागृती सर्वेक्षण

**जळगाव** : महापालिका पर्यावरण विभाग व एम. जे. कॉलेज समाजशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव शहरातील वार्ड क्रमांक १२ मध्ये पर्यावरणा संदर्भात जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत समाजशास्त्र विभागाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी हे त्या परिसरातील प्रत्येक घरात जाऊन त्यांच्याजवळ असलेली प्रश्नावली घरातील व्यक्तीकडून पूर्ण भरून घेतील. यामध्ये घरातील कचरा व्यवस्थापन, ओला व सुका कचरा, प्लास्टिक वापर व त्याचे रियूज तसेच पावसाळ्यातील वृक्षारोपण व त्याचे संवर्धन याबाबत प्रश्नावली तयार करण्यात आली आहे.

प्रत्येक नागरिकां कडून ती भरून घेण्यात येईल. या कार्यक्रमाचे उद्घाटन मंगळवारी (१७ मार्च) सकाळी १० वाजता जळगाव मनपाच्या अतिरिक्त आयुक्त निर्मला गायकवाड तसेच के. सी. ई. सोसायटीच्या शैक्षणिक संचालिका डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मनपा पर्यावरण विभागाचे अभियंता प्रकाश पाटील, समन्वयक राजेश पाटील, विशाल वाणी तसेच समाजशास्त्र विभागाचे प्रमुख व कार्यक्रम समन्वयक डॉ. सागर बडगे, प्राध्यापिका चिन्मय मराठे व सूर्यकांत बोईनवाड हे उपस्थित होते.

या सर्वेक्षणामध्ये समाजशास्त्र विभागाचे सुमारे ३० विद्यार्थी सहभागी झालेत. संपूर्ण सर्वे झाल्यावर विभागामार्फत एक प्रकल्प अहवाल तयार करून तो मनपाकडे सुपूर्त करण्यात येणार आहे. याप्रसंगी वार्ड क्रमांक १२ मधील नागरिकांनी या विद्यार्थ्यांना माहिती द्यावी असे आवाहन मनपातर्फे करण्यात येत आहे. प्रत्येक विद्यार्थ्यासोबत त्याच्या कॉलेजचे ओळखपत्र आहेत.

# कापडी पिशव्यांचे वाटप करत दिला प्लास्टिक हटावचा संदेश

## इनरव्हील क्लब ऑफ जळगाव ईस्टचा उपक्रम; दीड हजार पिशव्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

वाढत्या प्रदूषणाला आळा बसावा तसेच पर्यावरणाचे रक्षण व्हावे, यासाठी इनरव्हील क्लब ऑफ जळगाव ईस्टतर्फे जळगाव शहरात प्लास्टिक हटाव मोहीम राबवण्यात आली. या मोहीमेंतर्गत शहरातील विविध भाजीबाजार आणि प्रमुख चौकांमध्ये १५०० कापडी पिशव्यांचे वाटप करून नागरिकांना प्लास्टिक मुक्तीची शपथ देण्यात आली.

बाजारात भाजी घेण्यासाठी आलेल्या ज्या ग्राहकांच्या हातात



प्लास्टिक पिशव्या होत्या, त्या पिशव्यांमधील भाजीपाला तात्काळ काढून तो क्लबतर्फे देण्यात आलेल्या कापडी पिशव्यांमध्ये भरून देण्यात आला. केवळ पिशव्या न वाटता, प्लास्टिकचे विघटन न होण्यामुळे होणारे पर्यावरणाचे धोके आणि कापडी पिशव्यांचे दीर्घकालीन फायदे, यावर उपस्थित पदाधिकाऱ्यांनी नागरिकांशी संवाद साधला. शहरातील सिंधी कॉलनी, प्रभात चौक, रामानंदनगर चर्च परिसर, ओंकारेश्वर मंदिर परिसर येथे हा उपक्रम राबविण्यात आला.

क्लबच्या डिस्ट्रीक्ट चेअरमन रमा गर्ग आणि पीडीसी तथा डीपीसीसी संगीता घोडगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. क्लबच्या अध्यक्षा सिमरन पाटील आणि सचिव रितू शर्मा यांनी उपक्रमाचे नियोजन केले. या मोहिमेला शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्लास्टिकचा वापर टाळण्याचा संकल्प केला.

### गुढी पाडव्यानिमित्त चैत्रपालवी स्वरोत्सव मैफिल

**जळगाव** : चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढी पाडवानिमित्त स्व. वसंतराव चांदोरकर स्मृती प्रतिष्ठानच्यावतीने प्रात:कालीन सुगम संगीताच्या मैफिल अर्थात चैत्र पालवी स्वरोत्सवाचे आयोजन गुरुवार, दि.१९ रोजी सकाळी ६ वाजता महात्मा गांधी उद्यान येथे करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला आ.राजूमामा भोळे, महापौर दिपमाला काळे, जिल्हाधिकारी रोहन घुगे व जैन इरिगेशन सिस्टिम्सचे अध्यक्ष अशोक जैन आदी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाला भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशनचे सहकार्य लाभले असून स्वरोत्सवात श्रुती जोशी, वरुण नेवे, राजेश्वरी रत्नपारखी (बासरी) आपली कला सादर करणार आहेत तर राजेंद्र माने संवादीवर व राहुल कासार तबल्यावर संगत करणार आहे. या प्रात:कालीन मैफिलीचे निवेदन प्रिती झारे करणार आहेत. तरी सर्व रसिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन चांदोरकर प्रतिष्ठान व भवरलाल व कांताबाई जैन फाऊंडेशनच्यावतीने करण्यात आले आहे.

### 'लक्षवेधी'तर्फे स्मृती अभिवादन सभा

**जळगाव** : येथील (स्व.) देविदास परदेशी यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन सभेचे लक्षवेधी जळगाव या संस्थेच्यावतीने आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला ज्येष्ठ रंगकर्मी चिंतामण पाटील, शरद पांडे आणि सुमित परदेशी यांच्याहस्ते स्व.देविदास परदेशी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर चिंतामण पाटील यांनी परदेशी यांच्या नाट्य क्षेत्रातील प्रवास हा कॉलेज जीवनापासून सुरू झाल्याचे सांगितले. त्यानंतर पियुष रावळ यांनीही त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. ज्येष्ठ संगीतकार मुन्ना शर्मा, रंगकर्मी अनिल मोरे, शरद पांडे, संस्कार भारतीचे संगीत विभाग प्रमुख दुष्यंत जोशी, विनोद ढगे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक योगेश हिवरकर यांनी तर सूत्रसंचालन जगदीश नेवे यांनी केले. यावेळी रंगकर्मी संजय निकुंभ, होनाजी चव्हाण, ओम प्रकाश शर्मा, वंदना नेवे, मानसी नेवे, दीक्षा परदेशी, रोहित ठाकरे, मुकेश राठोड, पियुष पाटील, योगेश भोई, सुदर्शन पाटील आदी रंगकर्मी उपस्थित होते.

# वडजी येथे ब्रह्माकुमारीज् अध्यासन केंद्राचे उदघाटन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**

आध्यात्मिक व नैतिक मूल्यांच्या प्रसारासाठी तसेच भारतीय प्राचीन सहज राजयोगाच्या अभ्यासासाठी ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या वतीने वडजी (ता. भडगाव) येथे नव्याने उभारण्यात आलेल्या ''ब्रह्माकुमारीज राजयोग पाठशाळा'' अध्यासन केंद्राच्या इमारतीचे उद्घाटन उत्साहात झाले. या केंद्राच्या माध्यमातून पंचक्रोशातील ग्रामस्थ प्राचीन सहज राजयोग ध्यानाभ्यासाचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या अध्यासन केंद्रामध्ये आध्यात्मिक शिक्षण, राजयोग ध्यान प्रशिक्षण, गीता अध्ययन तसेच नैतिक मूल्यांवर आधारित विविध उपक्रम नियमितपणे राबविण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आध्यात्मिक जागरूकता वाढवणे, सकारात्मक विचारसरणी विकसित करणे आणि संस्कारमूल्यांची जपणूक करणे या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे.

अध्यासन केंद्राचे उद्घाटन राजयोगीनी ब्रह्माकुमारी मीनाक्षी दीदीजी (सबझोन इंचार्ज, जळगाव), ब्र. कु. मिरादीदी (पाचोरा) तसेच जळगाव उपक्षेत्रातील वरिष्ठ ब्रह्माकुमारी बहिणींच्या प्रमुख उपस्थितीत झाले.या प्रसंगी ब्रह्माकुमारीज् मुख्यालय आबू पर्वताहून संस्थेचे महासचिव राजयोगी ब्रह्माकुमार करुणाभाईजी

## पंचक्रोशातील ग्रामस्थ घेणार राजयोग ध्यानाभ्यासाचे लाभ



- ग्रामस्थांना मिळणार प्राचिन राजयोगाचे धडे
- भारतीय प्राचिन परंपरा आणि आध्यात्मिक मार्गदर्शन
- राजयोग वर्ग, ध्यानकक्ष आधुनिक सुविधा
- ग्रामीण परीसरातील युवकांना समूपदेशन

आणि वरिष्ठ राजयोग शिक्षिका ब्रह्माकुमारी उषादीदीजी, ब्रह्माकुमारी रुख्मिणी दीदीजी यांनी ऑनलाइन माध्यमातून विशेष शुभेच्छा देत या उपक्रमाचे कौतुक केले.

**यांची लाभली उपस्थिती**

उदघाटन सोहळा प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते. माजी जि.प. सदस्य प्रदीपराव गुलाबराव पाटील, भडगाव माजी नगराध्यक्ष जिबुसो महादू पाटील पं.स. माजी सभापती अभिमन सिताराम पाटील, मा.जि.प.सदस्य संजय श्रावण पाटील, माजी चेअरमन युवराज धोंडू सूर्यवंशी, माजी सरपंच सुभाष कौतिक पाटील, माजी उपसरपंच कैलास रामदास पाटील,माजी चेअरमन नारायण हिम्मत पाटील, माजी सरपंच डी. वाय. पाटील, माजी सभापती रामकृष्ण अभिमन पाटील, जिल्हा बुथ प्रमुख शिवसेना सौरव राजेंद्र पाटील तसेच भाजप तालुका सरचिटणीस प्रदीप भिकन पाटील यांचा समावेश होता.

# कुसुंब्यात २२ मार्चला 'ज्ञानियांचा राजा मोगरा फुलला'

## ज्ञानेश्वर माउलींच्या जयंतीनिमित्त आध्यात्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ मार्च**



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून, त्याअंतर्गत सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे 'ज्ञानियांचा राजा मोगरा फुलला' हा विशेष आध्यात्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम २२ मार्चला शहरात होणार आहे.



गणेश शिंदे

सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित कार्यक्रम सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात 'ज्ञानियांचा राजा मोगरा फुलला' कार्यक्रम २२ मार्चला सकाळी नऊ ते दुपारी बारा या वेळेत शहरातील अजिंठा रस्त्यावरील कुसुंबा येथील दीपस्तंभ फाउंडेशन मनोबलजवळील बाफना गोशाळेत होणार असून, कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य राहणार आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींनी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) या ग्रंथाद्वारे अध्यात्म, समता, बंधुभाव व मानवतेचा संदेश समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचविला. त्यांच्या विचारांमुळे महाराष्ट्रातील संतपरंपरा, वारकरी संप्रदाय तसेच सामाजिक ऐक्यभाव अधिक दृढ झाला असून, त्यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्य शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

कार्यक्रमात प्रबोधनकार गणेश शिंदे यांचे संत ज्ञानेश्वर माउली यांच्या अध्यात्मदृष्टिकोनावर, समाजप्रबोधनातील योगदानावर तसेच आधुनिक काळातील त्यांच्या विचारांची उपयुक्तता या विषयावर विशेष प्रबोधनपर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमास जळगावसह परिसरातील नागरिक, विद्यार्थी, वारकरी बांधव, संत साहित्य अभ्यासक तसेच रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# जिल्ह्यात व्यावसायिकांकडून घरगुती गॅस सिलेंडरचा वापर

## धुळ्यात १५, शिंदखेड्यात १२ सिलेंडर जप्त

**धुळे** : जागतिक स्तरावर युद्धजन्य स्थितीमुळे इंधन पुरवठा खंडित होणार असल्याच्या अफवांचे पेव फुटले असून, धुळे शहरासह जिल्ह्यात घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा सुव्यवस्थित सुरू असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असताना, दुसरीकडे पुरवठा विभागांतर्गत नियुक्त दक्षता तपासणी पथकाने हॉटेल्स, खानावळी, रेस्टॉरंटची तपासणीदरम्यान धुळे शहरात १५, तर शिंदखेडा येथे १२, असे २७ घरगुती वापराचे गॅस सिलेंडर जप्तीची कारवाई केल्याने, व्यावसायिकांकडून घरगुती गॅस सिलिंडरचा वापर होत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

युद्धजन्य पार्श्वभूमीवर इंधनाचा पुरवठा खंडित होणार असल्याच्या अफवांमुळे शहरासह जिल्ह्यात नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले. जिल्ह्यात घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा नियमित व सुरळीत सुरू असून, जिल्ह्यात पुरेशा प्रमाणात गॅस साठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे. जिल्ह्यात बीपीसीएल, आयओसीएल, एचपीसीएल आदी ३८ गॅस एजन्सी कार्यरत आहेत. जिल्ह्यात घरगुती गॅस ग्राहकांची संख्या पाच लाख ३७ हजार ७३३ इतकी असून, रोज सरासरी ८ हजार ६७८ गॅस सिलेंडरची आवश्यकता भासते. सध्या जिल्ह्यातील विविध गॅस एजन्सीकडे घरगुती गॅस सिलेंडरचा साठा उपलब्ध आहे. गॅस कंपन्यांकडून सिलेंडरचा पुरवठा नियमितपणे होत असून, आगामी काळातही घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत राहणार आहे, असा दावा जिल्हा प्रशासनाने केला आहे.

दरम्यान, जिल्हा पुरवठा विभागांतर्गत नियुक्त दक्षता पथकाकडून व्यावसायिकांकडून अनधिकृतरित्या घरगुती गॅस वापरासंदर्भात २४ हॉटेल्स तसेच खानावळींची तपासणी करण्यात आली. दरम्यान, संबंधित हॉटेल्स, खानावळीत घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याचे आढळून आल्याने १५ गॅस सिलेंडर जप्ती कारवाई करण्यात आली.

### शिंदखेड्यात धडक तपासणी मोहीम

शिंदखेडा शहरातील हॉटेल्स व रेस्टॉरंट आदी ठिकाणी तपासणी करण्यात आली. यात १२ ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरचा व्यवसायासाठी वापर होत असल्याचे आढळून आल्याने तत्काळ जप्ती कारवाई करण्यात आली. सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना भगत, निरीक्षण अधिकारी हर्षा महाजन, पुरवठा निरीक्षक महेश वाडिले, किशोर बडगुजर, शहर तलाठी शेख यांच्या पथकाने ही कारवाई केली. तपासणीदरम्यान व्यावसायिक गॅस नोंदणी, गॅस पुस्तिका, भरून आणल्याची पावती आदींची तपासणी करण्यात येत आहे. यापुढेही घरगुती वापरासाठी असलेले गॅस सिलेंडर व्यावसायिक उपयोगासाठी वापराविरुद्धची ही कारवाई निरंतर सुरू राहणार असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.




**या ठिकाणी झाली जप्ती कारवाई**

धुळे शहरात मुश्ताक अहमद मोइनोद्दीन (वडजाई रोड), सुधाकर महादू गवळी (गवळीवाडा), जितेंद्र बाबूराव वाघ (नगरपट्टी गल्ली नं. ५), हरियाणा जिलेबी (नेहरू चौक, हॉटेल इंडिया उर्दू हायस्कूलसमोर), हॉटेल विरांश आणि हॉटेल रॉक अॅन्ड रोल (महाजन हायस्कूलजवळ), हॉटेल फास्टफूड सेवालाल चायनीज आणि हॉटेल साईकिशन (नगावबारी रोड), हॉटेल खानदेशी मटणवाडा (स्वागत लॉजजवळ), हॉटेल चेतन (वाडीभोकर रोड), श्री महालक्ष्मी (बसस्थानकासमोर) अशा ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याचे आढळून आले आहे. यात प्रत्येकी एक, तर हॉटेल साईकिशनमध्ये एचपीसीएल आणि बीपीसीएल अशा दोन घरगुती गॅस सिलेंडर जप्ती कारवाई करण्यात आली.

**या ठिकाणी व्यावसायिक सिलेंडरचा वापर**

धुळे शहरात दत्त मंदिर चौक, गोंदूर रोडसह अन्य परिसरातील हॉटेल बाबाजी सागर, रसराज, पंकज, अक्षय, देवा, शिवनेरी, समाधान, राजहंस, देविदास पावभाजी, मल्हार कल्याणी स्विट्स आदी ठिकाणी तपासणीदरम्यान व्यावसायिक सिलेंडर नियमित वापरात असलेले आढळून आले.

# करवंद येथे दुधात आढळले 'फॉर्मालिन' घातक रसायन!



**धुळे** : जिल्ह्यात तसेच राज्यात दूध भेसळ रसायनयुक्त दुधाच्या विक्रीचे अनेक प्रकार नवीन नाहीत; परंतु गायी- म्हशींचे दूध दोन ते तीन दिवस खराब न होता टिकून राहण्यासाठी फार्मालिन नावाचे घातक रसायनयुत्त दूध विक्री होत असल्याचा प्रकार करवंद येथे आढळून आला आहे.

करवंद येथील लक्ष्मीबाई वाघ हिने स्थानिक दूध विक्री केंद्रांवरून विकत घेतलेल्या दुधाच्या नमुन्यात मृतदेह जतन करण्यासाठी वापरले जाणारे 'फॉर्मालिन' हे घातक रसायन आढळल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या दुधाच्या गुणवत्तेबाबत साशंकता असल्याने या महिलेने याबाबत तक्रार केली.



त्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने दुधाच्या नमूनयाची केलेल्या तपासणीत हा प्रकार उघड झाला असून या दुधात 'फॉर्मालिन' हे रसायन आढळल्याचे स्पष्ट झाले. यामुळे नागरिकांच्या आरोग्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. अन्न-औषध विभागाने केलेल्या दुधाच्या नमुन्याच्या तपासणीदरम्यान या अहवालात म्हशीच्या दुधासाठी आवश्यक असलेले फॅटचे प्रमाण कमी आढळून आले. साधारणपणे किमान ५ टक्के फॅट अपेक्षित असून, तपासलेल्या नमुन्यात ते केवळ ४.३ टक्के होते. तसेच या दुधाच्या नमुन्यात 'फॉर्मालिन' चाचणी पॉझिटिव्ह आली असून, दुधात जाणीवपूर्वक घातक रसायन मिसळल्याचे आढळून आले आहे.

'फॉर्मालिन' हे अत्यंत घातक रासायनिक द्रावण असून, त्याचा वापर प्रामुख्याने औद्योगिक व वैद्यकीय क्षेत्रात हॉस्पिटल किंवा प्रयोगशाळांमध्ये मृतदेह अथवा प्राण्यांचे अवयव सडून नाश होऊ नये यासाठी केला जातो. याशिवाय, शस्त्रक्रिया कक्ष निर्जंतुकीकरणासाठी तसेच रबर, रंग आणि कापड उद्योगातही या रसायनाचा वापर होतो. बरेच विक्रेते उन्हाळ्यात किंवा लांब प्रवासादरम्यान दूध खराब होऊ नये म्हणून त्यात 'फॉर्मालिन' मिसळतात. यामुळे दुधातील जीवाणूंची वाढ थांबते व किमान दोन ते तीन दिवस खराब न होता ताजे असल्यासारखे दिसते.

**घातक रसायनाच्या वापरामुळे आरोग्यावर परिणाम**

'फॉर्मालिन' हे 'कार्सिनोजेनिक' म्हणजेच कर्करोग निर्माण करणारे रसायन आहे. यामुळे पोटदुखी, उलट्या, जुलाब यांसारखे तात्काळ त्रास होऊ शकतो. रसायनयुक्त अन्नपदार्थांचे दिर्घकाळ सेवनामुळे मूत्रपिंड निकामी होणे, रक्ताचा कर्करोग तसेच पचनसंस्थेचे गंभीर आजार होण्याची शक्यता असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### माँ दुर्गामाता महिला भजनी मंडळातर्फे वाघाडीतील अनाथ मतिमंद मुलांना अन्नदान

**शिरपूर** : श्री गुरुसेवा वारकरी सेवा मंडळाच्या मार्गदर्शनात शहरातील गायत्री कॉलनीतील माँ दुर्गामाता महिला भजनी मंडळातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त वाघाडी (ता. शिरपूर) येथील बापूसाहेब एन. झेड. मराठे विधायक संस्था संचलित अनाथ मतिमंद मुलांच्या शाळेत विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले. याप्रसंगी श्री गुरुसेवा प्रतिष्ठान वारकरी सेवा मंडळाचे विश्वस्त विश्वास पाटील, विश्वस्त सुधाकर पाटील, तालुका उपाध्यक्ष योगेश बागुल, अविनाश पाटील, विनोद मराठे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी संस्थेचे मानस वैद्यकीय अधिकारी योगेश भावसार, कल्पेश माळी, ज्ञानेश्वर पाटील, किशोर पवार, निर्देशक भूषण पवार, राज बोरसे, सचिन मराठे यांच्यासह शिक्षकेतर व सहकाऱ्यांनी सहकार्य केले.




### पालेशा महाविद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात

**धुळे** : शहरातील मा. ध. पालेशा महाविद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात झाले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्राचार्य प्रभाकर महाले यांच्या हस्ते झाले. स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देणारा गुणदर्शनाचा कार्यक्रम झाल. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, अभिनय तसेच इतर सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे कौशल्य प्रभावीपणे सादर केले. याप्रसंगी प्राचार्य प्रभाकर महाले यांनी अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे सांगितले. परीक्षक म्हणून भामरे आणि नागरे यांनी काम पाहिले. स्नेहसंमेलनातील बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी धुळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष युवराज करनकाळ होते. संस्थेचे सचिव संतोष अग्रवाल यांची विशेष उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून राधिका अभिजित गानू, डॉ. प्रकाश श्यामराव चौधरी व महेश पुंडलिक सोनार उपस्थित होते.

# नंदुरबारच्या श्री छत्रपती ब्लड फाउंडेशनचा राष्ट्रीय सन्मान

## गया विष्णूनगरीत 'शहीद भगतसिंह युथ बिग्रेड बिहार-२०२६'ने गौरव

**नंदुरबार** : 'रक्तदान म्हणजे मानवतेचे खरे पूजन' या भावनेला जीवनधर्म मानणाऱ्या शहरातील श्री छत्रपती ब्लड फाउंडेशनने पुन्हा एकदा नंदुरबारचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल केले आहे. बिहार येथील विष्णूनगरी गया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समारंभात फाउंडेशनला 'आंतरराष्ट्रीय शहीद भगतसिंग युथ बिग्रेड बिहार-२०२६' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा सन्मान 'शहीद भगतसिंह युथ बिग्रेड गयाजी'तर्फे प्रदान करण्यात आला असून, श्री छत्रपती ब्लड फाउंडेशनचा हा वर्ष २०२६ मधील पाचवा राष्ट्रीय पुरस्कार आहे. नंदुरबारमधील या फाउंडेशनने व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून असंख्य रक्तदाते एकत्र आणले असून, गरजू रुग्णांना तातडीने रक्त उपलब्ध करून देण्यात ही संस्था आज जिल्ह्यात जीवनवाहिनी ठरली आहे. जिल्हा रुग्णालयात रक्ताचा तुटवडा भासल्यास, या ग्रुपवर केलेल्या एका लघुसंदेशानंतर काही मिनिटांतच रक्तदाते धावून येतात. अनेक जीव वाचविण्यात या चळवळीचा थेट हातभार लागतो. रक्तदान या 'महादान' कार्यात सातत्याने सक्रिय राहिल्यामुळेच बिहारमध्ये गयाजी येथील शहीद भगतसिंग युथ बिग्रेडने श्री छत्रपती ब्लड फाउंडेशनच्या सेवाकार्याची दखल घेत आंतरराष्ट्रीय पातळीवरील गौरवाची शाल त्यांच्यावर चढवली आहे.



गया येथे कार्यक्रमात फाउंडेशनचे कार्यकर्ते अरुण शांतिलाल साळुंखे व रामकृष्ण शांतिलाल पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या आंतरराष्ट्रीय सोहळ्यात महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, झारखंड, राजस्थान, गुजरात, तेलंगणा, छत्तीसगड आदी राज्यांतील तसेच नेपाळ देशातूनही असे १५० सामाजिक संस्थांचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे भारत सरकारचे माजी केंद्रीय मंत्री अश्विनी चौबे, प्रमुख अतिथी शहीद चंद्रशेखर आझाद यांचे वंशज अमित आझाद तिवारी, शहीद वैकुंठ शुक्ल यांचे वंशज अरुण शुक्ल आणि संस्थेचे मुख्य संरक्षक प्रमोद भदानी, अनंत धिश अमन, इक्बाल हुसैन, अनिल स्वामी, फौजी हसलापूर, अतुल कुमार, कौशलेंद्र प्रतापसिंह, लालजी प्रसाद आदींची उपस्थिती होती. शहीद भगतसिंग युथ बिग्रेडचे संस्थापक सोनीकुमार वर्मा यांनी सूत्रसंचालन केले.

या चळवळीत महेंद्र झवर, जीवन माळी, अजय देवरे, हितेश कासार, सुधीरकुमार ब्राह्मणे, पोलीस शिपाई अभय राजपूत आदी कार्यकर्त्यांचे उल्लेखनीय योगदान असून, या सर्वांच्या निःस्वार्थ सेवेमुळे नंदुरबार हा आज 'रक्तदात्यांचा आदर्श जिल्हा' म्हणून ओळख निर्माण करीत आहे. श्री छत्रपती ब्लड फाउंडेशनचे संस्थापक सदस्य म्हणाले, "रक्तदान म्हणजे मानवतेची साक्ष आहे. एका थेंबातून हजारो जीवांचे हसू फुलते आणि हे हसू टिकविणे हेच आमचे ध्येय आहे." विष्णूनगरीत राष्ट्रीय सन्मानाचा मान मिळवत श्री छत्रपती ब्लड फाउंडेशनने 'दान हीच सेवा आणि सेवा हाच धर्म' या विचारांना प्रत्यक्ष कृतीतून आकार दिला आहे.




# शिरपूर भाजपतर्फे राहुल गांधींचा निषेध

**शिरपूर** : शिरपूर भाजपतर्फे आमदार कार्यालयात काँग्रेस नेते खासदार राहुल गांधींचा निषेध करण्यात आला. संसद भवनाच्या प्रवेशद्वाराजवळ काँग्रेस नेते राहुल गांधी व त्यांच्या सहकाऱ्यांनी चहा-बिस्कीट घेऊन 'चाय पार्टी' आयोजित करून संसदेची प्रतिष्ठा कमी करण्याचा प्रयत्न केला.

लोकसभेत अर्थसंकल्पावर चर्चा सुरू असताना अध्यक्षांनी प्रवेशद्वाराजवळ कोणतेही आंदोलन करू नये, असे स्पष्ट निर्देश दिले असतानाही विरोधकांनी त्याचे उल्लंघन केले, ही अत्यंत निषेधार्ह बाब आहे. त्याच्या निषेधार्थ सोमवारी (१६ मार्च) आमदार कार्यालयात माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, भाजपचे शहराध्यक्ष तथा नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या मार्गदर्शनात भाजपतर्फे राहुल गांधी यांच्या प्रतिमेस जोडे मारत निषेध आंदोलन करण्यात आले.

या वेळी शिरपूर विधानसभा क्षेत्रप्रमुख के. डी. पाटील, शिरपूर ग्रामीण अध्यक्ष भरत पाटील, सांगवी मंडळाध्यक्ष योगेश बादल, थाळनेर मंडळाध्यक्ष विरूपालसिंग राजपूत, भाजपचे उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील, श्री बालाजी संस्थानचे विश्वस्त भालेराव माळी, भाजपचे सरचिटणीस योगेंद्रसिंग सिसोदिया, ओबीसी मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस संजय आसापुरे, ओबीसी मोर्चाचे शहराध्यक्ष राजेंद्र चौधरी, उपाध्यक्ष जयसिंग राणा, शहर उपाध्यक्ष विनायक कोळी, सरचिटणीस संजय जाधव, माजी जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, मीडियाप्रमुख गजेंद्रसिंग राजपूत, रोहित माळी, सारिश पाटील, दीपक पगारे, संदीप भिल व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पिंपळोद शिवारात पपईच्या ६०० झाडांची कत्तल

## वीरपूरच्या चौघांविरुद्ध म्हसावद पोलिसांत गुन्हा

**शहादा** : शेतशिवारातील वादातून पिंपळोद (ता. शहादा) येथे पपईच्या बागेवर कुऱ्हाड चालवून सुमारे चार लाखांचे नुकसान केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी वीरपूर येथील चौघांविरुद्ध म्हसावद पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



वीरपूर येथील रहिवासी कध्या रायसिंग पवार यांची पिंपळोद शिवारात गट क्रमांक १० आणि ११ मध्ये सामाईक शेती आहे. ६ मार्चला सकाळी मुकेश करमसिंग पवार, वनकर बुटसिंग पवार, राजेश करमसिंग पवार आणि सेवा कश्या पवार यांनी हातात लोखंडी धाऱ्या घेऊन पवार यांच्या शेतातील पपईची सुमारे ५०० ते ६०० झाडे कापून नुकसान केले. फिर्यादी व साक्षीदारांना जीवे मारण्याची धमकी देत संशयितांनी शिवीगाळ केली. या तक्रारीवरून म्हसावद पोलिसांनी भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमांन्वये चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. हवालदार नीलेश पाटील तपास करीत आहेत.

# यश अहिरराव, हरीश वाघ यांची केली 'कॉपमॅप संगणक प्रणाली'

**धुळे** : येथील एसव्हीकेएम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माहिती-तंत्रज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभिमानास्पद यश संपादन केले आहे. माहिती- तंत्रज्ञान विभागातील यश अहिरराव व हरीश वाघ या विद्यार्थ्यांनी भारत सरकारच्या माहिती-तंत्रज्ञान व संचार मंत्रालयाकडून १० लाख सरकारी अनुदान प्राप्त केले आहे. हे अनुदान त्यांनी विकसित केलेल्या नावीन्यपूर्ण प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांनी कॉपमॅप संगणक प्रणाली नावाचे एक अत्याधुनिक कायदा अंमलबजावणी व्यासपीठ तयार केले आहे. हे व्यासपीठ पोलीस अधिकाऱ्यांच्या दैनंदिन कामकाजात मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरणारे आहे. यामुळे पोलीस कामकाजातील वेळेची बचत होते, कामात अधिक पारदर्शकता येते तसेच एकूण कामकाजाची दृश्यमानता वाढते. पोलीस दलाचे काम अधिक सुलभ, जलद आणि परिणामकारक व्हावे यासाठी हे तंत्रज्ञान विशेषतः विकसित करण्यात आले आहे.



या प्रकल्पाच्या यशात विभागाच्या प्रा. भाग्यश्री ठाकरे व प्रा. नितीन धुतराज यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. या अभिनव प्रकल्पामुळे संस्थेचे नाव उज्ज्वल झाले असून, विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजासाठी केलेले योगदान स्तुत्य आहे. या यशाबद्दल एसव्हीकेएमचे अध्यक्ष, माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, एसव्हीकेएम- एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटी चान्सलर स्नेहा पारेख, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, मार्गदर्शक डॉ. अजय पसारी, प्राचार्य डॉ. नीलेश साळुंखे, विभागप्रमुख डॉ. भूषण चौधरी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थ्यांनी कौतुक केले.

# सावळदे येथे महाराजस्व अभियान समाधान शिबिर

## ८२२ लाभार्थ्यांना योजनांचे लाभ वाटप

**शिरपूर** : राज्य शासनाच्या महसूल विभागातर्फे क्षेत्रीय स्तरावर सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी निगडित प्रश्नांचे निराकरण करून सेवा देण्याकामी मंडळस्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर सावळदे (ता. शिरपूर) येथे घेण्यात आले.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर व उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक यांच्या मार्गदर्शनात सावळदे (ता. शिरपूर) येथे घेण्यात आलेल्या शिबिराचे उद्घाटन आमदार काशिराम पावरा, उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी तालुका कृषी अधिकारी कैलास गोपाळ, तालुका आरोग्य अधिकारी, महिला व बालकल्याण अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी, तहसील विभागाचे विविध शाखांचे अधिकारी-कर्मचारी, सावळदे येथील सरपंच राजपूत, वाटोळे येथील सरपंच नारायण चौधरी, कुरखडीचे सरपंच गोसावी, मंडळ अधिकारी श्रद्धा जगताप, तसेच थाळनेर मंडळातील तलाठी उपस्थित होते.




शिबिरात सुमारे ८२२ लाभार्थ्यांनी विविध योजनांचा लाभ घेतला व शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रत्येक स्टॉलला भेट देऊन जाणुन घेतली. आमदार पावरा यांनी शिबिराचा लाभ गरजू लाभार्थ्यांपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचवावा यासाठी अधिकाऱ्यांनी प्रामाणिक प्रयत्न करावे, असे म्हटले. उपविभागीय अधिकारी मंडलिक यांनी सर्व क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न तत्काळ सोडवण्याबाबत मार्गदर्शन केले. तहसीलदार माळी यांनी प्रास्ताविकात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा मुख्य उद्देश सांगत शिबिराचा लाभ थाळनेर मंडळातील विद्यार्थी, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन केले आहे.

**शिबिरात देण्यात आलेले लाभ**

सेतू शाखेंतर्गत विविध प्रकारचे उत्पन्न दाखले, डोमिसाईल दाखले- ४५५, संजय गांधी योजना शाखेंतर्गत मंजूर प्रकरणे वाटप पत्र- ४७, पुरवठा विभागांतर्गत नवीन व दुबार शिधापत्रिका वाटप- ११२, सात-बारा उतारे व ८ अ वाटप- ८५, भूमी अभिलेख- मालमत्तापत्रक सनद वाटप व माहिती पत्रके- १२, ट्रॅक्टर कृषी कर्ज- ६, सात-बारा दुरुस्ती- १८, माती परीक्षण अहवाल- २१.

# ब्राह्मणवेल येथे शिबिरात लाभार्थ्यांचे 'समाधान'

**तभा वृत्तसेवा**
**पिंपळनेर (साक्री), १७ मार्च**

येथील अपर तहसील कार्यालयातर्फे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते व उपविभागीय अधिकारी रोहन कुवर यांच्या मार्गदर्शनाखाली ब्राह्मणवेल येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर उत्साहात झाले.

शिबिराचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर यांच्या हस्ते झाले. या वेळी अपर तहसीलदार अधिकार पेंढारकर, सरपंच रेखा देसाई, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंत पवार, नितीन सूर्यवंशी, सोनू सूर्यवंशी, निवासी नायब तहसीलदार किरण कोठावदे, बापू बहिरम, भूमी अभिलेख उपअधीक्षक कुंदन परदेशी आदी उपस्थित होते. शिबिराचा जास्तीत जास्त ग्रामस्थांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर यांनी केले.

शिबिरात ब्राह्मणवेल मंडळातील नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ देण्यात आला. यात जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र, वय-राष्ट्रीयत्व-अधिवास प्रमाणपत्र, ७/१२ व ८-अ उतारे, तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५५ अंतर्गत दुरुस्त नोंदींचे वितरण करण्यात आले.तसेच सामाजिक अर्थसहाय्य योजनांतर्गत संजय गांधी योजना, इंदिरा गांधी योजना, श्रावणबाळ योजना व राष्ट्रीय कुटुंब अर्थसाहाय्य योजनेचे अर्ज स्वीकारण्यात आले. काही लाभार्थ्यांना मंजुरी आदेशही वितरित करण्यात आले. आरोग्य विभागाकडून आभा कार्ड व आयुष्मान कार्ड वाटप तसेच नागरिकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. ग्रामविकास विभागामार्फत विवाह नोंद प्रमाणपत्र, जन्मदाखले व नमुना ८ उतारे देण्यात आले. महिला व बाल विकास विभागामार्फत पात्र महिलांना बेबी केअर किटचे वाटप करण्यात आले. तसेच ई-शिधापत्रिका वितरण व आधार नोंदणी अर्ज स्वीकारण्यात आले.



पिंपळनेरचे अपर तहसीलदार अधिकार पेंढारकर यांनी प्रास्ताविक केले. मंडळ अधिकारी युवराज केदार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमात माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर करून मान्यवरांचे स्वागत केले. शिबिरास गटशिक्षणाधिकारी पगारे, ग्रामपंचायत अधिकारी, महसूल व कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी, अंगणवाडी सेविका, नवापाडा येथील आश्रमशाळेतील शिक्षक, प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी, पोलीसपाटील तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते. शिबिरासाठी ब्राह्मणवेल मंडळातील मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व महसूल सेवकांनी योगदान दिले.

# खापर येथे शिबिरात योजनांचे लाभ वाटप




**अक्कलकुवा** : खापर (ता. अक्कलकुवा) येथील ग्रामपंचायत कार्यालयात आमदार आमश्या पाडवी यांच्या अध्यक्षतेखाली श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर घेण्यात आले.

या वेळी तहसीलदार विनायक घुमरे, शिवसेना सहसंपर्कप्रमुख लक्ष्मण वाडिले, लोकनियुक्त सरपंच किरण पाडवी, उपसरपंच विनोद कामे, ग्रामविकास अधिकारी विनोद ढोडरे, देवा वसावे, सरला वळवी, पुरवठा अधिकारी नीलिमा काळमेगे, पल्लवी इंगळे, अंकिता मावची, प्रदीप पाडवी, तलाठी संदीप तडवी, बालविकास प्रकल्प अधिकारी आशा भोई तसेच विविध विभागप्रमुख उपस्थित होते.

शिबिराच्या माध्यमातून महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.त्यात प्रलंबित फेरफार, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ आणि ८-अ उताऱ्याचे वाटप, उत्पन्न, रहिवासी आणि जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनाबाबतच्या प्रकरणांचा निपटारा, विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप, घरांसाठी पट्टे वाटप, ई-मोजणी, रेशन कार्ड वाटप, आरोग्य विभागामार्फत सिकलसेल तपासणी, वयोश्री तपासणी, कृषी विभागामार्फत डीबीटी ट्रॅक्टर प्रमाणपत्र वाटप, परिवहन महामंडळामार्फत कार्ड वाटप, सेतू केंद्रामार्फत आधार कार्ड दुरुस्ती व विविध अर्ज वाटप, भूमी अभिलेख कार्यालयातर्फे सनद वाटप करण्यात आले. तसेच इतर योजनांचा लाभ देण्यात आले.

> महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यामध्ये मंडळस्तरावर श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर घेण्यात येत आहेत. शिबिराच्या माध्यमातून जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा.
>
> **- आमश्या पाडवी (आमदार, अक्कलकुवा अक्राणी मतदारसंघ)**

तहसीलदार विनायक घुमरे यांनी प्रास्ताविक केले. मोगीलाल चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. शिबिरास विविध विभागाचे प्रमुख पंचक्रोशीतील नागरिक व लाभार्थी उपस्थित होते.



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : १८/०३/२०२६ **वार** : बुधवार **शके** : १९४७
**अयन** : उत्तर **ऋतू** : वसंत **मास** : फाल्गुन **पक्ष** : कृष्ण **महिना** : मार्च
**संवत** : २०८२ **अयनांश** : २४-१३-२६ **तिथी** : चर्तुदशी **नक्षत्र** : पूर्वा भाद्रपदा
**योग** : शुभ **करण** : शकुनी **सूर्योदय** : ६.४७ **सूर्यास्त** : १८-४७
**चंद्राशी प्रवेश** : कुंभ **शुभाशुभ** : सौभाग्यवती योग

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : शेतकरी वर्गास उत्तम दिवस.
**वृषभ** : बांधकाम वर्गास उत्तम दिवस राहील.
**मिथून** : धार्मिक कार्यात सहभागी व्हाल.
**कर्क** : वाहन सांभाळून चालवावे.
**सिंह** : सांसारिक वातावरण अशांत राहील.
**कन्या** : शेतकरी वर्गास अडचणी येतील.
**तुला** : संततीस वाहन चालवू देवू नका.
**वृश्चिक** : मातृ विषयक कार्य करावे लागेल.
**धनू** : मेहनतीची कामे करावी लागतील.
**मकर** : आर्थिक व्यवहार स्वतःच करावे.
**कुंभ** : मानसिक चिंता व्यथा राहतील.
**मीन** : आरोग्याची काळजी घ्यावी.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८**

## थोडक्यात महत्त्वाचे.....



### युथ गेम्स कौन्सिल इंडिया एनएसपीओच्या मान्यता प्रस्तावाबाबत रक्षा खडसेंना निवेदन

**फैजपूर (ता. यावल)** : केंद्रीय युवक व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांची त्यांच्या निवासस्थानी यूजीसीआय यूथ गेम्स कौन्सिलचे राष्ट्रीय अध्यक्ष बादलसिंह ठाकूर यांनी भेट घेत यूथ गेम्स कौन्सिल इंडिया एनएसपीओ संस्था म्हणून मान्यता देण्याबाबतचे निवेदन देत संवाद साधला. ३० ऑगस्ट २०२५ रोजी केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तो मंत्रालयात नोंदविण्यात आला आहे. त्यावर मंत्रालयातील निर्धारित प्रशासकीय प्रक्रिया सुरू असून, ऑक्टोबर २०२५ मध्ये तो समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आल्याची माहिती उपलब्ध आहे. तथापि, प्रस्तावाच्या अंतिम स्थितीबाबत अद्याप कोणतीही औपचारिक माहिती प्राप्त झाली नाही. यूथ गेम्स कौन्सिल इंडिया संस्था देशातील युवकांमध्ये क्रीडा संस्कृतीचा प्रसार करणे, तळागाळातील खेळाडूंना संधी उपलब्ध करून देणे तसेच राष्ट्रीय स्तरावर क्रीडा व्यासपीठ निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. त्याअनुषंगाने, संबंधित अधिकाऱ्यांना या प्रस्तावाची सद्यःस्थिती तपासण्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करावे, असे निवेदनात म्हटले असून, केंद्रीय राज्यमंत्री खडसे यांच्याशी संवाद साधला. याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष बादलसिंह ठाकूर (पंढरपूर), जीसीआय यूथ गेम्स कौन्सिल इंडियाचे राष्ट्रीय सचिव अमरसिंह चंदेले, अनुराधा परदेशी यांच्यासह भाजपचे तालुका सरचिटणीस उपस्थित होते.




### रामराज्य संघातर्फे प्राचार्य डॉ. पाटील यांचा सन्मान

**फैजपूर (ता. यावल)** : येथील लोकसेवक मधुकरराव चौधरी फार्मसी म हाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील यांच्या नावे उत्कृष्ट फार्मसी महाविद्यालयास राज्यस्तरीय पुरस्काराची सुरुवात केल्याबद्दल, त्यांना रामराज्य सेवाभावी संघातर्फे शुभदिव्य मंगल कार्यलयात आयोजित सोहळ्यात सन्मानित करण्यात आले. माजी नगराध्यक्ष पांडुरंग सराफ अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी नगरसेवक सिद्धेश्वर वाघुळदे, नगरसेविका सुनीता नेहेते, समाजसेविका अनंता नेहेते, संदीप भारंबे, सुभाष चौधरी, प्रा. सतीश चौधरी, प्रा. भोजराज पाटील, दीपक होले, रामराज्य संघाचे संजय सराफ, अतुल महाजन, राजाभाऊ चौधरी, नीलेश चौधरी, नीलेश कोल्हे, मृणालिनी राणे, भारती पाटील, हेमांगी चौधरी, स्नेहा चौधरी, काजल महाजन, निर्मला चौधरी, सुवर्णा चौधरी, सोनल तळेले, राकेश चौधरी, योगेश भावसार, दिनकर तळेले, प्रकाश नेमाडे आदींची उपस्थिती होती.



### किशोर झोपे यांचा निवृत्तीनिमित्त सत्कार

**न्हावी (ता. यावल)** : स्टेट बँक ऑफ इंडिया खराडी, पुणे चे असिस्टंट जनरल मॅनेजर किशोर बळीराम झोपे यांचा सेवानिवृत्ती निमित्त प्रा. एन टी तळेले व सिनियर जनरल मॅनेजर प्रमोद चौधरी यांच्या हस्ते शाल, भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अनिल लढे, प्रा. एल डी चौधरी, जळगावच्या शासकीय तंत्रनिकेतन चे सेवानिवृत्त प्रा.आर वाय पाटील, प्रा. देवेंद्र पाचपांडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक युवराज वाघुळदे, ललित कुमार फिरके, चारुलता चौधरी, सुरेखा वाघुळदे, ज्योती पाचपांडे, संगीता फिरके आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार ललित कुमार फिरके यांनी मानले.



### अंनिसच्या भुसावळ तालुकाध्यक्षपदी रवींद्र अहिरे

**भुसावळ** : येथील अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सभासदांची बैठक उत्साहात पार पडली. यावेळी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र बावस्कर यांच्या उपस्थितीत सामाजिक कार्यकर्ते रवींद्र (सुमंगल) अहिरे यांची भुसावळ तालुकाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. याच बैठकीत नगरसेवक उल्हास पगारे यांचीही संघटनेत महत्त्वाच्या पदावर निवड करण्यात आली. अंनिसच्या कार्यात सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सुभाष लोखंडे, निरंजना तायडे, सिद्धार्थ सोनावणे, विजय साळवे, नरहरी वासनिक, नरेश वाघ, अरुण दामोदर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समिती स्थापन

**फैजपूर (ता. यावल)** : येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव




उत्साहात साजरा करण्यासाठी बैठकीत सर्वानुमते जयंती समितीची स्थापना करण्यात आली. या बैठकीत समितीच्या अध्यक्ष दिपक हिवरे, उपाध्यक्ष चंद्रमणी मेढे, कार्याध्यक्ष सागर भालेराव, सचिव अतुल मेढे, खजिनदार अमर मेढे यांची निवड करण्यात आली. सल्लागार गौरेश वानखेडे व जितेंद्र मेढे तसेच सदस्य म्हणून नितीन तायडे, हर्षल मेढे आणि सौरभ गाढे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. बैठकीस बौद्ध पंच ट्रस्टचे धनराज मेढे, सुरेश मेढे, ज्येष्ठ नागरिक प्रकाश कनाशी मेढे तसेच चेतन मेढे, राजनंदन मेढे, रोहित मेढे, पवन मेढे, अनिकेत साळुंखे व अर्पित मेढे उपस्थित होते.

# फैजपूरला आदिशक्ती मुक्ताई पादुका पालखी प्रस्थान सोहळ्यास उसळला जनसागर!

**फैजपूर (ता. यावल), १७ मार्च**

श्री आदिशक्ती मुक्ताबाई संस्थान आयोजित फिरता नारळी सप्ताहानिमित्त आदिशक्ती मुक्ताबाई सिद्ध पादुका पालखी प्रस्थान सोहळ्याचे शहरात आगमन झाले. सोहळ्याचे भक्तिमय टाळ- मृदंगाच्या भजनी ठेक्यात व मुक्ताई मातेचे जयघोषणांनी स्वागत करण्यात आले. स्वागतासाठी भक्तांचा सागर लोटला होता.

मुक्ताईनगर येथून प्रस्थान केलेल्या या पालखी सोहळ्याचे शहरातील सुभाष चौकात आगमन होताच हजारो भाविकांनी मुक्ताई माउलींच्या जयघोषात जल्लोष करत पादुकांचे दर्शन घेतले. भजनी मंडळ, टाळकरी आणि मृदंगाच्या गजरात, अभंग-भजनांच्या सुरावटीत आणि जय मुक्ताई माउलींच्या घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

या वेळी अखिल भारतीय संत समितीचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज, डिगंबर वारकरी चिनावल मठाचे अध्यक्ष हरिभक्त परायण नरेंद्र नारखेडे, नगराध्यक्षा दामिनी सराफ, पवन सराफ यांच्या हस्ते आदिशक्ती मुक्ताबाई सिद्ध पादुकांचे विधिवत पूजन करण्यात आले. सुभाष चौकापासून विठ्ठल मंदिरापर्यंतचा संपूर्ण मार्ग भाविकांनी गजबजून गेला होता. ठिकठिकाणी रांगोळ्या काढून, फुलांचा वर्षाव करून पादुकांचे स्वागत करण्यात आले. मार्गावर भगव्या कमानी, भगवे झेंडे, गुढ्या व स्वागतफलक उभारण्यात आले होते.

सुभाष चौकातून फटाक्यांच्या आतषबाजीत आणि जयघोषात पालखी सोहळा खुशालभाऊ रोडमार्गे पुढे निघाला. मार्गातील विविध ठिकाणी भाविकांनी पादुकांचे दर्शन घेत पूजन केले. राममंदिर परिसरातून पालखी पुढे विठ्ठल मंदिरात पोहोचली. त्यानंतर



हरिभक्त परायण नरेंद्र नारखेडे यांच्या इंद्रायणी निवासस्थानी आदिशक्ती मुक्ताई माउलींच्या सिद्ध पादुकांनी विसावा घेतला. या वेळी नारखेडे परिवाराच्या हस्ते आरती करीत नैवेद्य अर्पण करून मानसन्मान केला. याप्रसंगी महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज, हरिभक्त परायण हरणे महाराज, नरेंद्र नारखेडे यांनी शहरवासीयांना कुंभारखेडा कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले.

सोहळ्यास मुक्ताबाई संस्थानचे अध्यक्ष तथा मुक्ताई पालखी सोहळाप्रमुख हरिभक्त परायण रवींद्र महाराज हरणे, ॲड. रवींद्र पाटील, संदीप पाटील, उद्धव महाराज जुनारे, भागवत पारायण समितीचे अध्यक्ष निळकंठ सराफ, अनिल नारखेडे, माजी नगराध्यक्ष चोलदास पाटील, पांडुरंग सराफ, नीलेश राणे, मिलिंद वाघुळदे, बी. के. चौधरी, पी. के. चौधरी, नगरसेवक सिद्धेश्वर वाघुळदे, सूरज गाजरे, पप्पू चौधरी, राहुल गुजराथी, महेंद्र मंडवाले, सागर होले, नगरसेविका दीपाली भारंबे, नीलिमा महाजन, सुनीता नेहेते, जयश्री चौधरी, भावना भारंबे, अनंता नेहेते, संदीप भारंबे, जितेंद्र भारंबे, शेखर चौधरी, रामराज्य संघाचे संजय सराफ, नीलेश चौधरी, प्रा. राजेंद्रसिंह राजपूत, वसंत परदेशी, राजाभाऊ चौधरी, सी. के. चौधरी, काशिनाथ वारके, गणेश पाटील, विजयसिंह परदेशी, चंद्रशेखर चौधरी, पंडित कोल्हे, नरेंद्र चौधरी, हेमराज चौधरी, किरण चौधरी, सुनील नारखेडे, भूषण नारखेडे, विलास नेमाडे, किशोर कोल्हे, राकेश तिवारी, राहुल परदेशी, विशाल वर्मा, मोहन लोखंडे, अशोक लोखंडे, जालम शिंदे, सीताराम निंबाळकर (आमोदा), सुनील चौधरी, सतीश चौधरी, तुळशीराम चौधरी (विरोदे), राहुल भंगाळे (हंबर्डी) यांच्यासह कीर्तनकार, प्रवचनकार, सेवेकरी, टाळकरी व हजारो भाविक उपस्थित होते.

फैजपूर, आमोदा, पिंपरूड, विरोदे, कळमोदा आदी गावांतील भजनी मंडळांनीही या पालखी सोहळ्यात उत्साहाने सहभाग नोंदविला. सोहळा फैजपूरहून पुढे निघून न्हावी, कळमोदा, खिरोदा, सावखेडा, रोझोदा, चिनावलमार्गे रात्री श्रीक्षेत्र कुंभारखेडा कार्यक्रमस्थळी रवाना झाला.

# मनूर-कोल्हाडी उपसा सिंचन प्रकल्पाची कोट्यवधींची यंत्रसामग्री ‘बेपत्ता’!

## पुनर्रचनेसाठी ‘न्हाई’कडून मिळणार २१.४८ कोटींची भरपाई; आमदार खडसेंचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा**
**मुक्ताईनगर, १७ मार्च**

मुक्ताईनगर येथील मनूर-कोल्हाडी उपसा सिंचन प्रकल्पाची कोट्यावधी रुपयांची यंत्रसामग्री बेपत्ता असल्याचा गंभीर मुद्दा आमदार एकनाथ



खडसे यांनी मांडला होता. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून या प्रकल्पाच्या पुनरुज्जीवनासाठी ‘न्हाई’कडून २१.४८ कोटी रुपये नुकसानभरपाईपोटी मिळणार आहेत.

जिल्ह्यातील मुक्ताईनगर मतदारसंघातील सिंचन प्रकल्पांच्या प्रश्नावर आमदार खडसे यांनी विधान परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला. मुक्ताईनगर येथील मनूर-कोल्हाडी उपसा सिंचन प्रकल्पासाठी कोट्यावधी रुपयांची यंत्रसामग्री खरेदी केली होती. हि यंत्र सामग्री जानेवारी २०२६ दरम्यान चोरी झाल्याचे आमदार खडसे यांनी निदर्शनास आणून दिले होते. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष पाहता आमदार खडसे यांनी पुढाकार घेत २० जानेवारी २०२६ रोजी जलसंपदा सचिव, मुख्य अभियंता, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्याकडे लेखी निवेदन दिले होते.

दरम्यान कोट्यवधींची सरकारी मालमत्ता प्रकल्पस्तरावरून बेपत्ता होत असेल तर संबंधित दोषी कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात असल्याचा प्रश्न विधान परिषदेच्या अधिवेशनात आमदार खडसे यांनी उपस्थित केला.

अधीक्षक अभियंता जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ यांच्या अहवालानुसार, ही यंत्रसामग्री भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (न्हाई) आणि त्यांच्या कंत्राटदाराच्या ताब्यात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असल्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी आमदार खडसे यांच्या प्रश्नावर उत्तर देताना सभागृहात स्पष्ट केले.

तसेच या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या क्षेत्राचा विचार करता, मुक्ताई उपसा सिंचन योजनेच्या १६१८ हेक्टर क्षेत्राला पाणीपुरवठा करण्यासाठी पंपगृहाची नव्याने पुनर्स्थापना करणे आवश्यक आहे. या कामासाठी लागणाऱ्या स्थापत्य, विद्युत आणि यांत्रिकी घटकांसाठी सुमारे २१ कोटी ४८ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. ही संपूर्ण रक्कम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण न्हाईने जलसंपदा विभागाला भरपाई म्हणून द्यावी, असे १० फेब्रुवारी २०२६ रोजीच्या पत्रात म्हटले आहे.

तसेच या प्रकरणातील तांत्रिक बाबींची पूर्तता आणि निधी प्राप्त करून घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे, असे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

चोरीच्या आरोपांमुळे चर्चेत आलेल्या या प्रकल्पाला राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरण विभागा कडून मिळणाऱ्या निधीमुळे नवे स्वरूप प्राप्त होणार असून, सिंचन व्यवस्थेच्या पुनर्स्थापनेचा मार्ग आमदार खडसे यांच्या पाठपुराव्याने मिळाला आहे.

### मुक्ताईनगर, बोदवड, सावदा पोलीस वसाहत बांधकामाचा प्रश्न मार्गी : आमदार खडसे

**तभा वृत्तसेवा**
**मुक्ताईनगर, १७ मार्च**

जिल्ह्यात मुक्ताईनगर, बोदवड आणि सावदा येथील पोलीस कर्मचारी वसाहतींच्या दुरावस्थेचा आणि रखडलेल्या बांधकामाचा प्रश्न आमदार एकनाथराव खडसे यांनी विधानमंडळात अतारांकित प्रश्नाद्वारे मांडला. यावर शासनातर्फे या वसाहतींच्या नूतनीकरणासाठी आणि नवीन बांधकामासाठी सकारात्मक असल्याची माहिती मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुक्ताईनगर, बोदवड आणि सावदा येथील पोलीस वसाहतींची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नवीन वसाहतींच्या बांधकामाचा प्रस्ताव प्रलंबित असून, यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राहावे लागत आहे. याकडे शासनाचे लक्ष वेधत त्यांनी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार खडसे यांनी केली होती.

७ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार, मुक्ताईनगर, बोदवड आणि सावदा येथील शासकीय निवासस्थानांच्या बांधकामाचा सम ाविश प्राधान्यक्रम यादीत करण्यात आला असून बोदवड प्रशासकीय इमारत आणि निवासस्थानांसाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळामार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. ८ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये या कामांना गती देण्यात आली असून, तांत्रिक प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

अहोरात्र जनतेच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना चांगल्या सोयीसुविधा मिळणे हा त्यांचा हक्क असून म ुक्ताईनगर, बोदवड आणि सावदा येथील वसाहतींचे काम मार्गी लागेपर्यंत पाठपुरावा सुरू राहील असे आमदार खडसे यांनी सांगीतले.

# ग्राहकाने हक्कासाठी कायम जागृत राहावे

## प्रांताधिकारी काकडे : रावेर येथील तहसीलय कार्यालयात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**रावेर, १७ मार्च**

प्रत्येक व्यक्ती हा कुठे-ना-कुठे ग्राहक असतो. बाजार पेठेतील वस्तु किंवा सेवा खरेदी करतांना ग्राहकाने जागरूक असणे गरजेचे असून संबधीत दुकानदारांकडून बिलाची पक्की पावती घेणे आवश्यक आहे. फसवणूक झाल्यास आपण घेतलेल्या बिलाच्या आधारावर न्याय मिळवण्यास मदत होते. ग्राहकाने आपले हक्कासाठी कायम जागृत असणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन प्रांताधिकारी बबनराव काकडे यांनी येथे केले .

जिल्हास्तरीय जागतिक ग्राहक दिनानिमित्त रावेर तहसील कार्यालयात जागतिक ग्राहक दिनी कार्यक्रम प्रसंगी ते म्हणाले की ग्राहक संरक्षण कायद्यानुसार ग्राहकांना हक्क मिळालेले आहेत.



त्यात सुरक्षेचा हक्क, म्हणणे म ांडण्याचा हक्क, माहितीचा हक्क, निवड करण्याचा अधिकार, तक्रार व निवारण करून घेण्याचा हक्क व ग्राहक हक्कांच्या शिक्षणाचा अधिकार यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी महेश चौधरी, तहसीलदार दीपा जेधे, साहित्यिक अ.फ. भालेराव, रावेर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. धनराज पाटील, प्रशांत बोरकर, गुणवंत पाटील, सुषमा चव्हाण, निवासी नायब तहसीलदार संजय तायडे, बाजार समितीचे संचालक विलास चौधरी, तालुका कृषी अधिकारी भाऊसाहेब वाळके, तालुका पुरवठा निरीक्षक विवेक शिरेकर, अशोक पाटील, प्रकाश पाटील, रोहिदास ढाके, विजय पाटील, मोहन महाजन, काशिनाथ शिंदे, बाळकृष्ण पाटील, अभिजीत निंबाळकर, किशोर शिंदे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन दीपक नगरे यांनी केले. मंडळ अधिकारी यासीन तडवी यांनी आभार मानले.

# मुक्ताईनगरमध्ये उद्या भव्य हिंदू संमेलन

## विश्व हिंदू परिषदेचे मिलिंद परांडे यांची विशेष उपस्थिती

**मुक्ताईनगर, १७ मार्च**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्षाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात मंडल व वस्तीनिहाय हिंदू संमेलने घेण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून सकल हिंदू समाजातर्फे येथे गुरुवारी (१९ मार्च) सकाळी साडेदहा ते दुपारी साडेबारा या वेळेत भव्य हिंदू संमेलन होणार आहे. संमेलनास प्रमुख मार्गदर्शक म्हणून विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शहरातील भुसावळ रस्त्यावरील गोदावरी मंगल कार्यालयात हिंदू संमेलन होणार असून, संमेलनासाठी विविध सामाजिक व धार्मिक क्षेत्रातीत मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संमेलनात प्रमुख मार्गदर्शक म्हणून विश्व हिंदू परिषदचे अखिल भारतीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे, निमगाव येथील वासुदेव सांदीपनी आश्रमाचे वेदांतचार्य १००८ श्री श्री स्वामी वासुदेवानंद सरस्वती, धर्माचार्य तथा विश्व हिंदू परिषद तसेच श्री संत मुक्ताई पालखी सोहळाप्रमुख हरिभक्त परायण रवींद्र हरणे महाराज यांची उपस्थिती राहणार आहे.

गुढीपाडवा या हिंदू नववर्षरंभाच्या निमित्ताने सकाळी साडेनऊला शहरातील नगरपंचायतीजवळील



मिलिंद परांडे, स्वामी वासुदेवानंद सरस्वती रवींद्र हरणे महाराज

श्रीहनुमान मंदिरपासून प्रवर्तन चौकमार्गे गोदावरी मंगल कार्यालयापर्यंत सकल हिंदू समाजातर्फे भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. समाजात एकात्मता, संस्कृतीचे जतन आणि सामाजिक बांधिलकी जनजागृती करण्याचा उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. संमेलनाच्या माध्यम मातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सामाजिक सलोखा वाढविणे तसेच हिंदू संस्कृती आणि परंपरांबाबत जागरूकता निर्माण करणे हा कार्यक्रमाचा मुख्य हेतू असल्याचेही सांगण्यात आले.

हिंदू संमेलनासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असून, समिती सदस्यांकडून तसेच हिंदू समाज समिती नियोजनानुसार परिश्रम घेत आहे. मुक्ताईनगर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# भुसावळ औष्णिक वीजनिर्मिती केंद्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

## ‘नॅशनल एफिशिएन्सी अवॉर्ड-२०२६’ने सन्मानित

**भुसावळ, १७ मार्च**

महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनीच्या (महानिर्मिती)अंतर्गत भुसावळ औष्णिक वीजनिर्मिती केंद्राने उत्कृष्ट कामगिरीची परंपरा कायम राखत, राष्ट्रीय स्तरावरील मानाचा नॅशनल एफिशिएन्सी अवॉर्ड २०२६ पटकावला आहे. ऊर्जानिर्मिती क्षेत्रातील कार्यक्षमता वाढवणे आणि संसाधनांचा योग्य वापर करण्याच्या बाबतीत या केंद्राने देशात आपली मोहोर उमटवली आहे.

भुसावळ औष्णिक वीजनिर्मिती केंद्राला दोन महत्त्वाच्या श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यात नेट हीट रेट घटवणे (ऑक्सिलरी पॉवर कंझम्पशन- एसीपी कमी करण्याच्या श्रेणीत) व सर्वोत्कृष्ट नेट हीट रेट सुधारणा या दोन श्रेणींत पुरस्कार मिळाले आहेत.



हा ऐतिहासिक टप्पा गाठण्यासाठी मुख्य अभियंता राजेश मोराळे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि धोरणात्मक मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. त्यांच्या प्रेरणेमुळेच केंद्राच्या ऑपरेशन्समध्ये ऑप्टिमायझेशन करणे, ऑक्सिलरी ऊर्जेचा वापर कमी करणे आणि थर्मल कार्यक्षमता वाढविणे शक्य झाले आहे. याप्रसंगी रवींद्र मुसळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भुसावळ औष्णिक वीजनिर्मिती केंद्राच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला.

हा पुरस्कार म्हणजे केवळ सन्मान नसून, आमच्या संपूर्ण टीमने घेतलेल्या अथक परिश्रमांची आणि नावीन्यपूर्ण प्रयोगांची ही पावती आहे. महानिर्मिती मुख्यालयाच्या मार्गदर्शनाखाली आम्ही शाश्वत आणि किफायतशीर वीजनिर्मितीसाठी कटिबद्ध आहोत.
**- राजेश मोराळे**
**(मुख्य अभियंता, भुसावळ औष्णिक वीजनिर्मिती केंद्र, दीपनगर)**

# खडसे महाविद्यालयात युवक संसदेतून लोकशाहीचे धडे

**तभा वृत्तसेवा**
**मुक्ताईनगर, १७ मार्च**

येथील श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालयात राज्यशास्त्र व इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने युवक संसद उपक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष एम. टी. ई. एस.चे सचिव डॉ. सी. एस. चौधरी, प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. एच. ए. महाजन, उपप्राचार्य डॉ. संजीव साळवे, डॉ. वंदना चौधरी



आदी उपस्थित होते.

युवक संसदेत विद्यार्थ्यांनी लोकशाही व्यवस्थेतील संसदीय कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव घेत विविध सामाजिक व राष्ट्रीय विषयांवर आपली मते मांडली. पंतप्रधानांची भूमिका टी. वाय. बी. एससी. कॉम्प्युटर सायन्सची साक्षी वाघ तर विरोधी पक्षनेत्याची भूमिका टी. वाय. बी. ए. इंग्रजीचा विद्यार्थी पार्थ शेजोळे यांनी पार पाडली.

सूत्रसंचालन प्रा. उदय सुनील अढागळे यांनी केले. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. गणेश चव्हाण व इंग्रजी विभागाचे डॉ. गणेश शाळिग्राम चव्हाण यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

# सावदा येथे पं. दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सावदा, १७ मार्च**

भाजपा कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसाठी सावदा मंडल अंतर्गत पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानाचे आयोजन करण्यात आले होते. तांदलवाडी येथे दि.१४ व १५ मार्च रोजी पार पडलेल्या या निवासी कार्यशाळेत पक्षधोरणे जनमानसात रुजवणे, बुथ व्यवस्थापन, सोशल मीडियाचा प्रभावी वापर आणि अंत्योदय विचार कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवणे यासह विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.



या कार्यशाळेचे उद्घाटन सत्र व कार्य विस्तार लोकसभा निवडणूक प्रमुख नंदु महाजन यांच्याहस्ते करण्यात आले. ‘सरकार की उपलब्धीया’ या विषयावर जिल्हा सरचिटणीस केतकी पाटील, बूथ प्रबंधक विषयावर कुंदन फेगडे, इतिहास व विकास या विषयावर निलेश चव्हाण, वैचारिक अधिष्ठान या विषयावर नवल पाटील, कार्यपद्धतीवर वासु नरवाडे आदींनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा समारोप आ.अमोल जावळे यांच्या उपस्थितीत पार पडला.

या प्रसंगी सावदा मंडल अध्यक्ष दुर्गादास पाटील, कार्यशाळा मंडळ प्रभारी महेश चौधरी, शिवाजीराव पाटील, श्रीकांत महाजन, हरलाल कोळी, महेश अकोले, विनायक कोळी, जे.के. भारंबे, शुभम पाटील, दीपक श्रावगे, नंदाताई लोखंडे, रेणुका पाटील, नितीन पाटील, राजेंद्र पाटील, जितेंद्र चौधरी, जयचंद्र पाटील, लखन पाटील, जगदीश पाटील, विलास असरमल, बाजीराव ठाकरे आदी उपस्थित होते.